काव्य - ३७१ सन १८७६

ले. श्री. रा. सखाराम गणेश इस्लामपुरकर

श्री. गणेश पंचपदी समूह

(श्री प्रिंटर्स अॅण्ड स्टेशनर्स, ठाणे)

॥ श्री मोरया प्रसन्न. ॥

# श्रीगणेश पंचपदी समूह.

हें पुस्तक

श्रीग. परा. वे. रा. रा. सखाराम गणेशशा॰ इसलामपूरकर राहणार धरणाचे रेठरे ऊर्फ गणपतीबुवा यांनीं

अनेक साधूंचा गणेशपंचपदीचा संग्रह असलेला एकत्र करून पुस्तक तयार केलें तें

रा. रा. लक्ष्मण गणेश काळे यांनीं त्यांच्या सांगण्यावरून ठाणें येथें

श्रीगणपतीप्रसादोदय व जगत्समाचार छा. छा.

प्रती एक हजार.

सन १८९५

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून सर्व अधिकार मालकानें आपणाकडेस राखला आहे.

पौष शु॰ ४ शके १८१६

किंमत १ रुपाया.

॥ ॐ श्रीगणेशायनमः ॐ ॥

॥ गकाररूपंविविधंचराचरं णकारगंब्रह्मतथापरात्परं ॥
॥ तयोस्थितास्तस्य गणाःप्रकीर्तिताः गणेशमेकंप्रणमामिसर्वदा ॥ १ ॥

# श्री मयूरेश्वर प्रसन्नोभवतु.

## श्री सद्गुरू मोरयागोसावी प्रसन्न.

॥ श्रीमदगण्यपुण्यचयप्रोद्भूतसत्कीर्तिगगनतलोदितयशःशरच्चंद्रकरद्योतप्रद्योदितदशदिग्मंडलानवरतयमनियमादिसाधनासादितढुंढिपदपंकजभ्रमरायितचित्तपरिचयोदितकपिलकृपाकटाक्षावलोकनपूरितपुरुषार्थचतुष्टयगाणेशाग्रेसरशालिग्रामोपनामकमोरयागोसाव्यात्मजचिंतामणिदेवप्रसादलब्धोदयज्योतिर्लेखकोपनामकरेपाकग्रामवासिमल्हारभक्तरामपौत्रवचचादेवप्रपौत्रसीतारामायानुजगणपतिबुवेत्युपपदधारकसखारामस्य विकटतुंडविकटचरणकंजभावनानंदसंदोहतुंदिलहृदयोत्सारितानाद्याविद्यासादितगंतत्वोज्वलज्ञानगुरुवररघुनाथप्राप्तगणेशमहामंत्रस्य साधंभूशरन्मयूरगुरुकृतदूर्वारसगणेशतीर्थविधारणभूपितकरणग्रामावासिसाक्षात्स्वप्नमयूरप्रसादस्य सगुहंडमचंडकीर्तनपांडित्यचंडद्युतिद्योतितमहीमंडलाखंडलसदोपमंडपाखंडतांडविताशिष्योपाशिष्यादिनरवरवर्गस्तूयमानयशस्तोमस्य गणेशपुत्रस्यावसाह्येन काळेत्युपनामकलक्ष्मणपंतेनायंपद्यश्लोकादिसमूहो बव्हायासैर्भिलित्वा गणेशोपासकानांद्राग्गणेशोपासनाज्ञानायायसाक्षैरेस्थानेत्युपनामकग्रामस्थ गणेशप्रसादोदयतथाच जगत्समाचारनामकयंत्रालये अंकयित्वाप्रकाशंनीतस्वार्थंचपरोपकारार्थं गणेशप्रीतये श्रीगजाननार्पणमस्तु ॥

काव्य
६६.'७
मराठी ग्रंथ संग्रहालय नं. २२२०

# प्रस्तावना.

आम्ही पुष्कळ दिवस अनेक क्षेत्रीं जाऊन केवळ परोपकारार्थ गणेशांचीं संपूर्ण करुणाष्टकादि भगवद्भक्तांनीं केलेलीं पदें व उपयुक्त चतुर्थीचा सप्रमाण **शास्त्राधार** व मोठमोठे गाणपत्य धुरंधर **साधू** यांचें थोडक्यांत वर्णन व त्यांनीं केलेली गणेशमार्गास योग्य **सरणी** व सर्व **गणपतीचें माहात्म्य** थोडक्यांत चतुर्थीचें माहात्म्य महाराष्ट्र **गद्यात्मक** व लोकोपयोगी केलेलें चरित्र श्रीसद्गुरु **मोरयागोसावी** यांचें संक्षिप्त चरित्र गद्यात्मक मोरोपंतानी केलेल्या मोरयागोसावी यांच्या चरित्राच्या अंत साधून आर्या **श्री भक्तराम** साधूनी केलेली गणेश नामाक्षर प्रश्नावली इत्यादि गाणपत्यास एकदम मिळणें व सर्वां जवळ संग्रह असणें दुर्लभ आहे. असें जाणून सर्व गाणपत्यास उपयोगी पडण्या जोगें करून जनांनी **गाणपत्य** मार्गाची माहिती करून घ्यावी गणेशास नानातऱ्हेनें आळवावे व भावीक जनांस तर साक्षात्कार करणारा असा आह्मी या एका पुस्तकात संग्रह केला आहे. तर भावीक गाणपत्यांस हा अलभ्यलाभच समजावा व त्याचा सर्व गाणपत्यांनीं उपयोग करून घ्यावा अशी आमची त्यांस विनंति आहे.

ग्रंथकर्ता,

# अनुक्रमणिका.

## पूर्वभाग.

### श्री सद्गुरु गणेशदेवप्रसन्न.

१ श्रीसद्गुरु मोरयागोसावी यांचें गणपतीबोवा धरणाचें रेठरेकर यांनी केलेलें संक्षिप्त चरित्र, २ मोरोपंतकृत मोरयागोसावी यांच्या चरित्राच्या आर्या, ३ श्रीसाधु मल्हारभट्टजीकृत मनश्लोकसमूह, ४ गणेशनंदनकृत गणेशनामप्रश्नावली. ५ गणेशनामावली भक्तरामकृत, ६ जोहार व वंदन पद आणि अभंग इत्यादि, ७ चोवीस चतुर्थीचा शास्त्राधार सप्रमाण, ८ चोवीस चतुर्थीचीं नांवें व संक्षिप्त कथाभाग व प्रार्थनेचें पद, ९ गणेशनंदनकृत करुणाष्टकें पदें इ०, १० गोसाविनंदनकृत प्रार्थना श्लोकाः व अनेक साधूंचीं पदें वगैरे;

## उत्तरभाग.

१ श्री मोरया गोसावी यांचें वर्णनात्मक चतुश्लोक, २ श्री चिंतामणि देवमहाराजांचें वर्णन टिकेसहित, ३ पंचश्लोकी गणेशपुराण, ४ गणेश वर्णनात्मक गोसावीनंदनकृत श्लोक प्राकृत, ६ गणेश पंचपदी श्लोकः, ६ पंचपदी प्रारंभ पद, ७ पंचपदी प्रारंभारती, ८ भजन व सद्गुरूस नमस्कार, ९ मोरयागोसांव्यांचें पद, १० चिंतामणि देवमहाराजांचें पद, ११ भजन व मोरयागोसावीकृत भजन पदसंग्रह, १२ चिंतामणि दासकृत धाव्याचे पद पहिलें व दुसरें, १३ मोरयागोसावीकृत शिव वर्णनात्मक पद, १४ चिंतामणिदेवमहाराजकृत भजन पदसंग्रह, १५ गणपति भेटलेलें पद चिंतामणिदासकृत, १६ मोरयागोसावीकृत मोरयास प्रार्थनात्मक श्लोक, १७ चिं० उपदेशपर अभंगसंग्रह; १८ ललित पदें व मोरया, मोरयागोसाव्यास भेटले तें पद, १९ बाळसंतोष मोरयागोसावीकृत, २० भोगाविलास वर्णनात्मक, २१ जोगवा मोरयाकृत व चिंतामणि देवकृत माहेर व सासर, २२ मोरया देवास प्रार्थना पद; २३ चिंतामणि देवकृत खेळियापद, २४ गणेशास विनंति मागणी द्वारयात्रा व माहेरास निरोप, २५ आरत्या संग्रह, २६ उत्तरपूजेचें पद व आरत्या, २७ श्री धरणीधरमहाराजकृत पदें अभंग गारुडी वगैरे पदसंग्रह, २८ गणेशनंदनकृत गणपतीचें पद, २९ अष्टविनायकाची भूपाळी, ३० काकडआरती व निरंजनस्वामींची पदें, ३१ पिशाच्चपद मोरयागोसावीकृत, ३२ श्री साधु भक्तरामकृत मोरयापद व बाळसंतोष, ३३ गोसावीनंदनाचा विविध पदसंग्रह, ३४ मोरयागोसावीकृत करुणाष्टक श्लोक, ३५ दूर्वामहात्म्य पद, ३६ निरंजनस्वामींचें वर्णन, ३७ अभंग गणेशनंदनकृत पदें, ३८ नरहरी महीपतीचें पद व नवविधाभक्तीचें पद, ३९ अमृतरायकृत आशिर्वादात्मक गणेशाचें पद. येणेंप्रमाणें विषयांचा अनुक्रम दिला आहे.

# श्रीसद्गुरु मोरयागोंसावी

## यांचे संक्षिप्त चरित्र.

श्रीमयुरेश्वर गोंसावी हे साधु कर्नाटक देशांतील शाली नांवाच्या गांवांतील राहणारे वामनभटजी यांचे पुत्र होत. हे साधु निर्द्वंद्व निष्कलंकरीतीनें श्रीमोरेश्वर यांच्या भजनीं रत होते, यांत संशय नाहीं. कारण त्यांच्या मुखांतील पद्यरचना लहान मुलानें जरी वाचली तरी गणपतीविषयीं प्रेम उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं; या साधुंचा जन्म श्रीक्षेत्र मोरेश्वरींच झाला. याचें कारण त्यांचे वडील वामनभटजी हे आपणांस संतति होईना ह्मणून, उदासपणानें सहकुटुंब तीर्थयात्रेस निघाले त्यावेळीं वामनभटजींचें वय सुमारें ५० वर्षांचें होतें. ते यात्रा करीत श्रीक्षेत्र भूस्वानंदपूर येथें आले. नंतर त्यांनीं तेथील लोकांस त्या क्षेत्राचा संपूर्ण इतिहास विचारिला. तेथील लोकांनीं वामनभटजीस खालीं लिहिल्याप्रमाणें क्षेत्रमाहिमा तात्पर्यानें सांगितला. या क्षेत्रास भूस्वानंद अथवा मयूरपुरी ह्मणतात. येथें कमलासुर दैत्याला मारून त्याच्या मस्तकावर मोरेश्वर बसले. कमलासुरास मारण्याकरितां त्यांनीं यज्ञांतून मयूर उत्पन्न करून त्यावर आरोहण केलें. यास्तव या क्षेत्रास व देवास मोरेश्वर असें ह्मणतात या क्षेत्रांतील महिमा अगाध आहे. परंतु तात्पर्यानें आह्मीं सांगतों. मुद्गल पुराणांत मयूरक्षेत्र महात्म्य आहे त्यांत असें सांगितलें आहे कीं, श्लोक ॥ अन्यक्षेत्रे कृतं पापं पुण्यक्षेत्रे विनश्यति ॥ पुण्यक्षेत्रे कृतं पापं तन्मयूरे विनश्यति ॥ १ ॥ अर्थ ॥ अन्य क्षेत्रांत पाप केलें तर पुण्यक्षेत्रांत त्याचा नाश होतो. पुण्य क्षेत्रांत जें पाप होतें तें मयूरेश्वर क्षेत्रांत निशेष नाशाला पावतें. अशा रीतीनें अन्यही पुराणांत या भूस्वानंदाचें वर्णन महत्वाचें केलें आहे असो.

जेव्हां कमलासुरास मयुरेश्वरानें मारिलें व त्याच्या मस्तकावर विसांवा घेण्यास बसले तेव्हां ब्रह्मा, विष्णु, शिव, इंद्र, चंद्र इत्यादि देव यांनीं गणेशावर पुष्पवर्षाव केला व स्तवन करते झाले. ब्रह्मदेव मोरेश्वराची षोडशोपचार पूजा करून प्रदक्षिणा घालण्यास लागला. मोरेश्वरास प्रदक्षिणा घालित असतांना त्या ब्रह्मदेवाचा पाय ब्रह्मकमंडलूस लागला. ब्रह्मदेवानें कमंडलू गणेशाच्या पूजेकरितां नानातीर्थांच्या उदकानें भरून ठेविला होता. तो त्याच्याच पायानें लवंडल्यावर त्याचा नदीसारखा मोठा प्रवाह झाला. प्रदक्षिणा संपल्यावर ब्रह्मदेव लवंडलेला कमंडलू सारखा करून भूमीवरचें उदक त्यांत हाताच्या ओंजळीनें भरूं लागला. तें श्रीभगवान्मयूरेश्वर यांनीं पाहतांच हातानें खुणा करून त्याला सांगितलें ब्रह्मदेवा तूं आतां आपला कमंडलू भरूं नको हा लवंडून उदकाचा प्रवाह झाला. यास्तव आजपासून या प्रवाहास ब्रह्मकमंडलू नदी असें ह्मणतील. मी या नदीच्या तीरास जगदुद्धाराकरितां वास्तव्य करितों. या क्षेत्राचें भूस्वानंद अथवा मयुरपुरी असें प्रख्यात नांव होईल. या ब्रह्मकमंडलुगंगेचे पाणी कोणी स्पर्श करील अथवा या नदींत जो कोणी स्नान, दान, तप, क्रिया इत्यादि करील तो पातकी जरी असेल तरी मुक्त होईल. या नदीच्या तीरीं तपश्चर्या करणारे जन निर्विघ्नपणानें मुक्तीस जातील. या क्षेत्रांत जो प्राणी मरतो त्यास पुनरावृत्ति होणार नाहीं, असें भगवंताचें वचन ऐकल्यावर ब्रह्मदेवानें आपला कमंडलु न भरतां गणेशास साष्टांगनमस्कार घातला, व प्रार्थना करून ह्मटले हे गणेश, हे भक्तकामकल्पद्रुम, आपले बोलणें मी शिरसा मान्य केलें. मीहि येथेंच तप करण्यास रहातो, असें ब्रम्हदेव मोरेश्वरास आदरपूर्वक भाषण करून स्वस्थ उभे राहिले, नंतर लक्ष्मीनारायण यांनीं मोरेश्वराची पूजा केली व नारायण भगवंताचे पूर्व बाजूस द्वाररक्षक झाले. दक्षिणेस उमामहेश्वर राहिले, महावराह उत्तरेस राहिले, रतिकंदर्प पश्चिमेस राहिले; तात्पर्य तेहतीस कोटि देव अनुक्रमानें रागिनीमोदप्रमोदादि गण नग्नभैरवासह यथानुक्रमें त्या क्षेत्रांत राहिले. सप्तर्षी

तप करण्याकरितां तेथें राहिले त्यापासून भावीक व प्रेमळ गणेशभक्त शाक्त, सौर, वैष्णव, व इत्यादि चारी वर्णांचे लोक पंचक्रोशी द्वारयात्रा तीर्थयात्रा सप्ततीर्थी गयावर्जन इत्यादि करून मुक्तीस गेले व या कलीयुगांत मोठमोठे मुरारि गोंसाव्यासारखे साधु ज्ञानयुक्त होऊन मुक्त झाले. काशिक्षेत्रांतून हजारो जन येथें मुक्ति मिळविण्यास येतात, त्यांच्या मोठमोठ्या समाधी कऱ्हेच्या तिरीं शोभताहेत त्या तुम्हीं पाहाण्यात ( फार वर्णन करण्यास सहस्त्रमुखी शेष ब्रह्मदेवासहित ही थकेल मग आमची कथा काय? ) असो. या क्षेत्राचा महिमा असा आहे कीं, या क्षेत्रांत तप करणारा मनुष्य कार्यसिद्धी पावल्यावांचून राहिलाच नाहीं, असें तेथील लोकांचें वाक्य श्रवण करून वामन भटजी श्रीचे क्षेत्रीं येऊन मोरेश्वरास साष्टांग नमस्कार कुटुंबासहीत घालून पुत्राविषयीं अनुष्ठान करण्यास लागले. बारावर्षें पुरीं झाल्यावर भगवान्मोरेश्वर यांनीं स्वप्नीं वामनभटजीस तुला पुत्र होणार नाहीं असें सांगितलें. नंतर पुन्हा बारा वर्षें अनुष्ठान मोठ्याउग्रतेनें केलें तत्रापि प्रभूनें पुत्र होणार नाहीं असें पुन्हां स्वप्नीं सांगितलें. नंतर वामनभटजीं दिलगीर होऊन मनीं पूर्ण विचार करून त्यांनीं पुन्हा बारा वर्षें अनुष्ठान केलें पुनरपी तसेंच मोरेश्वरानें स्वप्नीं सांगितलें. आपल्या वयास फार वृद्धत्व आलें व देव तर पुत्र देत नाहीं हें पक्कें जाणून पुन्हा विचार करून ते अनुष्ठानास बसले. नंतर श्रीभगवान् भक्तकामकल्पतरू मोरेश्वर यांनीं त्या वामनभटजीचा पूर्ण विश्वास आपल्या चरणीं आहेसें जाणून पुन्हां स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, मीच तुझ्या उदरीं अवतार घेतों, व या युगांत माझा महिमा विस्तृत करितों. याप्रमाणें वामनभटजीनें झालेलें स्वप्न आपल्या पत्नीस सांगितलें. कांहीं काल गेल्यावर वृद्धपणीं मोरेश्वराच्या कृपेनें श्रीमन्शालिवाहन शके १२९७ विधातृनाम संवत्सरे मिति माघ शुद्ध चतुर्थी माध्यान्हकालीं भृगुवासर रेवती नक्षत्राच्या द्वितीय चरणावर त्यांस पुत्र झाला. ज्या वेळेस पुत्र जन्मला तेव्हां वामनभटजीची पत्नी महापातिव्रता अखंड वज्रचुडे मंडित सौभाग्यवती

पार्वतीबाई त्या मुलास पाहण्यास जेव्हां लागली तेव्हां तिच्या नेत्रासमोर शुंडादंड गणेश मूर्ति दिसल्यासारखा भास झाला व तो नाहींसा होऊन तिनें एकदम हास्यवदन करणारें मूल पाहिलें. नंतर सर्व साध्वी स्त्रिया वामनभटजींची पत्नी प्रसूत झाली व मूल न रडतां हास्यवदन करितें हें ऐकून तें मूल पहाण्यास धांवत आल्या व त्याच-प्रमाणें मुलास पाहून आपापल्या पतीस व इतर स्त्रियांस त्यांनीं तें कथन केलें. सर्व जन ही हकीगत ऐकून आश्चर्य पावले व येऊन पाहतात तों मूल मुळींच रडत नाहीं व हास्यवदन करून लोकांकडे टकटक पाहतें, हें त्या सर्व लोकांनीं जाणून हें मूल ईश्वरी अंश आहे यांत शंका नाहीं असें ठरलें व बाराव्या दिवशीं त्या मुलाचें नांव मोरया असें ठेविलें. तेच हे सत्पुरुष मोरया गोसावी होत. हे बाळपणींच चमत्कार दाखवूं लागले, पुढें वामनभटजीस पवनगंगेचे तिरीं चिंचवड वनांत राहून दरमासीं चतुर्थीस दर्शनास यावें असा दृष्टांत झाला. व त्याप्रमाणें ते करूं लागले. बाळपणीं जे चमत्कार सद्गुरुमोरया गोसावी ह्यांनीं केले त्यांपैकीं खालील चमत्कार अद्याप प्रसिद्ध आहे. एका पवार नांवाच्या कुळवाड्यानें आपले खडतरजमिनीजवळ या सद्गुरूस बाळपणीं नेऊन त्यांची भक्तिपुरःस्कर विनवणी करून आपले जमिनीस हात लावण्यास सांगितलें व त्यावेळेपासून ती जमीन फार सुपीक झाली वामनभटजी आपल्या मुलास पांच वर्षे पुरी होणार असें जाणून त्या मुलास आपल्या बरोबर घेऊन मोरेश्वराच्या दर्शनास मोरेश्वरीं गेले. द्वारयात्रा वगैरे करून मोरेश्वरास प्रार्थना करून ह्मणतात हे भक्त वत्सल हे भक्तकामकल्पद्रुम मोरेश्वर आपल्या दर्शनास मुलास आणिलें आहे. आपण स्वप्नांत पांच वर्षे पुरीं झालीं कीं मूल मरण पावणार असें मला सांगितलें होतें तर हे दयाळा माझी विनंति ऐकून तुला करुणा येऊं दे. व वृद्धपणीं तुझ्या कृपेनें मूल झालेलें तें तूं मृत्युमुखीं देऊं नकोस. असें बोलून मोरेश्वरचरणीं लोटांगण घालून घरीं चिंचवडीं मुलासह येऊन पोंचले. स्वप्नांत सांगितल्याप्रमाणें पांच वर्षें संपतांच

मूल मरण पावलें. पुढें गणेशानें गोसाव्याचा वेष घेऊन त्या मृत मुलाचे अंगास भस्म लावून उठविलें नंतर त्या मुलाचे कर्णांत मंत्र व मी अमका आहे असें सांगून कफनी अंगांत घालण्याकरितां दिली व पायांतील पादुका देऊन गुप्त झाले, जेथें गुप्त झाले त्या ठिकाणीं वृंदावन व समाधि बांधून पादुका तेथें स्थापिल्या आहेत. मूल जिवंत झालें व कफनी गळ्यांत अंगभर पाहून वामनभटजींनें विचारलें, मुला, तूं कसा जिवंत झालास! तुला कफनी कोणी दिली! नंतर हे सद्गुरु मोरयागोंसावी आपल्या वडिलास सांगते झाले कीं, मला मोरयानें गोसाव्याच्या वेषानें येऊन जिवंत केलें. नंतर ही कफनी व कांहीं मंत्र तंत्र सांगून ते गुप्त झाले. ह्या पहा माझ्या मोरयानें आपल्या पायांतील पादुका दिल्या आहेत. मला लोक आजपासून गोंसावी म्हणतील, असें मोरयानें सांगितलें. हें ऐकून वामनभटजीस अति आनंद झाला. व तेव्हांपासून सद्गुरु मोरयागोंसावी याप्रमाणें लोक ह्मणूं लागले. दिवसें दिवस सद्गुरु जस जसे वाढत गेले तस तसे पुष्कळच चमत्कार करूं लागले. मौंजी बंधन झाल्यावर नित्य त्रिकालीं स्नान करून पुष्कळ लोकांचा मार्गानें उद्धार करीत करीत गणेश चिंचवडीं पर्णकुटिका करून राहिले. कांहीं दिवसांनीं सद्गुरुचे वडील मोरेश्वरीं सहकुटुंब येऊन मोरेश्वराची प्रार्थना केली. द्वारयात्रा, सप्ततीर्थि, तीर्थपूजा, गयावर्जन वगैरे यात्रा करून राऊळी जाऊन शेवटचा मोरयास निरोप मागितला कीं, प्रभो माझा देह तुझ्या चरणीं पडो. इतकें ह्मणून कऱ्हेच्या तिरास येऊन गणेश तीर्थाजवळ सहकुटुंब येऊन बसले नंतर सद्गुरु मोरयागोंसावी यांना हांक मारून आपल्या अंकांवर बसवून घेतलें व आज्ञा केली कीं, मुला नित्यपूर्णब्रम्ह मोरेश्वर यांच्या चरणीं तत्पर असावें, व दर चतुर्थीस मोरयास भेटून नाना भक्तिरसानें मोरयास आळवावें येवढें सांगणें आहे. आम्हीं आतां उभयतां स्वानंदपुरास जातों मोरेश्वराची आज्ञा घेऊन या तीरास देह विसर्जन करणेस आम्ही उभयतां बसलों आहो तर शांतमन करून सर्व नाशिवंत पदार्थ यांकडे लक्ष न देतां मोरेश्वरी पूर्ण लक्ष द्यावें. असें उभयतांनीं

सांगून मंगळमूर्तीमोरया असा नामाचा उच्चार करून देहविसर्जन केला. हे सद्गुरु मोरयागोसावी यांनीं पाहून किंचित नेत्रांतून अश्रु ढाळले व तात्काळ वडील व मातोश्री या उभयतांचा बोध पूर्ण लक्षांत ठेऊन शांत मनें वडील व मातोश्री यांचें और्ध्वदेहिक कर्म संपूर्ण केलें. जेव्हां वामनभटजींनीं देह विसर्जन केला त्यावेळेस त्यांचें वय एकशें पस्तीस वर्षांचें होतें, व त्यांच्या पत्नीचें वय सुमारें १२० वर्षांचें होतें असा एक पुष्कळ दिवसांचा लेख सांपडला आहे. आमच्या बखरींत वयाचें मान सुमारें १२५ वर्षें व त्यांच्या पत्नीचें १०५ वर्षें असें लिहिलें आहे. असो पुढें ओर्ध्वदेहिक कर्माचे पुर्ण दिवस झाल्यावर व गोप्रदान वगैरे दान यथास्थीत ब्राम्हणांस दिल्यावर ते राऊळीं मोरयाच्या दर्शनास आले. व सद्गुरु मोरयागोसावी प्रभूस लोटांगणीं शरण येऊन प्रथमतः अतिप्रेमानें भक्तिरसात्मक पद त्यांनीं येथें मनानें कल्पित केलें; तें पद आरती सारखेंच आहे. ( तें आदि अवतार तुझा असें गणपति भक्तांत प्रसिद्ध आहे. ) नंतर ते घरीं आले. त्यांनीं नित्य त्रिकालीं स्नान करावें व मोरया मोरया या नामाचा गजरकरावा व लोकांनीं हा खुळा ब्राम्हण आहे असें अज्ञान समजुतीनें म्हणावें. पुढें कांहीं दिवसांनीं हे योगी पूर्ण उदयास आले; कोणे एके दिवशीं सायंकाळीं धूपारतीस अग्नि पाहिजे म्हणून पूर्वीं सांगितलेल्या पवाराची मुलगी आंधळी होती; व चिंचवडास तिला विवाह विधेनें एक्या मराठ्यास दिली होती तिच्या घरीं हे योगी अग्नि मागण्यास गेले त्या पवाराच्या आंधळ्या मुलीनें हस्त जोडून मोरया गोसावी यांना कथन केलें कीं मी जन्मतांच आंधळी आहे मला कांहीं दिसत नाहीं. तेव्हां "तुला मोरयाच्या कृपेनें दिसावयास लागेल" असें वाक्य मुखांतून सद्गुरु मोरया गोसाव्यानें काढतांच त्या मुलीस परम आनंद झाला व तिनें अग्नी देऊन सद्गुरुची फारच स्तुति केली. नंतर योगिराज घरीं येऊन मोरयाची पूजा व धूपारती वगैरे नित्य अवश्य क्रिया करून ध्यानस्थ झाले. मध्यरात्रीच्या सुमारास हा योगी खरा ध्यानस्त आहे कीं खोटा आहे हें पाहण्याकरितां

नरहरी महिपति म्हणून एक जातीचा मराठा राहणार परगणे शिरवळ्या-पैकीं एक्या सुरूल नांवांच्या खेड्यांत होता तो गोंसाव्यांची कीर्ति ऐकून छळण्याकरितां मुद्दाम आला होता; त्यानें सद्गुरुच्या पर्णकुटींत जाऊन बाहेरून आग लावून दिली त्यामुळें सर्व पर्णकुटी जळाली पण ध्यान सोडून सद्गुरु हलले नाहींत व त्यांच्या देहास अगदींहि धक्का लागला नाहीं. नंतर पंचावन घटकेच्या सुमारास सावध झाल्यावर सर्व कर्म त्या नरहरि महिपतिचें आहे असें जाणलें नंतर स्नानास पवनेच्या तीरास सद्गुरु वसतात तोंच सदर नरहरी महिपति येऊन साष्टांग दंड-वत करून हात जोडून सद्गुरुमोरयागोंसावी यांची त्यांनीं स्तुति केली. क्षमा मागतांच सद्गुरु मोरयागोंसावी ह्मणाले नरहर महिपते तूं माझा पुष्कळ तऱ्हेनें छळ केलास यां करितां तुजला मी पवित्र करितों. कामधेनूस कितिजरी मारिलें तरी दोहन करणाऱ्यांस ती दुग्धच देणारी आहे विष कधींहि देणारी नाहीं हें पक्कें समज. नंतर तो सदुगुरूचा उपदेश घेऊन मोरेश्वरीं जाऊन नामस्मरण करीत बसला. गणेश त्याला-हि प्रसन्न होऊन त्याचें घरीं भोजनास गेले. जेव्हां भोजनास गेले त्याच वेळीं त्यानें पद केलें आहे; तें पद असें ॥ मोरेश्वर घरासि आला प्रसन्न झाला ॥ इत्यादि. असो, गणेश ज्या ठिकाणीं जेवले तेथें स्वयंभू बाणाची गणेशाची मूर्ति आहे. नरहरि महिपति जातीचा गुरव होता तो धर-णाच्या रेठरे जवळ गुरवाच्या वाडींत राहत असे. हल्लीं ती वाडी उदास झाली आहे, परंतु गणपति मात्र तेथें आहे त्याचे वंशज धरणाचे रेठरे स राहतात व त्या देवास ते गणपतिचा ह्मसोबा ह्मणतात. पुढें कोहीं दिवसांनीं थेवूरास वद्यपक्षीं मोरयाच्या दर्शनास सद्गुरु गेले असतांना जेथें स्नानसंध्या व अनुष्ठान करण्यास बसले तेथें मोठा डोह आहे त्या डोहांतून गणेशमूर्ति बाहेर पडून मोरयागोंसावी यांस भेटली. नंतर मोरया-गोंसाव्यानें एकदम मूर्ति पाहिल्याबरोबरत्यांचें डोळे दिपले; हें गणेशानें पाहून परिक्षेकरितां त्याच अरण्यांतील एका वाघास भीती दाखविण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें तो गुरगुर शब्द व डिरक्या फोडण्यांस लागल्या

बोवर गोसाव्यांनीं जयचिंतामणि सिद्धिरते असा उच्चार करून त्यांच्या अंगावर उदक टाकिलें; त्या योगानें तो वाघ शिळा होऊन पडला अद्याप थेऊरास ती शिळा आहे; व ती इतिहास प्रसिद्ध आहे. हा चमत्कार चिंतामणीनें पाहून मोरयागोसावी यांस लग्न करण्यास सांगितलें व मी तुझ्या पोटीं येणार व माझें नांव चिंतामणीच ठेव. असें सांगून स्तब्ध उभे राहिले. नंतर मोरयागोसावी ह्मणतात " हे भगवन् चिंतामणे मी अत्यंत वृद्ध झालों मला विवाह करण्यास मुलगी कोण देतो?" माझें वय शाहाण्णव वर्षांचें आहे. हें ऐकून भगवान चिंतामणी ह्मणतात हे भक्ता तूं राथींत पुनवळे या नांवाचे गांवांत जा तेथें कुळकर्ण्यांची मुलगी तुला विवाहविधीनें मिळेल मी त्याला स्वप्नीं पूर्वींच सांगितलें आहे. भगवान नंतर अंतर्धान झाले; मोरयागोसावी आपल्या उदरीं चिंतामणी अवतार घेतात हें जाणून मोरेश्वरी अश्वीन शुद्ध चतुर्थीस जाऊन घरीं आले, व माघाचे महिन्यांत योगिराजानें त्या गांवीं जाऊन विवाह विधीनें कुळकर्ण्याचे कन्येस वरिलें. नंतर तीहि महासाध्वी पतिव्रता शिरोमणी वज्रचुडेमंडित सौभाग्यवती सरस्वतीबाई योगिराजाची प्रीतीनें सेवाकरीत असे. पुढें शके १४०३ विक्रुतीनाम संवत्सरे मिति माघ वद्य ४ रोजीं चंद्र दर्शनीं योगिराजाचे घरीं चिंतामणी अवतीर्ण झाले. योगिराज वद्य चतुर्थीस थेऊरास चिंतामणीच्या दर्शनास येतात तों तेथें त्यांना चिंतामणि दिसेनात व एकदम शब्द झाला कीं हे मोरयागोसावी तुझ्या घरीं मी बाळ झालों आहे. नंतर पूर्ण विचार करून ते घरीं आले व पाहतात तों मूल जन्मास येऊन न रडतांना स्वस्थ पडलें आहे; व जी पूजा थेऊरास केली ती प्रत्यक्ष मुलाच्या अंगावर पाहतांच त्यांस आनंद झाला. बारावे दिवशीं चिंतामणी हें नांव त्या मुलाचें ठेविलें, कांहीं दिवसांनीं मूल रांगण्यास लागलें तें चंद्रकलेप्रमाणें वर्धमान जसें होऊं लागलें. तस तसे चमत्कार करूं लागलें. जेव्हां सद्गुरु चिंतामणी महाराजास आठ वर्षे पुरीं झालीं तेव्हां चिंतामणी देवानें चतुर्थीतिथीचा महिमा व भक्त वात्सल्यता मोरेश्वराची कशी आहे याचा महिमा लोकांस दाखविला.

को. ९९-



आठवें वर्ष प्राप्त झालें असतांना व भाद्रपद शुद्ध चतुर्थी आली हें जाणून ते अतिशय व्याधिग्रस्त झाले व मातेजवळ अन्न मागूं लागले परंतु त्या दिवशीं चतुर्थी असल्या कारणानें मातोश्रीनें अन्न दिलें नाहीं. परंतु तो अतिभुक्त व मरणोन्मुख पाहून तीस दया आल्या कारणानें ती सद्-गुरु मोरयागोंसावी यांस अन्न देण्याविषयीं परवानगी असावी असें विनवूं लागली. परंतु सद्गुरुनें सांगितलें कीं आज गणेशाचा जन्मदिवस आहे करितां उपोषण केलेंच पाहिजे न केलें तर दोष उत्पन्न होईल कारण विचाररत्नाकरांत मनूचें वाक्य या रीतीचें आहे इकडे लक्ष दे ॥ श्लोक॥ मनुस्मृति॥ योचतुर्थ्यांशुक्लपक्षे अशुक्लेवाप्रमादतः॥ गृण्हातिविषयानंन्नान्स-यातिनरकेऽव्ययः॥ अर्थ॥ जो शुक्लपक्षांतील चतुर्थीस अथवा वद्यपक्षांतील चतुर्थीस उन्मत्तपणानें विषय उत्पादन करणारें अन्न खाईल तो मनुष्य अतिपातकी होऊन नरकांत पडेल गणेशभागवतांतील श्लोक ॥ भक्त्या-भक्त्यागणेशस्यचतुर्थ्यांयदुपोषणंयः करोतिसपापोऽपिमुक्तोभवतिमानवः २॥ अर्थ ॥ भक्तीनें वा अभक्तीनें जो उपोषण गणेशचतुर्थीचे करील तो पात-की जरी असला तरी मुक्त होतो ॥ असो असा गणेश पुराणांत उपासना खंडात चतुर्थीचा महिमा पुष्कळ सांगितला आहे. यांच रीतीनें भविष्य स्कंदमुद्गलादि पुराणांत महिमा आहे. मनूचें वाक्य लक्षांत घेतांच मोरया गोंसावी यांची पत्नी कांहीं न बोलतां मायेनें रडण्यास लागली हें जाणून मोरयागोंसावी ह्मणतात पतिव्रते तुला जर भीति वाटत असेल तर शमीदूर्वा मंदार काष्टाची माळा गळयांत बांध ह्मणजे यमाची भीती नाहीं. असें ऐकल्यावर तिनें सद्गुरुचिंतामणि देवाचे गळयांत माळा बांधिली व त्यास सांगितलें कीं, तूं गणेशाचा धांवा कर तो तुला अन्न देईल. त्यानें मातोश्रीनें सांगितल्याप्रमाणें प्रेमपुरःसर गणेशाचा पद्यात्मक धांवा केला; तो असा॥ पतीत पावन सुंदरा श्रीमोरेश्वरा दाखवि चरण उदारा श्रीमोरे-श्वरा ॥ ध्रु ॥ धांवरे पावरे मोरया मजला येई दयाळा झडकरि येई दयाळा ॥ पुढें भक्तकामकल्पतरु श्रीमोरेश्वर मयुरपुरीं त्याच्या भक्तीनें कळवळले व त्यांनीं सर्व स्त्रियांस स्वादु अन्नें करावयास सांगितलीं; स्वतां

गोसाव्यांचा वेष घेऊन अलक शब्द करूं लागले. नंतर स्वादु अन्न करून अष्टसिद्धिसह सिद्धिबुद्धि सरस्वती आदिकरून सर्व गणेशाच्या स्त्रिया गोसाविणी होऊन देवळांतून बाहेर पडल्या; तेव्हां सर्व लोक भाद्रपदीच्या चतुर्थीस प्रभूच्या दर्शनाला आलेले आश्चर्याला पावले. सर्व लोकांत आश्चर्य असें झालें कीं पाषाणमयमूर्तीच्या डोळ्यांतून पाणी गळलेलें पुसलें तरी पुन्हा जसा मनुष्य कळकळीनें रडतो तसा मोरेश्वराच्या पाषाणमयमूर्तीच्या डोळ्यांतून पाणी गळण्यास लागलें, हें मोठें आश्चर्य झालें. सुजन भाविक लोक मोरेश्वराचा महिमा लोकांस सांगूं लागले. हे जन हो हा मंगलमूर्ति कोणाच्या भक्तीनें प्रेमपुरस्सर रडतो कळत नाहीं, व या देवळांतून एकदम आठ स्त्रियांसह गोसावी हातांत नाना पक्वान्नें घेऊन जातो आहे हा कोणबरें असावा! कांहीं लोक ह्मणाले कोणत्या तरी भक्ताच्या प्रेमानें गोसाव्याच्या वेषानें गणेशच स्त्रियांसह गमन करितो आहे यांत शंका नाहीं. चला. त्या गोसाव्यास शोधूं असें बोलून लोक त्या गोसाव्याचा शोध घेऊं लागले परंतु कोठेंही पत्ता बरोबर लागला नाहीं. पुढें भगवान श्रीमोरेश्वर चिंतामणिच्या भक्तीनें चिंचवडास आले व लोकांस लीला दाखविण्याकरितां मोरयागोसांव्यांच्या घरीं येऊन अन्न मागूं लागले. परंतु घरांत चिंतामणीची माता ध्यानस्त बसल्या कारणानें व सद्गुरु मोरयागोसावी हे मोरगांवीं यात्रेस गेल्या कारणानें चिंतामणि देव मात्र घरांत होते. त्यांनीं सांगितलें कीं आज उपोषणाचा दिवस आहे तर अन्न मिळणार नाहीं. व मजजवळ शमी दूर्वा व मंदार काष्ठांच्या माळेशिवाय दुसरें कांहीं नाहीं. पुढें चिंतामणीनें गोसाव्यांचा हेतू जाणुन आनंदानें पूजा केली व ती मंदारकाष्टाची माळ व दूर्वाशमी गोसाव्यास अर्पण केली. गोसावी संतुष्ट होऊन चिंतामणीस नेत्र उघडून पाहा असें सांगतांच मनोभावानें चिंतामणी देवास प्रत्यक्ष शुंडादंड विराजित सिद्धिबुद्धिसह गणेश दिसले. आणि भगवान् ह्मणतात हे चिंतामणे हें घे तुला अन्न मी तुझ्या भक्तीनें निजस्थान सोडून गोसाव्याच्या वेशानें येथें येणें केलें

का. नं
६५
८



तुझा देह निरोगी होईल जसा तुझा बाप प्रत्यक्ष मोरयाच व माझ्याच वंशाचा आहे व त्याला मी गोसाव्याचे वेषानें उठवून त्याचें नांव मोरयागोसावी असें ठेविलें, तसेंच तुझें नांव प्रस्तूत अन्न देऊन तुझा हेतू गोसाव्याच्याच वेषानें परिपूर्ण केला, यास्तव तुलाही चिंतामणि गोसावी असें लोक ह्मणतील. तूं व मी यांमध्यें भेद नाहीं, असा साक्षात्कार पुढें लोकांस दिसेल. असें सांगून मोरेश्वर स्त्रियांसह गुप्त झाले. देवास जेव्हां पाहिलें त्यावेळींच चिंतामणि देवानें हें पद केलें व जनांस सांगितलें; " मज सुख पावलें हो मोरया देखिला हो " इत्यादि मुलानें सर्व हकीकत आपल्या मातोश्रीस सांगितली. मातोश्रीनें आल्यास प्रभूनें दर्शन दिलें नाहीं व गोसाव्याच्या वेषानें मुलांस अन्न आणून दिलें हें जाणून आश्चर्य व खेद पुष्कळ केला. चिंतामणी हें जाणून गणेशाचा पुन्हा धांवा करावयास लागला, व जसा मुलगा लडिवाळपणानें बापापाठीमागें धांवत जातो तसा धावूं लागला. मोरयाचा धांवा कोण करितो आहे असें मोरयागोसाव्यास वाटून तो इकडे तिकडे पाहूं लागला, तोंच आपला मुलगा चिंतामणी धांवा करीत आहे असें दृष्टीस पडलें. व सर्व हकीकत ऐकून घेऊन मोठ्या आश्चर्यानें व मोठ्या प्रेमानें रडूं लागले व मुलास ह्मणाले " हे मुला चिंतामणें माझें वय एकशें चौदा वर्षांचें झालें, परंतु मोरेश्वरीं मोरयाचे दर्शन झालें नाहीं व ते कधींहि घरीं आले नाहींत तर त्यांनीं आज प्रत्यक्ष तुला दर्शन चिंचवडींत दिलें व माझ्या पत्नीस व मला दर्शन दिलें नाहीं या करितां आज मोरयाला घरीं आणल्यावांचून राहणार नाहीं. पतिव्रतेकरितां मोरयास दर्शनास घेऊन येतों. असें सांगून मुलांस घरीं जाणे बद्दल त्यांनीं आज्ञा केली. चिंतामणिनें घरी येऊन हकीकत सांगितली परंतु तिचा निश्चय असा झाला कीं मोरया आल्यावांचून अन्नच घेणें नाहीं. पुढें सद्गुरु मोरयागोसावीमोरेश्वराचा रस्ता क्रमीत क्रमीत कऱ्हेच्या तीरीं आले. तें पात्र पावसानें फार विशाल झालें होतें. तें उतरून पार जाणें कठीण होतें तेव्हां धांवा करावयास लागले कीं " तुझी या भेटीची बहुआसरे मोरया " या नांवाचें

पद केलें तो करुणायुक्त धांवा ऐकून मोरेश्वरास दया आली व कोळ्याच्या रूपानें देव तेथें प्रगट होऊन त्यांनीं सद्गुरुस नदीपार केलें व गुप्त झाले. सद्गुरु लीन स्वरानें आक्रोस करीत करीत राउळीं आले. मध्यरात्र उलटून गेल्या कारणानें व यवनांच्या भीतत्रीनें देवाचें द्वार लाविलें होतें व सभांवतीं हजारो लोक यात्रस्थ तउरले होते हें पाहून देवाच्या उजव्या बाजूच्या तटींच्या झाडाखालीं उभा राहून हात जोडून सद्गुरु मोरयागोंसावी प्रार्थना करूं लागले व " तैसें माझें मन तूज कारणी " हें पद केलें. व देवांस ह्मणाले प्रभोभक्ताचा हेतू परिपूर्ण करणारा तूंच आहेस तर या झाडा खालीं मला दर्शन द्यावेंस व माझी, पूजा ग्रहण करावी असें ह्मणून तटींच्या झाडा खालीं आसन मांडून ते बसले व प्रेमानें नेत्रांतून अश्रु टाकण्यास लागले. हें जाणून भगवान तटींच्या झाडा खालीं सर्व स्त्रियांसह देवळांतून आले मोरयागोंसाव्यास भेटले व ह्मणाले, मोरया मला पहा मी प्रत्यक्ष शुंडादंड विराजित तुझ्यासमोर उभा आहे माझी पूजा करावीस तू फार वृद्ध व अती थकलास याकरितां मीच तुझ्या घरीं येतो असा शब्द ऐकल्यावर व मोरया आला हें जाणून सद्गुरु मोरयागोंसावी उभे राहिले व हस्त जोडून प्रार्थना करूं लागले व पद्य रचनात्म स्तवन करून ह्मणतात ॥ पद ॥ भावश्रम हारलाहो मोरया देखीलाहो ॥ शुंडादंड उभारिला ॥ नाभी नाभीसे बोलला १॥ आला लवलाही धाउनि ॥ भेटी दिधली आलिंगुनि ॥ इ० नंतर स्तवनें करून पूजा करावयास लागले पूजा संपल्यावर देव देवळांत गेले नंतर दिंडी हातांत घेऊन यात्रेकरी लोकांस ह्मणतात जनहो माझा स्वामी मोरया यास आज मी प्रत्यक्ष पाहिलें. उद्यां स्नानास गणेश तीर्थीं गेले कीं गणेश पाषाण रूपानें माझ्या हातांत येणार आहे व पाषाणमय जरी प्रभुचि मूर्ति तरी माझ्याबरोबर बोलूं लागेल मी त्याला जेवूं घालीन सर्वांनीं पाहावें असें ह्मणून जितके प्रभूचे अंगावर दागिने व भोगविलास होते तितके लोकांस पद्य रचना करून सांगितले. प्रथमतः ' आणि अवतार ' हें पद, नंतर ' माझ्या स्वामीचे भोगविलासरे ' इत्यादि मोरया

गोसाव्याचीं पदें व खरा भाव जाणून जन आश्चर्याला पावले. मग द्वारयात्रा करूं लागले सद्गुरूस लोटांगणीं येऊं लागले प्रातःकाळ झाल्यावर गणेशाच्या आज्ञेप्रमाणें हजारों जनासह कऱ्हेच्या तिरीं गणेश तीर्थांत स्नान करावयास लागले तोंच गणेश पाषाण मय हातांत आला व आकाशांतून पुष्प वर्षाव झाला नदीचे पलीकडे नाना पुष्पें दूर्वाशमी नैवेद्याचे सामान दिसावयास लागलें तेव्हां लोक आश्चर्याला पावले अक्बर बादशहाच्या बापाचा अल्लाउद्दीन हा सरदार सूप्याहून चमत्कार पाहण्या करितां मुद्दाम आला तें पाहिलें. व मोरयागोसांवी देवास फुलें नैवेद्य कोणी आणिलीं हें पाहण्यास जेव्हां लागला तेव्हां नदीपलीकडे एक जुनाट शमीचा वृक्ष होता तेथें सर्व देव हात जोडून मंगलमूर्तिमोरया असा ध्वनी वरचेवर काढूं लागले. मोरयागोसाव्यांनीं देव गणेशाच्या दर्शनास आले आहेत असें जाणून त्यांच्या जवळ गेले व शमीच्या झाडाखालीं बसून सर्व शाखेची भाजी व रोडगा करून त्यांनीं देवास जेवूं घातलें हें लोकांनीं प्रत्यक्ष पाहिलें नंतर अवशेष नैवेद्य गोसाव्यांनीं सर्व लोकांस दिला. देवांनीं उच्छिष्ट रज राहिलेले पक्ष्यांच्या वेषानें खाल्लें हें जाणून मोरयागोसावी सर्वांस ह्मणतात कीं माझ्या वंशजानं याच ठिकाणीं अन्न संतर्पण जीव मात्रांस घालावें ह्मणजे त्यांचें कल्याण होईल यास्थळीं ब्राह्मण बसवून अंतज्यापर्यंत जीव एक सारखे जेवीत त्याप्रमाणें हल्लीं त्या ठिकाणास पोळी याप्रमाणें त्यांचे वंशज ह्मणतात व भोजन सर्वांस देतात. उच्छिष्टास अत्यंजानें जरी स्पर्श केला तरी दोष नाहीं असा अद्यापपर्यंत साक्षात्कार चालूं आहे पुढें मोरयागोसावी मोरया देऊन चिंचवडास निघाले. बरोबर ठळक मंडळी किती होती त्यांची याद अशी कोल्हापूरचे जोशीराव यांच्या वंशातील मुख्य पुरुषाचे आजे चिमण जोशी व जुन्नरचे यजर्वेदी पारायणी अप्पाभट; वऱ्हाड प्रांतांतील गुरनेर गांवांतील चिमणाजी गोविंद कुलकर्णी, चिंचवडांतील पवाराच्या मुलीच्या वंशांतील हरि बिन खंडु मऱ्हाठा, अंबळनेरकर अल्लाउद्दीन सरदार, कऱ्हाडचे देशपांडे यांच्या वंशातील चिमणाजी अप्पाजी, व

ढवळेकर पुरोहित काशींतील गोघाटांतील रामचंद्र बिन अपादे व घनपाठी ब्राह्मण नाशिकांतील गोविंद सखाराम मोडक, आशाळ गांवचा पाटील आदिकरून पुष्कळ मंडळी आहेत पण येथें विस्तार भयास्तव पुरें करितों. इतक्या मंडळीसह पवाराच्या जमिनीपर्यंत मोरयाला घेऊन सद्गुरु आले. चिंचवड पाहून गणेश नर्तन करावयास लागले. दिव्य पितांबर आकाशांतून मृदंगबोल व पायांतील पैंजणांचा मंजुळ शब्द पाहून प्रेमानें सद्गुरु पाठीमागें बघावयास लागले तें पाहून मोरेश्वर ह्मणतात " मोरया, पाठीमागें जराकां बघीतलें नसतेंस तर तुझ्या घरीं चंद्रसूर्य आहेत तों पर्यंत मी अवतीर्ण झालों असतों; असो पुढें चल " नंतर मोरयागोंसाव्यांनीं भवितव्य जाणून त्याच जागीं पाषाणाची मुर्ति करून बसविली व घरीं आले पत्नीच्या ओव्यांत मोरेश्वरास ठेविलें पत्नीनेंही त्या मोरयास पाहून व हकीकत ऐकून प्रेमानें स्तवन केलें. नंतर प्रभूनें पतिव्रतेस प्रत्यक्ष दर्शन देऊन आनंदित केलें. असा सर्व साक्षात्कार पाहून लोक भजनीं लागले. पुढें पुष्कळ जगदोद्धाराचीं कार्यें करून व आपलें वय फार झालें ह्मणून आपण गुप्त रीतीनें असावें असें जाणून त्यांनीं सुमारें १४८४ शतकांत पत्नीसह समाधि घेण्याचा निश्चय केला. व पुढें मार्गशीर्ष वद्य षष्टी रोजीं माध्यांन्हकाळीं पत्नीसह सद्गुरुनीं समाधी घेतली, त्यावेळेसही दर्शनास हजारो लोक आले होते देवही भेटले. पुढें चिंतामणि गोंसावी यांनींहि पुष्कळ चमत्कार लोकांस दाखविले मार्गशीर्ष वद्य १ रोजीं मोरयागोसाव्याच्या पुण्यतिथीस हजारो लोक आले होते त्यात एक अनगडशहा फकीर तुंबा भरून धान्य मागण्या करितां आला; तुंब्यांत किति जरी अन्न व धान्य घातलें तरीही भरेना असें जाणून चिंतामणिगोंसाव्यानें भरण्याकरितां दूर्वापत्र तूंब्यांवर टाकिलें तेव्हां तुंबा अन्न व धान्य बाहेर जमीनीवर टाकावयास लागला. शेवट जितकें धान्य चिंतामणीगोंसाव्यानें दिलें तितकें जमिनीवर तुंब्यांतून निघून तुंबा भरपूर भरला हें जाणून अनगडशहा फकीर गप्प बसला व नमस्कारकरून प्रार्थना करूं लागला. कांहीं वेळानें रामदास

आले व त्यांच्या पाठी मागून तुकाराम साधु आले त्यांचाही आदर सत्कार करून भोजन करून जावें असें चिंतामणीगोंसाठ्यानें त्यास सांगितलें. नंतर तुकाराम रामदास हे कांहीं कान गोष्ट करून सद्गुरु चिंतामणी गोसाव्याचा अंत पाहण्यास लागले सर्व मंडळी पानें मांडून व त्यावर अन्न वाढून तटस्थ उभे होते हें जाणून तुकाराम ह्मणाले " चिंतामणी देवा पानें वाढून मंडळी स्वस्थ बसली आहे, व आपली वाट पाहत आहे. तेव्हां सद्गुरु चिंतामणी गोसावी ह्मणाले सर्वांनीं भोजनास बसावें मग तुकाराम सद्गुरुस बोलूं लागले कीं तुह्मी मोरयास जेवण्यास प्रत्यक्ष आणलें पाहिजे. मी विठोबास आणतों. रामदासांनीं तुकारामास कांहीं कानांत सांगितलें. परंतु सिद्धि साक्षात्कार दाखवावा असें त्यास वाटलें. पुढें अन्न शिळें होण्यास लागलें सद्गुरुनें आपल्यास हा छळण्या करितां आला असें जाणून त्यांस ह्मणाले" तुकाराम एवढी थोरवी मनुष्यास नको अहंकारें सर्व नागावले आहेत. मोरया जीव मात्राहून भिन्न नाहीं. तथापि तुकाराम हट्टच धरून तुमच्या सुकृतानें मोरयाला मी आणतों असें ह्मणावयास लागला नंतर. चिंतामणि गोंसाव्यानें स्तुतिपर अभंग तुकारामास ह्मणावयास लाविलें व स्वताःच शुंडादंड विराजित सिद्धि बुद्धिसह मोरया होऊन तुकारामास ह्मणाले "हे तुकारामा माझ्याकडे पहा मी गणपती आहे" तुकारामांनीं व रामदासांनीं प्रत्यक्ष चिंतामणि गोंसावी शुंडायुक्त पाहून साष्टांग दंडवत नमस्कार घातले व पूजा करून रामदासांनीं आरती "सुखकरितां दुःखहरितां" ही पद्य रचनात्मक केली. तुकारामानें " माझा देव तूझी वागवीतो लाथ " इत्यादि चार अभंग देवावरचे करून ते मंडळीसह भोजन करून घरीं गेले रामदासही आनंदानें अनगडशाहा फकिरासह निघून गेले. जातेवेळीं तुकाराम व रामदास अनगडशाहा फकीर सद्गुरु चिंतामणी गोसाव्यास नमस्कार घालून ह्मणतात; महाराज आपणच प्रत्यक्ष मोरया देव आहा, आह्मी तुमचा महिमा प्रगट करावा याच हेतूनें येथें आलों. असें बोलून गेले त्या दिवसा पासून सद्गुरु चिंतामणि गोंसाव्यांस

सर्व लोक देव ह्मणूं लागले व त्यांच्या वंशांतील सर्व लोकांस देव या उपनांवानें सर्व लोक हल्लींही ह्मणत आहेत. चिंतामणि महाराज चतुर्थीस मोरेश्वरीं प्रभूच्या दर्शनास आले असतांनां तेथें म्लेंच्छ लोक काशी पासून देवळें फोडीत फोडीत मोरेश्वरीं आले होते. हें त्यांनीं पाहिलें परंतु हे साधु आहेत असें जाणून अक्बर बादशाहाच्या नातवानें म्लेंछासह त्यांस सलाम केला, व त्यानें सांगितलें कीं आह्मीं देवास नैवेद्य आणिला आहे तो आपण स्वीकारावा. परंतु ते मांसाचें अन्न होतें ह्मणून त्यावर गणेश नामांमृताचा शिडकावा उदकानें केला असतांना त्या अन्नाची गुलाबाचीं फुलें झालीं तें म्लेंच्छ लोकांच्या फकीरानें पाहून आश्चर्य मानिलें व सर्व चरणीं लागले व तेंव्हांच त्यांनीं कांहीं रुपयांची जाहागिरी करून दिली व निमुटपणानें म्लेंछासह अकबर बादशाहाचा नातू निघून गेला तें पाहून लोक देवाचे भजनीं फारच लागले. चिंतामणी देवांनीं ती सनद मोरेश्वरीं गुरवाजवळच ठेविली. सद्गुरु चिंतामणि निर्द्वंद्व निरपेक्ष असल्या कारणानें त्या सनेदवर इच्छा करते झाले नाहींत. पुढें कांहीं दिवसांनीं जिल्हा सातारा तालुके वाळवें पेटा इसलांपुरनजीक रेठरेधरणाचें येथील अति संसारानें त्रस्त झालेला मल्हारभक्त रामभट्ट या नांवाचा विश्वामित्र गोत्रांतील उंडाळकर या उपनांवाचा ब्राह्मण सद्गुरु चिंतामणी देव यांच्या भेटीस आला व सद्गुरु चिंतामणि देव यांचे चरणीं लागला. नंतर एकाक्षर मंत्राचा उपदेश सद्गुरु चिंतामणि देव यांनीं त्या ब्राह्मणास करून प्रतिमासीं चतुर्थीस मोरयाच्या दर्शनास मयूरपुरीं यावें असें सांगितलें त्याप्रमाणें तो ब्राह्मण यात्रा करीत असतांना कांहीं दिवसांनीं मोरयाचे प्रसादें तेथें उदयास येऊन त्यांचें नांव गणेश देव पडलें हे गणेश देव गांव मंडळीसह दिंडी घेऊन मोरेश्वरीं येत असतांनां मंडळीनें सांगितलें कीं आह्मी पंढरपुरीं जाणार. पुढें गणेश देवही पंढरपुरीं आले व प्रेम पुरःस्कर मोरयाचीं पदें ह्मणत असता पंढरपूर मयूरपुरी दिसली तेंव्हां लोकांनीं आमचीं पंढरपुरी आह्मास दाखवावी असें लोक ह्मणूं लागले ते वेळेस गणेश देवानें

मंडळीस पुंडलिकाजवळ तुकाराम साधूपाशीं आणून मंडळीचा आग्रह कळविला. तुकारामानें विठ्ठलावर बरेच अभंग ह्मटल्याकारणानें लोकांचे नजरेस पंढरपूर दाखविलें. नंतर गणेशदेव ह्मणतात जनहो! इकडे लक्ष द्यावें. ॥ श्लोक ॥

जसा भाव राहे तसा देव आहे ॥ मना पूर्ण हें जाण तूं त्यासी पाहे ॥
सदा रक्षितां संकटीं पाशपाणी ॥ नुपेक्षी कदा ढुंढिभक्ताभिमानीं ॥ १ ॥

लोकांस दोघां साधुंची भक्ती पाहून आनंद वाटला. गणेशदेव तुकाराम साधुसह मोरेश्वरीं आले. तेथें मोरयाचें दर्शन घेऊन सद्गुरु चिंतामणि देवांनीं महाराजांस नमस्कार केला. तुकारामानेंही दंडवत केला. तेथेंही तुकारामानें विठ्ठलपर पुष्कळ अभंग ह्मटले. तेव्हां लोकांस मयूरपुरीचें पंढरपूर दिसूं लागलें. नंतर सद्गुरु मल्हारभक्तराम यांनीं गणपतीवर पदें ह्मटलीं तेव्हां, पूर्ववत मयूरपूर दिसण्यास लागलें. नंतर तुकारामानें पुष्कळ अभंग भक्तिपुरःस्कर ह्मटले. पण पुन्हां मयूरपुरी पंढरी दिसली, नाहीं; हें चिंतामणी देव यांनीं जाणून तुकारामास सांगितलें तुकारामा हा गणेशभक्तकामकल्पतरु सर्व रूपानें नटला आहे परंतु तुझी चित्तवृत्ती विष्णुस्वरूपाकडे आहे तर तुला तुझें मुख्य दैवत जें लक्ष्मीनारायण हें दिसेल. असो मी मोरयास आळवून लक्ष्मीनारायणरूप दाखवितों इतक्यांत कांहीं निःशिम शैवांनीं सद्गुरुची प्रार्थना केली कीं आह्मांस शिवरूपमोरया दाखवावा असें ह्मणतांच प्रथमता सद्गुरु चिंतामणी महाराज यांनीं हा गणेश शिवरूप पाहावा असें ह्मणून पद ह्मणावयास लागले. तें हें "गजानन माझा शिवरूप जाहला। विश्विम्यां पाहिला आजि डोळां। सिद्धिबुद्धिदोनि गंगागौरि " इत्यादि नंतर लक्ष्मीनारायण रूपही दाखविलें तात्पर्य शंकर लक्ष्मीनारायण सिद्धिविनायक अशीं तीन रूपें दाखवितांच सर्वांना आनंद झाला. तुकारामांनीं सद्गुरुचें महद्भाग्य पाहून जसा देह व वाणा त्याप्रमाणें अभंग करून ते नमस्कार करिते झाले तो अभंग असाः—" शिरिं जटाजूट त्रिपुंड टिळक ललाटिं सुरेख शोभताहे ॥ १ ॥ भ्रूमध्यें शेंदूर रक्तवर्ण फार प्रेमानें

गाहिंवर येत आहे ॥ २ ॥ नेत्रीं अश्रूधारा कंठ सद्गदीत पहातां गणनाथ हर्षी पावे ॥ ३ ॥ विस्तीर्ण शोभतें कैसे उरस्थळ प्रवाळमणी माळ गळां शोभे ॥ ४ ॥ कौपिन लंगोटी गळां कफनि आहे हातिं स्मरणि राहे सदोदीत ॥ ५ ॥ अजानुबाहु दंड पावुले सुरेख प्रत्यक्ष विनायक शोभताहे ॥ ६ ॥ अमोल हा बाणा तुमचा सद्गुरु देवा तुका ह्मणे सेवा काय करूं ॥ ७ ॥"

असा अभंग ह्मणून तुकारामांनीं आपण या देवळांत आलों हें स्मरण सदोदीत लोकांस राहावें ह्मणून वृंदावनाखालीं विठ्ठलाची पाषाणाची मूर्ति करून बसविली. पुढें ते निघून गेले. नंतर यात्रा करून सद्गुरु चिंतामणीदेव गुरुघरीं आले. त्यांच्या पाठीमागून हे गणेश देवही चिंचवडीं गेले. नंतर सद्गुरुस नमस्कार करतांच सद्गुरु चिंतामणी गणेशदेवास प्रीतीनें एक गणेशाची मूर्ति देते झाले. परंतू गणेशदेवाचा भाव तुकारामाच्या हेतुकरितां जें पद सद्गुरुनीं केलें त्यावर गेल्या कारणानें गणेशाचि जी पाषाणमय मूर्ति होतिं तिचे तीन वर्ण व ती बाणाकृती मूर्ति झाली, तें तत्व जाणून चिंतामणि गणेशदेवांस ह्मणतात, हे मल्हार भक्त रामा तुझा भाव माझ्या पदावर पूर्ण आहे, याकारणानें गणेश मूर्तीचा बाण झाला हा घेऊन जावास. आपलें गावीं याची स्थापना करावी या देवास कलाधरेश्वर असें लोक ह्मणतील.याचे तीन वर्ण लोकांस दिसतील. मुळीं, शाम, मध्यें श्वेत, व मस्तकीं रक्त. याप्रमाणें या बाणाची जो पूजा करील तो इच्छित फल पावेल. मोरयानें शिवकला, विष्णुकला, धरल्या, याकरतां या बाणाचे तीन वर्ण, विष्णु व गणपतिरूप दिसण्याकरितां होतील. कलाधर ह्मणण्याचेंहि कारण हेंच आहे. पुढें सद्गुरुचा निरोप घेऊन गणेश देव घरीं आलें. त्यांनीं देवाची स्थापना केली व कलाधरेश्वर असें नामाभिधान ठेविलें. पुढें कांहीं दिवसांनीं म्लेंच्छ लोक त्या गांवांतील स्वयंभू देवळें फोडण्याचे निमित्तानें आले होते. परंतु हे गणेशदेव देवालयीं जावून गणेश प्रसादानें हजारों शिवलिंगें दाखवावयास लागले. व तीं लिंगें हल्लीं दिसताहेत. हा चमत्कार पाहून निमुटपणानें सर्व निघून गेले ही बातमी बादशाहाला कळवतांच त्यानें कलाधरास उत्पन्न दिलें,

तें उत्पन्न एक हजार रुपयांचें आहे. व त्या जमीनीची इनामी सनद दिली त्या जमिनीस कलाधराचा इनामच ह्मणतात. कांहीं दिवसांनीं मार्गशीर्ष वद्य ६ रोजीं गुरुवारीं शके १५५७ नांत त्या इनाम जमीनींतच त्यांनीं देह ठेविला. चितेंतून स्वयंभू पाषाणमय गणपति निघाला तो हल्लीं आहे. व त्याचा उजवे बाजूस शमीचा वृक्ष आहे. त्या गणपतीस हल्लीं रानटी लोक कवचाचा ह्मसोबा ह्मणून हजारों लोक नारळ फोडतात. गणेशदेवाचा देह कवच्यांतून गणपति निघाला ह्मणून त्याचें नांव कवच विनायक आहे. असें त्यांचे वंशज ह्मणतात. हल्लीं त्यांचे वंशज गणेश मार्ग प्रवृत्त करावा या विषयीं यत्न करीत आहेत. व त्यांनां इसलामपुरकर हरिदास प्रस्तूत ह्मणतात. चिंतामणि देवानें आपला परम शिष्य स्वानंदपुरास गेला. हें जाणून आपणही समाधी घेण्याचा निश्चय केला. स्वप्नांत मोरयागोसाव्यानें येऊन सांगितलें कीं, आपण देह ठेवावा. त्याप्रमाणें पौष वद्य ४ रोजीं चंद्रोदयीं भोजनांतीं देह ठेविला. व त्यांच्या चितेंतूनही गणपति निघाला. त्यांस ज्या जाग्यावर दग्ध केलें त्या ठिकाणीं शुंडादंड पाषाणावर गणपति उमटला आहे. पुढें यांचे चरंजीव नारायण महाराज हे थोरपणीं फार चमत्कार करूं लागले. जवळचा परीस कांहीं कारणानें गेल्यावर मार्गशिर्ष वद्य ६ चे दिवसीं मोरयागोसाव्याची पुण्यतीथी असते, त्या दिवसीं हजारो लोक प्रसादास येतात, हें जाणून गणेशावर भार ठेऊन चाकणच्या किल्ल्यांत मंत्र सामर्थ्यानें जाऊन त्यांनीं द्रव्य लुटून आणिलें. त्या द्रव्याचें धान्य घेऊन उत्साह परिपूर्ण केला. असे कांहीं दिवस गेल्यावर नारायण महाराज स्वसत्तेनें गणेशाचा चमत्कार दाखविण्याविषयीं चाकणच्या किल्ल्याच्या अधिकाऱ्याच्या हातांत सांपडले. त्यांनीं त्यांचा पुष्कळ छळ केला. पण व्यर्थ गेला. मांसाचें अन्न महाराजापुढें खाण्यास ठेविलें असतांना त्या मांसाची दूर्वा व फुलें महाराजांनीं करून दाखविली. यवनानें हा हिंदुचा मोठा अवलीया आहेसें जाणून त्यास नदर कैदेंत ठेविलें. पुढें मोरयागोसाव्याचा उत्साह वद्य द्वितीये पासून सुरू होण्याचा, व मंगळमूर्ति बाहेर खारकेच्या अंगणांत

येऊन बसावयाचे, नंतर धुपार्ती पूजा वगैरे व्यवस्था तेथेंच व्हावयाची, हें सर्व जाणून यवन राजास नारायण महाराज विनवूं लागले. परंतु यवनास तें सर्व कर्म खोटें वाटून तो उलटा छळ मात्र करण्यास लागला. नारायण महाराजांनीं आपणांस हा यवन सोडीत नाहीं असें जाणून मोरयाची प्रार्थना केली. त्या योगानें गणेश प्रसन्न झाले. व गणेशानें त्यांस चिंचवडीं आणिलें या रीतीनें चार दिवस उत्साह झाला पुढें यवन राजानें विचारलें कीं तूं हिंदुचा फकीर जर आहेस तर तूं आपला नेम कसा सोडलास? कां धूपार्तीस व पूजा करण्यास गेला नाहींस? हें ऐकून महाराज ह्मणतात यवना, माझा नेम कधींही टळणार नाहीं मी नित्य पूजा व धुपार्ती ब्राह्मणभोजन वगैरे करून तुझे घरीं पुन्हां येतों. हें ऐकून यवनास राग आला व नारायण महाराजास पेटींत घालून कुलूप लाऊन अतिशय बंदोबस्तीनें ठेविलें व सभोंवतीं स्वार रक्षण करण्यास ठेविले नंतर स्वतांही आपण चिंचवडीं कांहीं सैन्यासह येऊन पोंचला. धुपार्तीची वेळ झाली ती पाहून एकसारखा चोहोंकडे पाहूं लागला. परतु नारायण महाराज पेटींत असल्याकारणानें महाराजांचा कांहीं इलाज चालेना; त्यांनीं मोरेश्वरास पुष्कळ आळविलें त्या योगानें गणेशानें पठाणाचा वेष घेऊन, घोड्यावर बसून पेटीजवळ आले; व पेटी फोडून नारायण महाराजास गणेशानें आपल्या पुढें घोड्यावर बसविलें. नंतर नारायण महाराज ह्मणतात बापा तूं कोण आहेस हें ऐकून मोरेश्वर ह्मणतात मी तुझ्या आजाच्या घरचा जन्मोंजन्मीचा बंदा चाकर आहे मी तुझ्या बापाचा जिवलग मित्र आहे माझें काम प्रसंगाचे वेळीं आहे या प्रसंगीं जर मी कार्य केलें नाहीं, तर तुझ्या आजास हा आपला चाकर खोटा असें वाटेल तो पुन्हा माझेवर विश्वास ठेवणार नाहीं असें बोलून भरधांव घोडा पळविला. हजारो स्वार पाठलाग करते झाले; पण कोणाचें कांहींही चाललें नाहीं. धूपार्तीची वेळ झालेली सर्व लोकांनीं जाणली व अद्याप महाराज का येत नाहींत असी वाट पाहत लोक बसतात तों एकदम नारायण महाराज घोड्यावरून उतरून

स्नानादि क्रिया करून धूपार्ती घेऊन मोरया पुढें उभे राहिले नंतर यवनानें तें कर्म जाणून आपल्या जनास हुकूम केला कीं अगोदर त्या पठाणास धरून सुळीं द्यावें व हिंदूच्या •फकिरास धरावें हें ऐकतांच पठाण यवनाच्या पुढें आला व ह्मणतो यवना जर माझें नांव काढशील व माझ्या यजमानास छळसील तर तुला ठार मारीन; ही पहा माझ्या हातांत तरवार आहे पुढें यवनराजास फारच राग आला आणि पठाणास धरण्याविषयीं जनास हुकूम केला जन धरण्यास जातात तोंच त्या ठिक-णीं भगवान गुप्त झाले. जेथें गुप्त झाले तेथें स्मरणार्थ व त्यावर कोणी वसूं नये ह्मणून त्याच ठिकाणीं एक पाषाणाची पायरी केली आहे त्या पायरीवर बालबोध अक्षरानें लिहिलें आहे कीं जो कोणी पायरी काढील त्याचा वंशक्षय होईल. हें कृत्य पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें यवन निमुटपणानें सैन्यासह चाकणच्या किल्ल्यांत गेला पुढें कांहीं दिवसांनीं एक हजार फकीर बरोबर घेऊन नारायण महाराजांची परीक्षा पाहया-करितां तोच यवनराजा आला व सायंकाळीं सर्व फकीर येऊन ह्मणतात आह्मांस खाण्यास कांहीं द्यावें भूक लागली आहे नंतर नारायण महा-राजांनीं एक जोंधळ्याची भाकरी केली व ती एका भांड्यांत घालून वर झांकण घातलें नंतर गणेशनामामृताचा त्या भाकरीवर शिडकावा केला व दूर्वा त्या भांड्यावर ठेऊन फकीराच्या समोर आले व गणेशाच्या सत्तेनें तितक्याही फकीरास ती एक भाकरी पुरविली. हें यवनानें जाणून तो सर्वांच्या पाठीमागें उभा राहिला तें नारायण महाराजानें जाणून ह्मणतात वा फकीरा सर्वांनें भाकरी घेतल्या तूं कां उगाच उभा राहि-लास तें सांगावें नंतर तो पुढें आला आणि ह्मणतो मी तुझ्या हातांतील भाकरी घेतों पण माझें जर ऐकशील तर मी तुझें वचन मान्य करीन महाराजानें बरें आहे असें सांगतांच हात जोडून पुढें उभा राहिला व आपल्या वडलांनीं करून दिलेल्या सनदा चिंतामण महाराजास दिल्या व ह्मणूं लागला आपण मोठे हिंदूचे फकीर अवलिया आहां तर कृपा करून सनदा घ्या त्यापुढें नारायण महाराज वचनपाशानें

वद्ध झाल्या कारणानें त्या सनदा घेऊन यवन राजाचा पुष्कळ आदर केल्यानें यवन खुष होऊन फकिरासह घरीं आला. पुढें कांहिं दिवसांनीं भादवीच्या उत्साहास महाराज जात असतांना रस्त्यावर एका देसायाची बायको मेली, हें जाणून नारायण महाराजानें आपली आवडती प्रियपत्नी ईस देह ठेवण्यास सांगितला तिणेंहि तात्काळ देह विसर्जन केला. पाटलाची बायको उठविली. पाटील देसकीचें काम करी ह्मणून त्यास देसाई ह्मणत होते त्या पाटलानें आपली बायको आपल्या गुरुनें उठविली हें जाणून तो महाराजाचे चरणीं लागला महाराजानें आपल्या पत्नीचें और्ध्व दैहिक कर्म केलें, व चिता भरून टाकतांच तेथें चमत्कार दिसला तो असा कीं ज्या दगडावर तिला दग्ध केली तेथें शुंडादंड आडवी गणेशमूर्ति. उमटली देसायानें पाहून त्या पतिव्रतेची समाधि बांधून कांहीं उत्पन्न करुन दिलें आहे. तें हल्लीं चालू आहे पुढें महाराज मोरेश्वरीं जाऊन यात्रा करून घरीं आले. कांहिं दिवसांनीं साष्टि, वसई ह्या ठिकाणीं फिरंगी लोकांनीं हिंदुधर्म बुडवावा हा यत्न सुरू केला पाहून अंजुर-कर गंगाधर नाईक हे पेशव्याचे ठिकाणीं कांहिं दाद लागत नाहीं जाणून चिंचवड मुक्कामीं जाऊन त्यानें उपदेष घेऊन एकवीस दिवस अनुष्ठान केलें पुढें नारायण महाराज स्नानास आले असतां त्यांस दंडवत घालून प्रार्थना केली कीं आज एकवीस दिवस गुरु कृपेनें अनुष्ठान पुरें झालें. व मोरयानें स्वप्नीं येऊन आपणांस शरण जाण्यास सांगितलें व आपणांसच विचारावें असा प्रभूचा हुकूम झाला आहे तर माझेवर कृपा करावी नंतर महाराजांनीं कळविलें कीं तूं क्षत्रिय वंशांत उत्पन्न होऊन स्वधर्म रक्षण करणेस यत्न करितोस तर तुजला मी तरवार देतों ती ही घे व हा उज-व्या शुंडेचा गणपति देतों हा कार्य सिद्धि करील असें ह्मणून पाण्यांतून एक धोंडा काढून दिला, तो उजव्याच सोंडेचा गणपति दिसला. गंगाधर नाईक महाराजास दंडवत घालून निघाले ही बातमी पेशव्यास कळतांच कांहीं मदत देऊन वसईस चिमणाजी अप्पा आले व मुरहरी नाईक हा मोठा शूर होता. हा गंगाधर नायिकाचा धाकटा बंधु होता, त्याच्या

मस्तकावर गंगाधर नाइकांनीं हात ठेऊन सांगितलें मी गुरुप्रसाद मिळ-
वून आलों आहे तर तूंच फौजेचा अधिकारी हो तुला मोरया यश देईल
मी पाठीमागें तुझ्या रक्षणास आहे. तात्पर्य, त्यांनीं तो किल्ला हस्तगत
केला व आपला भगवा झेंडा किल्ल्यावर चढविला, परंतु मुरहरि नाईक
आनंदानें बेसावध असल्यानें गोळी लागून हक्क झाले. हें पाहून गंगाजी नाइ-
कास बंधूचा वियोग सहन झाला नाहीं ते अतिशय शोक करूं लागले. नंतर
गणपतीनें स्वप्नीं येऊन त्यांचें समाधान केलें पुढें गंगाधर नाईकास
जाहागिरी मिळाली. नारायण महाराजांचे हातांतील प्रासादीक गणपति
हल्लीं गंगाधर नाईक यांच्या वंशांत अंजुर एथें आहे, व तेथें उत्साह सुरू
आहे. महाराजाचा एक अतिशय प्रेमांतील शिष्य जहाजांतून बसून
कांहीं कारणानें समुद्रांतून जात असतांना जहाज बुडूं लागलें तें महा-
राजानें वायु वेगानें येऊन स्वसत्तेनें कडेस नेलें व त्या ब्राह्मणाला यवन
राजा कडून कांहीं उत्पन्न करून दिलें आहे, तें हल्लीं चालू आहे. शके
१५६० चे सुमारास माघ वद्य चतूर्थीस मोरेश्वरीं महाराज आले असतांना
मोरेश्वराचे समोर महागाणपत्य निरंजन या नांवाचा देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण
भजन करीत बसला होता व त्याच्या भक्तीनें मोरेश्वर डूलावयास लागलेले
होते परंतु नारायणमहाराजांच्या लोकांनें त्या साधूस येथून उठून जा
असें सांगितलें असतांना साधु उठून नग्न भैरवाजवळ येऊन भजन करूं
लागले. देव देवळांतून उठून निरंजना करितां बाहेर नग्न भैरवाजवळ
आले हें नारायण महाराजानें जाणून साधूस नमस्कार केला व उजवा
मान दिला त्या प्रमाणें हल्लींहि सुरू आहे. निरंजनांनींहि महारा-
जाचा पुष्कळ गौरव केला. साधु महाराज याला करून चिंचवडीं
आले. निरंजनही नामल गांविं गेले कांहीं दिवसांनीं
नारायण महाराजांनीं देह ठेविला व त्यांच्याहि चितेंतील दगडावर दोन
गणपति उमटले आहेत. याचें कारण पाटलाचे बायकोस जेव्हां उठविलें तेव्हां
आपल्या पत्नीस देह ठेवण्याचा हुकूम केला. त्यावेळीं तीनें असें मागून घेतलें
होतें कीं तुमच्या चितेंतून मी दगडावर गणपतिरूप असावें. त्याकरितां दगडा-

वर दोन गणपति उमटले हल्लीं त्यावर देवालय आहे व पूजा चालू आहे. या नारायण महाराजांनीं लहानपणीं आपल्या आजाची समाधी उकरली होती व आंत जाऊन पाहूं लागले तेव्हां सद्गुरु मोरया गोसावी आंतून बोलले कीं आजा व आजी जिवंत आहे किंवा नाहीं हें पाहण्याकरितां तूं समाधी उकरलीस हें बरें केलें नाहींस, असो तुझ्या वंशांत चार साक्षात्कारि पुरुष होतील पुढें वंश चालणार नाहीं हें जाणून नारायण महाराजांनीं वडीलास कळविलें नंतर चिंतामणि महाराजानीं साष्टांग नमस्कार करून सद्गुरु मोरयागोसावी यांना पद्य रचनेनें आळविलें तें हें पद नमिला श्रीगुरु इत्यादि नंतर त्यांनीं पूजा वगैरे करून समाधी बंद केली समाधीचे तोंडीं एक्या नदींत पडलेलें शिवलिंग लीलेनें आणून स्थापन केलें व सद्गुरुच्या मस्तकाच्या अदमासानें एक दगड शेंदूर लाऊन ठेविला त्याची पूजा करण्यास लागलें कोणे एके दिवशीं चिंतामणि महाराजानें मोरयागोसाव्याची प्रार्थना केली असतांना शेंदूर लावलेल्या पाषाणास शुंडा फुटली व सिद्धि बुद्धिसह चतुर्बाहु विराजित त्या पाषाणाचा गणपति झाला व स्वप्नीं मोरयागोसाव्यांनीं सांगितलें कीं मीच गणपति झालों माझी दुसरी प्रतिमा करूं नये नंतर एक्या महाध्यानें सद्गुरुमोरया गोसावी यांचे देऊळ बांधलें व हा चमत्कार हल्लीं चिंचवडींस आहे. आह्मी बखरीचें तात्पर्य घेऊन सरांश रीतीनें बखरी बजाच हा इतिहास वर्णिला आहे सद्गुरुमोरयागोसावी यांच्या ह्मण्याप्रमाणें सप्त वंशपर्यंत साक्षात्कार व चितेंतून गणपती निघावयाचा हा चमत्कार झाला व हल्लीं सातीहि पुरुषाचीं देवालयें आहेत. नारायण महाराजांचे बंधु विनायक महाराज देव यांनींहीं वंधूस चमत्कार दाखविणे विषयीं कांहीं कारणानें थेऊरीं जाऊन जेथें सद्गुरु मोरयागोसावी स्नान संध्यादि कर्में करण्यास बसले होते तेथेंच जाऊन एकवीस दिवस पाण्यांत उभें राहून दुर्घट तप केलें त्यानाहि गणेश प्रसन्न होऊन पाषाणमय हातात आले व शिवाजीराज कडून जाहागिरि गणेशानें देवविली ती हल्लीं चालू आहे व त्यांचे वंश।

तील ज्येष्ठ घराण्यांत गणेश संस्थान आहे तात्पर्य सद्गुरु मोरयागोसा व्याच्या वंशात गणेशाची पूर्ण कृपा यांत शंका नाहीं हें आह्मीं जाणून सर्व बखर तपासून छापली आहे. ही सारांश बखर करणार सखाराम गणेश जोशी धरणाचे रेठरेकर उर्फ गणपतिबोवा इसलांपुरकर यांनीं केली आहे यात चूक असल्यास वाचकांनीं कळवावी अभार मानूं. संपूर्ण.

श्रीभक्तरामकृत

## श्रीमोरयागोंसावी यांचे पंचश्लोकी मालास्तोत्र.

### प्रारंभ.

एकनिष्ट नेम धर्म श्रीगजाननीं करी ॥ सेऊनि उदासवृत्ति देह वैभवीं धरी ॥ धन्य या युगांत गाणपत्य ढुंढि रूपहा ॥ मोरयागोंसावि योगिराज सद्गुरू पहा ॥ १ ॥ श्रीगणेश भक्तिचा कलींत लाउनी ध्वज ॥ भावें आणिला घरांत मोरया अधोक्षज ॥ नित्य तृप्त अंतरीं सुखानुभूति वाप हा ॥ मोरया गोसावि० ॥ २ ॥ मोरयाहो मोरयाहो नाम हेंच सर्वदा ॥ गातसे मुखें न अन्य जाणि कर्म संपदा ॥ मानवा कृती गणेश साधकासि होत हा ॥ मोरया० ॥ ३ ॥ धन्य धन्य या जगांत साधु नाहि पाहिला ॥ श्रीगणेश भक्तिभिन्य अन्य याहुनी भला ॥ धन्य वंश तो सदा नृ मंडलात पापहा ॥ मोरया गोंसावि योगिराज सद्गुरू पहा ॥ ४ ॥ पंचश्लोकी मोरया योगि याची ॥ जो ही गायी स्तोत्रमाला तयाची ॥ जाती विघ्ने दूरदेशीं पळोनी ॥ ऐसे बोले भक्त रामाभिधानी ॥ ५ ॥

इति श्रीगणेशदेवकृत मोरया गोंसावी स्तोत्रमाला समाप्त.

# श्रीसद्गुरु मोरया गोसाव्यांच्या मोरोपंतकृत चरित्राच्या मंत्रार्या.

नामानन प्रसादाचि भावुनि तो दगड मानिला परिस ॥
तावत्कोकिल बोले निःसंशय परिस वाक्य हे परिस ॥ ११ ॥
यदनु प्रसाद वांछिति ब्रह्मादिक लेख तोच कोकिल गा ॥
जातोहं जामीही संशयितं मैव भक्त कोकिल गा ॥ १२ ॥
नवसें न वसे जो कां इटितिन अवा हृदीं असा गणप ॥
धांवे दीनास्तव या केलें निःपाप हें जुनें कुणप ॥ १३ ॥
मोले उणे परीनृप यत्नशतें रक्षिती ध्वज पटास ॥
रक्षीतमामकोयं मत्वा म्यां सेविलें न विकटास ॥ १४ ॥
भगवान् ह्मणे तुझ्या मी भक्तिस भुललों भया अतां सोडी ॥
मत्स्मृत्यनुगति हरते दुःख हिमा जेंवि तूलपासोडी ॥ १५ ॥
गति मी योग्यासि महा ये हलुहलु मार्ग हाच भक्तवरा ॥
स्पष्टाचिमद्गतिश्री करीं स्रज दिधली तुज वरावया नवरा ॥ १६ ॥
ब्रकडशंस्वाद्यमराहि भक्त परी मज उणे तुज समोर ॥
तव तुलना द्यायामी मीच वरद मूर्ति ढुंढिवर समोर ॥ १७ ॥
तें वाक्य कर्णि पडतां वाष्प नयन भक्तराज दे हांका ॥
गणपा ढुंढे सुमुखा विकटा हा मान क्षुद्रदेहा का ॥ १८ ॥
गहना करा विशाला जीवन भर भार वाहुनी उसळे ॥
यद्गतिपातें हांवुनि भग्न पडावेंच लोहमय मुसळें ॥ १९ ॥
जावें कसें ह्मणे तो ये धीवर धीवराख्य तनु धरुनी ॥
माभैःपोंचवितो गा पैल तटी तुज अलांबुवर करुनी ॥ २० ॥
नलग अन्य मला दे तुजपासी असति चार जे अडके ॥
पोंचवुनी होय प्रभु गुप्त सुचवि भक्त जो न तो अडके ॥ २१ ॥

नाहं किं तव भक्तः दर्शयमां भो अलौकिकं रूपं ॥
कुरुपं रक्षासि कृष्णो भूत्वा ह्यधुनापि मामव कुरूपं ॥ २२ ॥
यद्गत्वा न निवृत्तिः त्वद्वाक्यं वर्ततेच किंत्यक्तं ॥
व्यक्तंभाति इदानीं त्यज काठिण्यंच रक्ष निज भक्तं ॥ २३ ॥
नत्वा याचे ढुंढे वाक्यं श्रुत्वैव झटिति हेरंबः ॥
प्रादुर्बभूवचाग्रे यस्माद्वेदाद्य ॐ पदा रंभः ॥ २४ ॥
मोहं हित्वा पश्य स्वरुप मितीदं सुधोपमं वाक्यं ॥
कृत्वा कर्ण पुटे तन्मूर्तेर्विस्मृतिरभू न्निजं चैक्यं ॥ २५ ॥
भक्तेति प्रेम नयनो गाढंचालिंग्य शक्तिभिः साकं ॥
त्यक्त्वाचैक्य मवोचत् त्वचरणं याम्यहं परं आः कं ॥ २६ ॥
गर्जन्नाथेति मुहु र्विधिव त्दुर्वांकुरैः शमी पत्रैः ॥
संपूज्य नुति मकार्षीत्द्भवहारेत्यादिपदगणैर्मंत्रैः ॥ २७ ॥
वत्सश्चोगच्छानिजं ग्रामंगृह्णीष्व मां गणपकुंडे ॥
मज्जनकाले मज्जन ऊनं किं मोदिते कलभतुंडे ॥ २८ ॥
ते श्रीभ्रुशुंडिमुद्गलकपिलाद्याः प्रापिता मयाऽनंदं ॥
त्वं याहि भो मंदेशःमन्नोदेनैव भक्त स्वानंदं ॥ २९ ॥
गणनाथ कपिठ ढुंढे ॐपदवाच्यस्वरूप भो वरद ॥
उक्त्वा ननर्त भक्तो गच्छन्मार्गे गजास्य एकरद ॥ ३० ॥
जानंन्तल्लास्यगतिं श्रीढुंढिश्चापि धित्धिलांगेति ॥
ततथै ततथै प्रगटी कुर्वन्वाक्यं सुरान्निवेदयति ॥ ३१ ॥
नगजासुतस्य नृत्यं द्रष्टुं विस्मृत्य तत्कृतं निगमं ॥
पश्यतितावद्गणहा प्रोवाचेदं त्वया कृतं असमं ॥ ३२ ॥
नालं श्रुतिरपि पूर्णं वर्णयितुं तं गजाननं सुभगे ॥
दृष्ट्वा भव प्रीत मना ऊनंनहि बुद्धि प्रेरके अखुगे ॥ ३३ ॥
यशसापूर्य त्रिलोकिं ढुंढिपथं स्थाप्य कलियुगे वामे ॥
सोयं गणेश भक्ताग्रण्यवरो जयति चिंचवड् ग्रामे ॥ ३४ ॥

नत्वातच्चरणंयत्तराणिरिव भवार्णवे विषय घूर्णे ॥
मरणेपितस्यस्मरणं तूर्णं गुरुकर्णं पततु मत्कर्णे ॥ ३५ ॥
मोघन दर्शन ज्याचे साक्षात्तो मोरयाख्य गोंसावी ॥
स्तविला मयूरपंतें इच्छुनि व्हावीत सर्व गों सावी ॥ ३६ ॥
भगवान् भजकासि ह्मणे अवरा पाखंड काय माजविले ॥
चिंतामणि अवतरला जेणें तुक रामदास लाजविले ॥ ३७ ॥
गर्वें बुडाल म्या विधि भर्गाद्यमरीं मुदें प्रसादास ॥
सेवोनि शुद्ध केल्या तनु नमुनी विकट आखुसादास ॥ ३८ ॥
वृषंटादि टाकिलें कां मान्य श्रुतिपथ धरोनि करि टाळा ॥
द्विजहोअमुरश्रीहरपाखंड न जाणिले अतां टाळा ॥ ३९ ॥
तंभजन नव्हे माझें टाकुनि श्रुतिपथ पताक फडकवुनि ॥
फिरता शूद्रापरिभुवि निज पूर्वज रौरवांत अडकवुनि ॥ ४०
गर्जें कोठें श्रुतिवच सांगा तरि एक वाक्य वाडव हो ॥
कां भुलला प्रभु बोले टाका पाखंड मनुज गाढवहो ॥ ४१ ॥
जानन् बुधोपि कलिना हतबुद्धिः स्वीकरोति पाखंडं ॥
उन्मील्यनेत्रयुग्मं पश्यन् अगमस्थितंचयत्खंडं ॥ ४२ ॥
नयपथ वदलों सांगुनि हरि अमरासह मयूर स्वानंदीं ॥
मयूरोच्छिष्ट प्रेमें भक्षी चाद्यापितस्थळीं नांदी ॥ ४३ ॥
नामें मयूर ज्याचा कीर्तिध्वज ब्रह्मणस्पती भुवनीं ॥
हा मोर मोरतुल्याचि विहरेतच्चरण धूलिका भुवनीं ॥ ४४ ॥
यत्नें आर्या दूर्वा अर्पियल्या मोरदेवपदकमलीं ॥
मच्चित्तभ्रमर सदा सेवो तन्मोक्षभादपदकमली ॥ ४५ ॥

आर्या समाप्त.

# श्री साधु भक्तराभक्तन मनःश्लोक समूह प्रारंभ.

मना कुंडिचें नाम वाचें वदावें ॥ जनीं भोजनीं सेवनीं भक्तिभावें ॥
मना कारणीं त्या बहु लक्ष द्यावें॥ जयापासुनी या जगीं मुक्त व्हावें॥१॥
मना पापबुद्धि जगीं सत्य खोटी ॥ सदा ती त्यजूनि धरी भाव पोटी ॥
असंख्यात दुर्बुद्धिनें नाडलें रे ॥ मना मायपोटीं जगीं ते आले रे ॥ २ ॥
मना सुखभावें सदा त्वां असावें ॥ तसें सज्जनातें जनीं नित्य गावें ॥
जगीं निंद्य कर्मासि सोडूनि द्यावें ॥ मना भक्तिपंथीं वया नीववावें ॥ ३॥
मना सत्यबुद्धी कधीं न त्यजावी ॥ मना अंतरीं शोधुनी भाव ठेवी ॥
मना कामना सर्व टाकूनि द्यावी ॥ निरालंबरूपीं सुखें झोंप घ्यावी ॥४॥
जनीं या मना वासना कोपयाची ॥ नको अंगिकारू तिणें होय छीछी ॥
मना कामसंगीं बुडाले अनंत ॥ किती काय सांगू नसे त्यासि अंत ॥ ५॥
मनावासना दुष्टरूपी नसावी ॥ सदा चित्तशुद्धि हृदीं त्वां धरावी ॥
मना नीतिनें देह हा वागवावा ॥ अखंडीत भावें गणधीश गावा ॥ ६ ॥
नको कल्पना तूं करूं व्यर्थ नाना॥अयुष्यासि हानी तुझ्या ती कळेना ॥
मना सत्य ही जाण तूं मृत्युभूमी ॥ इथें काय इच्छा करावी बुधानीं ॥७॥
बहू द्रव्य संपादुनी वाढले रे ॥ परी शेवटीं मृत्युच्या ते गळीरे ॥
असें जाण पोटीं मना शांत व्हावें ॥ विवेकें सदा स्वात्मरूपा पहावे ॥८॥
बहू या जनीं लोक मी मी ह्मणोनी ॥ सदा भांडती देहभावा धरूनी ॥
अकस्मात् ते मृत्युपंथासि जाती ॥ मना शोध घेई असे कोण अंतीं ॥ ९॥
प्रपंचीं सदा गुंगसी का मना तूं ॥ त्यजी सत्त्वभावें आतां कामना तूं ॥
कळेना तुला मृत्युपंथासि जेव्हां ॥ अकस्मात् जासी नसे कोण तेव्हां॥१॥
मना धैर्यपोटीं प्रसंगीं धरावें ॥ सदा पूर्व कर्मानुरूपें असावें ॥
जगीं कर्मभोगातुनी कोण मुक्त ॥ असे सांग बा शोध घे तूं यथार्थ ॥११॥
नळारामराया मना काय झालें ॥ कपाळीं पहा भोगणें दुःख आलें ॥
नको खेद मानूं मना जाण पोटीं॥ कधीं ना टळे लीहिलेलें ललाटीं॥१२॥

तसें पूर्वकर्मानि भोगीत जावें ॥ कधीं ना टळेरे मना स्वस्थ व्हावें ॥
कधीं दुःखसंगीं कधीं सौख्यरंगीं ॥ न जाई मना कामना व्यक्त रागीं ॥ १३ ॥
मना वंदनाचे मर्म सज्जनार्थ ॥ झिजावें अती आदरें वा यथार्थ ॥
तरी जन्म घेवोनिया मृत्युलोकीं ॥ तुवां साधियेली सुकीर्ती विलोकी ॥ १४ ॥
जगीं वाचणें या किती दीन आहे ॥ खरें शोधुनीया मना तुंचि पाहे ॥
ह्मणोनी मना बोलणें या जगाचें ॥ स्वयें सोसुनी बोल बोलीं सुवाचें ॥ १५ ॥
तनू सोडितां कीर्ति मागें असावी ॥ अशीरे मना नित्य क्रीया करावी ॥
जगीं जीव सूखी नसे सत्य मानी ॥ असत्कर्म योगें वया होय हानी ॥ १६ ॥
चिरंजीव मी भी जगी बोलताती ॥ अकस्मात मृत्यु पथीं जीव जाती ॥
कितीएक मेल्यावरी शोक त्याचा ॥ करोनी वृथा घात कर्ती जिवाचा ॥ १७ ॥
मना सत्य होणार होऊनि जातें ॥ वृथा काळजी मानसीं वा वहाते ॥
सदा काळजीनें जिवा सौख्य नाहीं ॥ ह्मणोनी मना शांत होवोनि राही ॥ १८ ॥
मना तूंच रे पुर्व संचीत केलें ॥ ह्मणोनी जिवा भोगणें प्राप्त झालें ॥
जरी शाश्वता जाणुनी पूजितोसी ॥ तरी कां अशी भोगशीं दुःखराशी ॥ १९ ॥
मना मोरयासी त्हदीं ध्यात जावें ॥ मुखीं नाम त्याचें सदा रे धरावें ॥
नको धैर्य सोडूं मना शांत व्हावें ॥ सदा देह कर्मास पाहीत जावें ॥ २० ॥
युगें या अजन्मा गणाधीश गावा ॥ नको जाऊं कोठें त्हदीं त्या पहावा ॥
मना धैर्य पोटीं तरी सत्य राहे ॥ विचारा करी नित्य वेदांत पाहे ॥ २१ ॥
रमा प्रेम तें नित्य टाकूनि द्यावें ॥ रमेशासि जो पूजनें तृप्ति पावें ॥
सदा तो मयूरावरी रूढताहे ॥ मना जाउनी त्वां मयूरीं पहावें ॥ २२ ॥
पुराणांत वाखणिला देवदेवू ॥ गणाधीश ऐसा दुजा नाहीं ठावू ॥
ह्मणोनी मना धांव घेई मयूरीं ॥ सदा चारी द्वारें करी नित्य वारी ॥ २३ ॥
नको तीर्थवास प्रवासासि जाया ॥ जिथें चित्तशुद्धि तिथें तीर्थ काया ॥
जिथें भाव तेथें असे मोरया रे ॥ गुरूवाचुनी हें कळेना जिवा रे ॥ २४ ॥
उभा पुण्य देशांत भक्ताभिमानी ॥ तिथें द्वारयात्रा करावी बुधांनीं ॥
चहूं मुक्तिची साधनातें करोनी ॥ भवाब्धि तरा मोरयाला स्मरोनी ॥ २५ ॥

कऱ्हा तीर्थ संजीवनी पूण्य गंगा॥ तिच्या दर्शनें पातकें जाती भंगा॥
जगोद्धारणा मृत्यु लोकाशीं आली॥ मयूरेश्वरीं पूर्ण विख्याति झाली॥२६॥
ध्वजा सोनियाचा पहाती दुरोनी॥ फरारे जरी झळकताती वरोनी॥
स्फटीकाचिया शोभती दीपमाळा॥ असा मोरया पाहिरे आजि डोळा॥२७॥
मना मोरया पुत्र चिंतामणीते॥जनीं पाहतां चित्त रे शांत होतें॥
भला साधु तो काय वर्णू तयाला॥ नुपेक्षी कदा देवतो पांगुळाला॥२८॥
जनीं मोरया मोरया योगि झाला॥ मना काय वर्णू आतां त्या महिला॥
जिथें मोरया येउनी शांत होई॥ अखंडीत भक्तासि देतो दुवायी॥२९॥
सदा शांत सद्बुद्धिनें मोरयासी॥ बहु आळवी बोलवी सज्जनासी॥
अति आदरें द्वेत नाहीं जयाच्या॥ मनीं धन्य तो दास मोरेश्वराचा॥३०॥
जसा भाव राहे तसा देव आहे॥ मना पूर्ण हें जाण तूं त्यासि पाहे॥
जिवारक्षिता मोरया पाशपाणी॥ नुपेक्षी कदा ढुंढि भक्ताभिमानी॥३१॥
मना भावुका मोरयारे भुकेला॥ कऱ्हेच्या तिरीं जाउनि पाहि त्याला॥
सुखानंद स्वानंद कैवल्यखाणी॥ नुपेक्षी कदा ढुंढि भक्ताभिमानि॥३२॥
मना सोडवीं मोरया अंतकाळीं॥ कृपाळूपणें भाविका नित्य पाळीं॥
पहारे पहा मोरया मोक्षदानी॥ नुपेक्षी कदा ढुंढि भक्ताभिमानि॥ ३३॥
प्रभातें मनीं मोरयाचे सुवाचें॥ मना नाम घेई अरे एक साचे॥
बहु नाम घेवोनियां मुक्त झाले॥ भ्रुशुंडिस्वरूपी मुद्गलादी भुकेले॥ ३४॥
क्रियेवीण कैचा तुला देवपावे॥ अति आदरें या क्रिया युक्त व्हावें॥
फुकाचें तरीं नाम वाचें वदावें॥ जनीं भोजनीं सेवनीं नित्यगावें॥ ३५॥
मना मोरया मोरया नाम घेतां॥ फुकाचें तुझें काय वेचेल आतां॥
पहा मोरया योगि तो देव झाला॥ मना जा पहावें अशा सद्गुरूला॥३६॥
मुखीं नाम घेवोनियां मोरयाचें॥ बहू तारिले वंश कैवर्तकाचे॥
स्वयें देव होवोनियां नामयानें॥ पहा काय केलें मना नामयानें॥३७॥
अहंकार योगें मनावाद मोठा॥ करोनी जगीं नेणती आत्मवाटा॥
आयुष्यासि हानि न कांहींच नेणें॥ मना मूढ ते घातकी दुष्ट जाणें॥३८॥
मना बोलण्या सारखी वर्तणूक॥ जनीं ठेवूनि मोरया जाण एक॥

दया सर्व भूतिं सदा वागवावी ॥ मना शत्रुता मित्रताही त्यजावी ॥ ३९ ॥
मना मोरयाचा कुठे वास आहे ॥ सदा पंच चित्तांत शोधूनि पाहे ॥
मना सर्वदा स्वप्रकाशीक पूर्ण ॥ असें मोरयाचें पहा रूप तूर्ण ॥ ४० ॥
मनाश्चेय स्थावर जंगमासी ॥ जाणीतसे कोण देहादिकासी ॥
मनातोचिर बुद्धिला चालवीत ॥ परब्रह्म रूपी गणाधीपनाथ ॥ ४१ ॥
अविद्यामृषाकल्पनाशून्य होय ॥ विरोनी जिथें अज्ञता व्योमि जाय ॥
तसा तो गणाधीश स्वानंदवासी ॥ मना जाणरे मुक्तताहो जिवासी ॥ ४२ ॥
परब्रह्मरूपी गणाधीशपूर्ण ॥ मानाजाणता तूंचिहोशील जाण ॥
सुबोधार्णवीं बुद्धिजातां विरोनी ॥ तिथें द्वैतता जातसे जळोनी ॥ ४३ ॥
मना सच्चिदानंद हें नाम झालें ॥ प्रतिति न होताचि अंगासि आलें ॥
नसे आपणा वांचुनी अन्य कांहीं ॥ मना तें स्वयें तूंच होवोनि राही ॥ ४४ ॥
गुणेश मायेशही वर्तमान ॥ तुझी कलाते तुजशी अभिन्न ॥
पूर्णत्वतें पूर्ण स्वरूप तुझें ॥ भोगी अहोरात्र करूनि दूजे ॥ ४५ ॥
निजात्मरूपीं रमतां अखंड ॥ संसार दुःखें जळती प्रचंड ॥
या कारणें स्वप्रकाशानुरूप ॥ मना जाणरे हुंढि रूपा अमूप ॥ ४६ ॥
व्योमापरी व्यापकपूर्ण ब्रह्म ॥ जें पूर्ण तें शाश्वत नित्यकाम ॥
वरिष्ट सूर्याहुनि तेजराशी ॥ ऐसें मना जाण विघ्नेश्वराशी ॥ ४७ ॥
माया विलासे विपरीत भासे ॥ प्रपंच विस्तार तूझा विलासे ॥
उत्पन्नता पालन आणि नाश ॥ याचें मना कारण तो गुणेश ॥ ४८ ॥
विज्ञानरूपीं दृढ स्थावरस्थ ॥ स्वानंद बोधार्णव स्वप्रकाश ॥
कादाटला तो न समाय कोठें ॥ सर्वत्र संपूर्ण अखंड दाटे ॥ ४९
अतिवाद तो वाद कामानर्थेर ॥ तुटे वादतो वाद कामासियेरे ॥
मनावाक्य सारार्थ जाणोनि राही ॥ निजानंदरूपीं गणाधीश पाहीं ॥ ५० ॥
जे शब्द ब्रह्मीं त्हदयीं विलासे ॥ जें रूप स्वानंदपुरी विकासे ॥
जाणीव नेणीव हि सार्थसाचे ॥ तें रूप विघ्नाधिप राजयाचें ॥ ५१ ॥
मात्छिद्र कुंभांतरि दीपनासु ॥ सबाह्य तैसा प्रकटे प्रकाशु ॥
तैसा समस्तेंद्रिय वृत्तिद्वारें ॥ निजात्मताफाकत सौख्यसारें ॥ ५२ ॥

ब्रह्मास्थतीतें उपदेश केला ॥ विच्यारिताना तरि व्यर्थ गेला ॥
ऐसीमना वृत्ती जगांत झाली ॥ गाणेश्वरीं ब्रम्हं मुखें निवाली ॥ ५३ ॥
असे हे मनाचे जपी एक एक ॥ मनाश्लोक दूजे नसे ब्रम्ह देख ॥
मनाहीं असे जाण हेरंबवाणी ॥ अर्थावबोधें निजसौख्य खाणी ॥ ५४ ॥
अज्ञान ते नेणति अर्थ कांहीं ॥ सज्ञान तेही पडले प्रवाहीं ॥
क्षुद्रार्थ मंत्रे करती जपासी ॥ ते जीव हो होतिल पापराशी ॥ ५५ ॥
विद्यांस झाले परि व्यर्थ कर्म ॥ चुकोनि गेले मुळिचे मुवर्म ॥
चिंतामणि सोडुनि गार घेती ॥ ते ज्ञानगर्वे नरकासि जाति ॥ ५६ ॥
विश्वासहीन भ्रमती कपाटें ॥ अनेक कर्मे करिती अचाटें ॥
त्या लागि त्याते फळ येत हाता ॥ चुकोनि गेले भुलले अहंता ॥ ५७ ॥
जे सद्गुरूचे निजदास झाले ॥ या श्लोक योगें जन ते निवाले ॥
मूर्खं कितीके पडतील फासें ॥ सलोभ मोहे भ्रमताति तैसें ॥ ५८ ॥
चिंतामणी दास मल्हार बोले ॥ ऐसें मना वर्तता कार्य झाले ॥
संती वरं सादर आयकावे ॥ सप्रेम हेरंब दुढीस गावे ॥ ५९ ॥
इति श्रीमच्चिंतामणि दासमल्हारभक्तराम विरचितं मनबोधश्लोक-समूहं संपूर्ण

॥ श्रीमयूरेश्वरार्पणमस्तु ॥

## ॥ श्री साधु भक्तरामकृत मयुरेश्वर नामावली ॥

### ॥ प्रारंभ ॥

॥ ब्रह्मपतिपवर । जय जय । गणपती । प्रणवाकृतिधर । जयज० । गणप० । सिद्धिवुद्धिवर जय ज० । गणप० । एकदंतधर जय० । ग० ॥ श्रीलंबोदर । ज० । ग० । अखिलविघ्नहर । ज० ग० । श्रीनरकुंजर । ज० । ग० । श्रीमयुरेश्वर । ज० । ग । हरिवाहनकर । ज० । ग० कपिलअर्तिहर । ज० । ग । शिववपुसुंदर । ज० ग० । पार्वतिप्रियवर । ज० । ग० । दशविधतनुधर । ज० । ग० । श्रीअखिलोदर ज० । ग० । तांडवप्रियकर । ज० । ग० । अखिलबोधकर । ज । ग० । मोदकभूतकर ॥ भक्तरामवर । ज । ग० । ॥ इति नामावली संपूर्ण ॥

## ॥ श्रीगाणपत्य साधु गणेशदेवकृत गणेशनाम प्रश्नावली ॥

## ॥ प्रारंभ ॥

### प्रस्तावना

प्रथमता स्नान करून शुचिर्भूत होऊन पूर्ण भावनेनें गणेशाची षोडशोपचारानें पुजा करावी व खोबऱ्याची वाटी गुळानें भरून त्याचा नैवेद्य दाखवावा विडा, सुपारी, दक्षणा, व श्रिफल पुढें ठेऊन नमस्कार करावा पुढे ठेवलेला मांदारकाष्ठाचा फासा त्याची पुजा करावी व इष्ट कामना मनीं आणून फासा तीनवेळ टाकून शुभ अशुभ पहावें सत्य होय.

| गकार. | णकार. | पकार. | तिकार. |
|---|---|---|---|
| गगग | णणण | पपप | तितिती |
| गगप | णणप | पपग | तितिप |
| गगती | णणवी | पपण | तितीण |
| गगग | णणग | पपती | तितीग |
| गगप | [illegible] | पगग | तिगती |
| गगण | णगग | पग[illegible] | तिगप |
| गगती | णगप | पगप | तिगण |
| गगग | णगती | पगती | तिगग |
| ग[illegible]प | णपप | पतीती | ति[illegible] |
| गपती | णपग | पतीप | तिपग |
| गपग | णपती | पतीण | तिपग |
| गपग | णपग | पतीग | तिपती |
| गतीती | णतीती | पगण | तिणण |
| ग[illegible]ण | णतीप | पणप | तिगप |
| ग[illegible]प | णतीग | पगग | तिपग |
| गतीग | णतीण | पण[illegible] | तिणती |

॥ श्रीगणेशायनमः अथगणेश नामक्षर प्रश्नावली प्रारंभः आदौप्रार्थना ॥ श्रीमद्गण तुभ्यंनमस्कृत्वा ग्रर्वामिते ॥ नाम प्रश्नावलीं देव निर्विघ्नारस्मस्तु ॥ १

## आर्या गगग नामक प्रश्नः १

या प्रश्नाने तुमचे सिद्धिस पावेल कार्य अवघडते ॥
वाटेमम मनिं ऐसे तुज मनिंचे वा त्वरें असा घडते ॥ १ ॥

## गगप ओवी

जे तू मनीं चिंतलेस ॥ ते कष्टें जाय सिद्धीस ॥
नित्य मनीं आणावा गणेश ॥ तोच पुरवि मनाशा ॥ २ ॥

## गगतो दिंडी

तुझा नाहि काळ हा बरा येंव्हा ॥ सिद्धि पावेल येईल सुष्ट तेव्हां ॥
कार्य नोहे हे सत्य सांगतों मी ॥ वाक्य माझे मीथ्या नवदा तूह्मी ॥ ३ ॥

## गगण साकी

इच्छित मनिंचे कडेसि जाइल गणपति पद स्मरणानें ॥
तुजवरि केली कृपाचि आता कुंजरमुखदेवाने ॥ ४ ॥

## गणप आर्या

जे का तुज मनिं आहे त्या कार्या बहुत घस्र लागतिल ॥
मग तव मनरथ सर्वहि सत्यत्वानें खरेच होईल ॥ ५ ॥

## गगण

येतिल तुजला शत्रु कार्यासी या बहुत आताची ॥
नवरि मानसिं इछा पीडा बहुतुज असेच देवार्चा ॥ ६ ॥

## गणती ओवी

जाई आता तू सत्वर ॥ कार्य होईल सोडिं न धीर ॥
एक नितकरी अर्कवार ॥ ते मज प्रियफारची ॥ ७ ॥

## गगण अंजनी गीत

कार्य तुझे हे क्लेशे होइल ॥ इष्ट बंधुजन तुज अनकूळ ॥
नसति मनुजा तुजला काळ ॥ प्रतिकूळ आहे ॥ ८ ॥

### गपप आर्या

नघडे कार्य अता हे जाण मनीं तूं खराच निश्चय हा ॥
खटपट जरि बहु केली नाचि सफल सांगतोच प्रश्न पहा ॥ ९ ॥

### गपती साखी

जा जा आता स्वस्छ करूनि मन कार्य तुझे होईल ॥
संशय किमपी नधरी चित्ति मानासि ते पावेल ॥ १० ॥

### गपण ओवि

कार्या होय बहु हानि ॥ परीजाय सिद्धि लागुनि ॥
लीन असा गणेश चरणी ॥ तोचि देता मनस्छ ॥ ११ ॥

### गपग दिंडी

हानि ऐसे वद तो मी तीनवेळा ॥ अता आहे तुमची दुष्ट वेळा ॥
म्हणुनि अपुले मन त्वरे आवरावे ॥ पिशाच्याचे दान हो तुह्मी द्यावे ॥ १२ ॥

### गतीती ओवि

कार्य होईल त्वरे सरसी ॥ जा जा येव्हां स्वकाजासी ॥
जाताची तुमचे कार्य तुह्मासी ॥ फलद्रूप होइल ॥ १३ ॥

### गतीण साखी

जे जे तुमचे मनस्थचिंतित ते ते होईल तेव्हां ॥
स्मरण करूनि जरि देवाचे दानचि द्याल ही जव्हां ॥ १४ ॥

### गतीप आर्या

नघडे कार्य अता हे जाणमनीं तु खराच निश्चय हा ॥
करिता मोदक दाना सफलचि होईल प्रश्न वा परि हा ॥ १५ ॥

### गतीग साखी

प्रश्न तुझा हा ऐकुनि मजला हर्ष होय मनु ज्यारे ॥
क्षण क्षणा तव कथितो सत्यची कार्य तुझे घडले रे ॥ १६ ॥

## इति गकार संपूर्ण.

## णकार प्रारंभः

### णणण अर्या

हा प्रश्न सफळ परि तुज बहुतचि दिन लागतील या कामीं ॥
मानुनि मम वाक्य खरे जा जा आता त्वरित निजधामीं ॥ १ ॥

### णणप ओवि

पितृ दोष बहु असती ॥ ब्राह्मण देव चर फडती ॥
इष्ट बंधुजन तुज प्रति ॥ वाईट म्हणुनि नाघडे ॥ २ ॥

### णणती दिंडी

सफळ तेला पावेल कार्य तूझें ॥ वाक्य आता मानिं धरीं सत्य माझें ॥
कृपा होइल पार्वती नंदनाची ॥ दुष्ट इच्छा सोडी तु चिंतनाची ॥ ३ ॥

### णणग ओवी

बरवे होईल कार्य परी ॥ गण देवाचे चरण धरीं ॥
चतुर्थी दिनि दुर्वांकुरीं ॥ गजानना अर्चावे ॥ ४ ॥

### णगण साखी

येक्या अरिने तुजवरिं केले आहे कोडे मोठे ॥
विपरित तुजवरि प्रसंग आला होत आहे बहु खोठे ५ ॥

### णगग आर्या

शिवसुत तव इच्छित बा तूर्ण करिल हेचि सत्य जाण मनीं ॥
निःसंशय स्वस्छपणें तच्चरणांबुज अता धरि नमनीं ॥ ६ ॥

### णगप कामदा

कार्य हे तुझे होय बा परी ॥ दुष्ट येक त्या विघ्नतो करी ॥
त्यासी नाशवा श्री पदीं तुवा ॥ भाव ठेवुनी पूजि केशवा ॥ ७ ॥

### णणती इंद्रवज्रा

कार्यासि तुझ्या बहु हानि आहे ॥ आता नको तू पुसुरे मला हे ॥
संदेह सोडोनि घरासि जावे ॥ येकाग्रचित्तें करुनि असावे ॥ ८ ॥

पतोप अभंग कडवे

नाचि होय कार्य सांगतो मी तुला ॥ सत्य वचनाला मानी ॥माझ्या ॥ १०

पतोण साखी

व्हावे जरि मनि कार्य तुझे तरि वाचि गणपति स्तोत्र ॥

तोच दयालु होऊनि तुजवरि धरिल दयेचे छत्र ॥ ११ ॥

पतोग साखी

त्वरेचि होईल कार्य तुझे हे संशय न धरि चीतीं ॥

श्रीमद्गणपति वरद असूनि तुं करिसि मनीं का खंती ॥ १२ ॥

पणण आर्या

कार्य तुझे जे मनिचे नवडे ते सत्य सांगतों तुजला ॥

यास्तव स्वग्रहि जायी दुसऱ्याने तूं पुसूनको मजला ॥ १३ ॥

पणप आर्या

श्रीमद्गजवदनाच्या कृपा कटाक्षें त्वरे घडे कार्य ॥

संशय न धरि चिंति राहा मनिं तूं धरोनिया धैर्य ॥ १४ ॥

पणग साखी

होइल परि हें कार्य तुझे बा काही येक दिनानें ॥

वांछिसि गणपति सत्वर पूजी येकवीस सुमनानें ॥ १५ ॥

पणतो इंद्रवज्रा श्लोक

स्वांतीं तुझ्या जे असतील कामें ॥ होतील ते सर्व धरी सुकामे ॥

घे भाक माझी शिव नंदनाला ॥ पूजुनि नैवेद्य समर्पित्याला ॥ १६॥

पकार समाप्त.

तोकार प्रारंभः

१ तोतोतो आर्या

प्रतिदिनिं सुखातें तूं पूजन करि येकवीस दूर्वांनीं ॥

घडलें मग कार्य तुझें समज मनीं विघ्ननाशनी वाणी ॥ १

२ तोतोप ओंवी

मनीं चिंतिसि व्हावें म्हणुनि परितें न होय सत्य वाणी ॥

या समयीं अंबा भवानि सानकूळ नाहिं तूजला ॥ २ ॥

## ३ तीतीण दिंडी

घडेना हें कार्य त्या त्वरें वाटे ॥ अशालागीं चिंतणें व्यर्थ खोटें ॥
जरु जायीं येयुनि काय सांगूं ॥ प्रश्न करत्या हेरंब पुजि सांगू ॥ ३ ॥

## ४ साखी तितिग

हृद्गद तूझें घडेल सत्यची वाणी घे कपिलाची ॥
शुंडादंडें छाया धरिली तुजवरी देवें साची ॥ ४ ॥

## ५ तिगति साखी

होईल हानि परि घडेल सत्यचि वाणी घे कपिलाची ॥
शुंडादंडें छाया धरिली तुजवरि देवें साची ॥ ५ ॥

## ६. तिगप आर्या

या प्रश्नें विघ्नें बहु येतिल धरितां हातींच धावूनि ॥
यास्तव मनस्थ सोडुनि स्वस्थ असावें घरांत जावुनि ॥ ६ ॥

## तीगण पृथ्वीछंद श्लोक

तुझें सकल कार्य हें त्वरित होईजे ये क्षणीं ॥
म्हणोनि तुजला बहू बदत दीर्घ मी भापणीं ॥
अतां सदनिं जावुनी करिं आरंभ कामास या ॥
घडेल तव कार्य हें न धरिं मानसीं संशया ॥ ७ ॥

## ८ तिगग ओंवी

होइल मनस्थ देवोनि कष्ट ॥ हें तुजसीं मी सांगतों स्पष्ट ॥
भाव धरोनि येकनिष्ठ ॥ सिद्धिवरा अर्चावें ॥ ८ ॥

## ९ तीपप साखी

या प्रश्नानें मनिंचें हृद्गद नाहीं होत त्वरेनें ॥
परि मी वदतों गणपती सेवा करितां होय वरानें ॥ ९ ॥

## १० तीपण इंद्रवज्रा श्लोक

घडोनि येईल खरेंचि कार्य ॥ या साह्य होतील बहूत आर्य ॥
मानूं नको हें मम वाक्य खोटें ॥ होतील तुला यांतहिं लाभ मोठे ॥

११ तापग ओवि

तुझें मनिचे न होणार ॥ ऐसे वदतो स्पष्टोत्तर ॥
मनिची इच्छा सोडी सत्वर ॥ ती तुज दुःखें देईल ॥

तिणती साखी

आरंभित हें कार्य तुझे बा सत्वर होइल जाण ॥
मानु नकोरे अनृत वचना गजवदनाचि आण ॥

तोणण आर्या

वाटे मम मनिं ऐसे या कार्या बहुत घस्र लागतिल ॥
यास्तव गजवदनाला प्रतिदिनिं वाही तुं एकवीस तिल ॥ १३ ॥

१४ तिणप दिंडी

अबाबाबा हें कर्म असे खोटें ॥ मनिं आणितां तुज दुःख होय मोठें ॥
काळ आहे प्रतिकूळ तुला आजी ॥ मनीं आणितां अपकीर्ति जगामाझी ॥

१५ तिणग घनाक्षरि

घडो बोलसि तूं काम ॥ परि होय तें अकाम ॥
तूं घेई सुमुख नाम ॥ घडे तेणें सत्वरें ॥ १५ ॥

१६ तीणता घना० कडवें २

तुझें कार्य बा घडेल ॥ राज्य तुजला जडेल ॥
दुष्टा दुःखातें पडेल ॥ देव कृपें हें खरें ॥ १६ ॥

घनाक्षरि या प्रश्नावलिचा मालक

जो का पार्वतिचा देव ॥ त्या गणपति हे देव ॥
ब्रह्मादिक तेहि सर्व ॥ गाति नाम हे बरें ॥ १ ॥

या प्रश्नावलिकर्त्याची प्रार्थना

नामाक्षर प्रश्नजाति ॥ पुष्पमाल यथामति ॥
करोनियां तुजप्रति ॥ अर्पियली सांगरे ॥

ग्रंथकर्त्याची प्रार्थना ओंवी

जयजयाजी विघ्नहरा ॥ दैत्यांतका गौरी कुमरा ॥
तूंचि मति अज्ञा पामरा ॥ दिलीस ह्मणुनि बोलिलों ॥ २ ॥

## साखी

नमितों आतां शेवटिं तुजला गणपति देवा आह्मी ॥
जें जें इच्छूं तें तें व्हावें तुझ्या कृपेनें स्वामी ॥ २ ॥

## ग्रंथकर्त्यांचीं नांवें साकी

मल्हारात्मज गणेश तत्सुत सिताराम दोघांनीं ॥
प्रश्नावलीहि केली सुरसा अर्पिलि गणपति चरणीं ॥ १ ॥

## या ग्रंथाचा शक मास

शके सत्राशें सत्याणवांत ॥ युवनाम संवत्सरांत ॥
माघ शुक्ल सप्तमी समाप्त ॥ ही प्रश्नपंक्ति जाहली ॥

॥ इति गणेश नामाक्षर प्रश्नावली समाप्त ॥

## चोविस चतुर्थींचीं नांवें व तात्पर्यानें सप्रमाणानें शास्त्राधार.

भाद्रपद शुक्ल चतुर्थीचें नामाभिधान वरद चतुर्थी याप्रमाणे आहे. सर्व देवांस बंदीपासून सोडवून सर्वांस तुमच्या कार्यात विघ्नें येणार नाहींत असा वर दिला आहे ब्रह्मा विष्णु महेशादि देवांनीं गणेशजन्म तिथाचें उपोषण केलें व पार्थिवी मूर्ति गणेशाची करून पूजन करिते झाले. गणेशांनीं त्यांची भक्ती जाणून प्रत्यक्ष प्रगट होऊन अनेक वर दिले व या शुक्ल चतुर्थीस वरद चतुर्थी असें लोक ह्मणोत हा आशिर्वाद दिला आहे. या चतुर्थीचा शास्त्राधार या रीतीनें आहे. भाद्रपद शुक्ल चतुर्थी साच मध्यान्ह व्यापिनी ग्राह्या श्लोक चतुर्थीसर्वथाकार्यावरदाख्यानुपोत्तम ॥ मध्यंगतेरवौग्राह्यामर्वद्‍शुभार्पितकैः ॥ १ ॥ इति स्कांदे ॥ श्लोक ॥ प्रातःशुक्लतिलैस्नातोमध्यान्हेपूजयेन्नृप ॥ पार्थिवस्यगणेशस्यतत्रैवपूजनंचरेत् ॥ २ ॥ दिनद्वयेतदव्याप्तौकूर्यात्पूर्वाऽन्यथाऽपरा ॥ चतुर्थीगणनाथस्यसर्वदासर्वजंतुभिः ॥ ३ ॥ अर्थ ॥ भाद्रपदाची शुक्ल चतुर्थी रविमध्यमाध्यान्हकाल व्यापिनी उपोषणाला व पार्थिव पूजेस योग्य असें ऋषींचें ह्मणणें आहे. स्कंदपुराणांत व्यासांनीं स्पष्ट

वर्णन केलें आहे कीं चतुर्थी बहुतकरून निश्चयानें मध्यग तरविव्यापिनी गणेशपूजनास व उपोषणास ग्रहण सर्व जीवांनीं करावी ॥ १ ॥ भविष्य पुराणांतही व्यासवचन असेंच आहे प्रातःकाळीं पांढऱ्या तिळांचा लेप अंगास लावून स्नान करावें आणि गणेशाची पार्थिवाची मूर्ति माध्यान्ह-कालींच पूजावी असें विश्वामित्रांनीं चंद्रसेनराजास सांगितलें आहे ॥ २ ॥ दोन्हीही दिवशीं माध्यान्हकालव्यापिनी नसेल तर पाहिजे तर पूर्वींची करावी अथवा दुसऱ्या दिवसाची करावी सांप्रदायानुसार व्यवस्था करावी ॥ ३ ॥ गणेशव्रतेतृतियायुक्ताग्राह्यामध्यान्हव्यापिनी ग्राह्येति माधवः परेदिनेतत्सत्वेपराअन्यथाऽपराउभयदिने तत्सत्वेतदभावेवापूर्वैवक्त-व्याप्येवमेवेति इति माधवोक्तिः ॥ अर्थ ॥ गणेशव्रत तृतियायुक्तच करावें चतुर्थीचें व्रत तृतियायुक्तच करावें पण मध्यग रविव्यापिनी मात्र पाहिजे दुसरे दिवशीं सत्वयुक्तव्यापिनी जर असेल तर दुसऱ्याच दिवसाची करावी जर व्यापिनी नसेल तर पूर्वींचीच करावी दोन्हीही दिवशीं व्यापिनी नसेल तर प्रथम दिवसाचीच करावी ॥ ४ ॥ विनायकव्रत नागव्रताभ्यांव्यतिरिक्तेपुव्रतेपुचतुर्थीपरैवोपोष्याउभयोस्तुव्रतयोर्मध्यान्हव्या-प्त्यानिर्णयः ॥ २८ ॥ अर्थ ॥ नागव्रत व विनायकव्रत या उभय व्रता वांचून चतुर्थीबद्दल उपोषणदुसरे दिवसाचेंच वर्णिलें आहे. मात्र मध्यान्ह व्यापिनी उभय व्रतांस चतुर्थी असावी ॥ तत्रषट्पक्षान्विविच्यपरेद्युरेव व्याप्तिरित्यस्मिन्पक्षे विनायकव्रतपरदिने कार्यं इतरेषुपंचसुपक्षेषुपरादिने-तिनिर्णयकेतिमाधवः ॥ अर्थ ॥ प्रातरसंगम माध्यान्ह इत्यादि सहा भेद दिनचर्येचे केलेत याकरितांच विनायकव्रत दुसऱ्या दिवशींच करावें इतर व्रतांचाही ठिकाणीं परदिनींच करावें असें विवेकाभिमुक्ता व माधवाकार ह्मणतो आणखीं एक बृहस्पतीची उक्ती व्रतराजांत अशी च अमल्यासारखी आहे ॥ श्लोक ॥ चतुर्थीगणनाथस्यमातृविद्धाप्रश स्यते ॥ माध्यान्हव्यापिनीसातुपरतश्चेत्परेहनि ॥ १ ॥ अर्थ गणनाथाची चतुर्थी तृतियायुक्त उपोषणाला फार चांगली मात्र माध्यन्ह व्यापिनी पाहिजे दुसरे दिवशीं मध्यग रविव्यापिनी जर आहे तर दुसरे दिवसाची व

गावी ॥ भाद्रपद कृष्ण चतुर्थीस अन्नपूर्णा चतुर्थी असें ह्मणतात. अन्नपूर्णेनें आपल्यास पार्वतीनें शापित केलें सबब विनायकाचें व्रत करून महतीस यावें याकरितां चतुर्थी केली तेव्हां वद्य चतुर्थीस प्रसन्न होऊन तूं जगवंद्य व मला प्रिय अशी होशील असें सांगून या चतुर्थीस आजपासून अन्नपूर्णा चतुर्थी असें लोक ह्मणतील या चतुर्थीस सिद्धलाडू करून चंद्रोदयीं माझी पूजा करून जो मला भक्तीनें अर्पण करील त्याचे सर्व पितर एकवीस नरकांतून तरतील व संतोषाला पावून ते त्या मनुष्याचें कल्याण करतील इत्यादि पुष्कळ महिमा सांगितला सबब या चतुर्थीस अन्नपूर्णा ह्मणतात ॥ २ ॥ इचा शास्त्राधार चंद्रोदयव्यापिनी करावी ॥ आश्विन शुद्ध चतुर्थीस मंदारचतुर्थी ह्मणतात मंदारानें तपश्चर्या करून वर मागून घेतला कीं माझ्याच नांवाची ही चतुर्थी असावी या चतुर्थीचा शास्त्राधार वरदचतुर्थीसारखाच, मंदाराच्या झाडाखालीं बसून माध्यान्हकालीं मोरेश्वरमूर्तीची पूजा केल्यास इच्छितफल गणेश देतो असा महिमा या चतुर्थीचा आहे ॥ ३ ॥ आश्विन कृष्ण चतुर्थीस दशरथ ललिता चतुर्थी असें ह्मणतात ॥ दशरथानें ललिता या नांवाची आपली मातोश्री तिच्यासह गणेशव्रत केलें नंतर गणेशांनीं प्रसन्न होऊन नामाभिधान चतुर्थीचेंच ठेविलें आणि ह्मणाले दशरथा तुझ्या मातुश्रीसह माझें पूजन जो करील त्याला पुत्रपौत्र धनधान्याची वृद्धी करीन तुझ्यासह मात्र पूजन पाहिजे या व्रतास कारिकाव्रत याप्रमाणेंही ख्याति होईल ही चंद्रोदयव्यापिनी अशी पाहिजे या चतुर्थीस चंद्र लवकर उदयास येईल ॥ ४ ॥ कार्तिक शुक्ल चतुर्थीस स्कंदचतुर्थी याप्रमाणें कथिलें आहे षडाननानें तप करून प्रातःस्नान करून रक्तपद्मानें पूजन माध्यान्हकालीं केलें तेव्हां गणेश संतोषास पावून आपला मयूर बसणेंचा त्याला देऊन बर्हिवाहन याप्रमाणें नामाभिधान ठेविलें. कार्तिक शुक्ल चतुर्थी तुझ्याच नांवानें ख्यातियुक्त होईल असा वर दिला आहे कार्तिक कृष्ण चतुर्थीस करक चतुर्थी ह्मणतात चंद्रोदयव्यापिनी असावी दोन्हीहि दिवशीं जर चंद्रोदय व्यापिनी नाहींतर प्रदोष व्यापिनी करावी

असे राजकौतुकनिर्णयसिंधूंत स्पष्ट वर्णन केलें आहे तें असें ॥ श्लोक ॥ चंद्रोदयेयदानस्याद्यदिवापिदिनद्वये ॥ प्रदोष व्यापिनी ग्राह्या चतुर्थी संकटव्रते ॥ १ ॥ दिनद्वयेपिवर्तेत चतुर्थी या विधूदये ॥ परैवव्रतिभिः कार्या गणनाथ परायणैः॥ इतिधर्मप्रवृत्तौ वचनाच्चा दिनद्वये तदभावेवा परैव ॥ २ ॥ श्लोक ॥ जयाचयदि संपूर्णा चतुर्थी ऱ्हसतेयदी ॥ जयासस हैवे कर्तव्या नागविघ्नांनकारयेत् ॥ ३ ॥ अर्थ॥ चतुर्थी चंद्रोदयो दोनीहि दिवसास जर नाहीं तर प्रदोष व्यापिनी जी असेल ती करावी दोनीहि दिवशीं प्रदोष व्यापिनी जर आहे तर परंपरेणे जी करितात ती करावी ॥ १ ॥ अता दोनीहि दिवशीं चंद्रोदय व्यापिनी चतुर्थी आहे तर दुसरे दिवसाची व्यापिनी गणनाथ परायण जनानी करावी ॥ २ ॥ असे धर्म प्रवृत्तिकार ह्मणतात दोनीहि दिवसास अभाव असेल तर दुसरे दिवसाची करावी ॥ तृतीया संपूर्ण असून चतर्थी ऱ्हस्वत्वास जर पावते तर त्रितीया युक्तच चतुर्थी करावा कारण मात्र विघ्नगणश्वर आहे नागविद्धा करूनये ॥ या चतुर्थीस एकवीस भोपळे ब्राह्मणास गणेशाचे पूजन करून चंद्रोदयी दान द्यावेत् व भोपळ्याचीच पक्वानें करून गणेशप्रीत्यर्थ ब्राह्मणास भोजनास घालावीत याची कथा रुद्रयामलांत उत्तरार्ध तंत्रांत तिसऱ्या पटलांत अशी सांगितली आहे कीं चवन भार्गवानें आपणास डोळयानें दिसेना व अति वृद्धत्वही झाले हे जाणून गणेशाचे कार्तिक कृष्ण पक्षातील चतुर्थी व्रत केले व आपल्या जवळ जे मोदकाकार वर्तुल भोपळे होते ते उकडून मोदकाचे निमित्ताने चंद्रोदयी प्रभूस अर्पण केले व ब्राह्मण भोजनही त्याच भोपळयानें केले नंतर गणेश प्रसन्न होऊन चवन भार्गवास आशीर्वाद दिला कीं हे चवनभार्गवा तुला डोळे येताल व पुष्कळ द्रव्यवान् होसील तू केलेली चतुर्थी मला फार प्रिय झाली या चतुर्थीस करक चतुर्थी लोक ह्मणोत व माझ्या नावाने भोपळे दान देवोत् अशी कथा आहे मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थीचे नाव मुकुंदा हिचा कथा भाग असा आहे की मुकुंदा या नावाची वरेण्य राजाची पत्नी आपणास गणपतीनें स्वतां हा मूल होण्याचा वर द्यावा ह्मणून पर्ण भक्षण

करून बारा वर्षे तप केलें पुढें मुद्गलापि गांठ पडतांच मुद्गलानें कथन केलें कीं तूं मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थीस माध्यान्हकाळीं पूजन कर वगैरे सर्व मजकूर सांगुन गेले पुढें तिनें भक्तीनें गणेशाचें व्रत केलें गणपति प्रसन्न होऊन मी तुझा मुलगा होतो व तूं ही चतुर्थी केलीस या करतां या चतुर्थीस तुझेंच नामाभिधान मी देतो ही मुकुंदा नांवाची चतुर्थी जो करील त्याला मी संतती संपत्ती देऊन अंतीं मुक्त करीन इ० ॥ मार्गशीर्ष वद्य चतुर्थीस सुभगा चतुर्थी ह्मणतात १ ॥ या चतुर्थीचा महिमा असा आहे कीं रावणाची मुलगी सुभगा नांवाची, इणे गणेश पती मिळावा ह्मणून पुलस्त्य ऋषीनें सांगितल्यावरून यथासांग चतुर्थी केली गणपतीने गायीचे, खरादिपशुंचे रावणाच्या घरीं रक्षण करण्याचे निमित्ताने सुभगेस वरिलें व रासक्रीडा करून रावणाचा गर्व हरण केला नंतर गणपती सुभगेस अंकावर घेऊन आलिंगन करून सांगितलें कीं तूं मार्गशीर्ष वद्य चतुर्थी केलीस, या चतुर्थीचें नांव सुभगा या प्रमाणे होईल ॥ पौष शुद्ध चतुर्थीचें नांव कामदा असें आहे। या चतुर्थीस सर्व देवाने अनुष्ठानें आरंभिलीं होती तेणें करून गणेश प्रसन्न झाले व सृष्टीचें सर्व कर्म गणेशानो देवाला शिकावेलें व सर्व कामना परिपूर्ण झाल्या व रतीला शंकरानी जाळलेला मदन नेत्रकटाक्षांतून काढून ती सौभाग्य कारक केली सबब या चतुर्थीस कामदा असें ह्मणतात ॥ पौष वद्य चतुर्थीस तिला चतुर्थी ह्मणतात तिळाचे लाडू करून गणेशास अर्पण केले व गणपतीनें तिळासूर दैत्यास मर्द्दन करण्याची शक्ती पार्वतीस दिली याकरितां तिलाचतुर्थी ह्मणतात.

माघ शुद्ध चतुर्थीस विनायक चतुर्थी ह्मणतात याचे कारण कश्यपाच्या घरीं अदितीच्या पोटीं अवतार घेऊन काशींत जावून देवांतक, नरांतक याना मारून काशि राजावर कृपा केली व ह्या माझ्या जन्मचतुर्थीचे उपोषण जो कोणी करील त्यास अक्षय सुख देईन व याच चतुर्थीस महादेवाचे पोटीं अवतार घेऊन महादेवास काशी दिवोदासा पासून घेववून दिली व ढुंढिराज याप्रमाणें ख्याती गणेशाची झाली याकरितां या चतु-

र्थीस ढुंढिराज चतुर्थीहो ह्मणतात ॥ या चतुर्थीचा शास्त्राधार ॥ श्लोक ॥ माघ शुक्ल चतुर्थ्यांतु नक्त व्रतपरायणः ॥ येत्वां ढुंढेऽर्च यिष्यंतितेऽर्चास्युः सुरद्रुहान् ॥ १ ॥ कृत्वा उपोषणं भक्त्यायेऽर्च यिष्यंतिमानवाः ॥ मध्यं दिनमणौ प्राप्ते चतुर्थ्यां माघ शुक्लगे ॥ तेषां सर्वत्र विजयं भविष्यति सुमंगलं ॥ रोगंच सर्व दुखंच नाशंव्रजति तत्क्षणात् ॥ २ ॥ अर्थ माघ शुक्ल चतुर्थीस जर उपोषण न होईल तर नक्त व्रतपरायणी जे मनुष्य ढुंढिराजा तुला सायंकाळी अथवा माध्यान्ह काळीं पुजितात त्यांना सर्व देवांची पूजा केल्याचें पुण्य मिळतें उपोषण करून भक्तिनें जे मानव माघ शुक्ल चतुर्थीस मध्यरवी प्राप्त झालेला असतांना जे गणेशांची पूजा करून आनंदाने राहतात त्याना सर्वत्र ठिकाणी जय मंगलकारक होतो सर्व रोग व दुःख नाशाला तात्काल पावतें ॥ ६ ॥ माघ कृष्ण चतुर्थीस शांभवीचतुर्थी ह्मणतात ॥ शंकरानें सतीविरह नाशार्थ गणेशाचें हे व्रत केलें तेणेंकरून ढुंढिराज प्रसंन्न होऊन तुला सती हिमाचलाची कन्या होऊन वरील तोंपर्यंत स्थीर मानस कर मी माघांतील कृष्ण चतुर्थीस चंद्रोदयीं तुला प्रसंन्न झालों याकारितां या चतुर्थीस शांभवी चतुर्थी ह्मणतील इचे उपोषण सर्व कल्याण करणारें आहे ॥ फाल्गुन शुद्ध चतुर्थीस सिद्धि विनाधक चतुर्थी ह्मणतात ॥ इचा शास्त्राधार ॥ ॥ श्लोक ॥ फाल्गुनेऽसिमन्सिते पक्षे चतुर्थी सिद्धिदायका ॥ तस्यां गणेश्वरं सिद्धिनायकं चप्रपूजयेत ॥ १ ॥ अनंत सिद्धिदं पुंसां सर्व कार्यार्थ साधकं ॥ धतूरैःकमलैश्वेतै मोदकादिभि रर्चयेत् ॥ २ ॥ अर्थ ॥ फाल्गुन शुद्ध चतुर्थीस जो कोणी कमलांनी, धोतऱ्याच्या फुलांनी, मोदकांनी गणेशाची माध्यान्ह काळीं पूजा करील त्याची कार्यसिद्धि लौकर होते ह्मणूनच इला सिद्धिदा चतुर्थी ह्मणतात सर्व देवांनीं तप केलेले या चतुर्थीस सिद्धिस गेले सबबहिला सिद्धिदा ह्मणतात माध्यान्ह काली उपोषणास पूजनास योग्य समजावी ॥ ३ ॥ फाल्गून वद्य चतुर्थीस रतीकंदर्प चतुर्थी ह्मणतात ही चंद्रोदय व्यापिनी असावी असें गणेश भागवतांत सांगितलें आहे. ॥ श्लोक ॥ फाल्गुनस्यासितेपक्षेचतुर्थीपरमात्मनः ॥ नान्माऽच्च रती-

कंदर्पापुष्टीदासानराधिप ॥ अस्यांरत्यागणाध्यक्षंपुजनंवैभवेत्रुवं ॥ अर्थ– हे नराधीपा फालगुनांतल्या कृष्णपक्षाच्या चतुर्थीस रतिकंदर्पा चतुर्थी म्हणतात, या चतुर्थीच्या ठिकाणीं चंद्रोदयीं रतीच्या योगें करून गणेशाचें पुजन झालें आहे. ॥ याचें कारण कथा–शंकराचें गंगा गौरीशीं भांडण होऊन ते तपश्चर्येस बसले. नंतर पार्वतीनें मदनास पुढें करून आपण भिल्लीणीचा वेष घेऊन शंकरास भुलविण्यास आली असतां शंकरानें मदनास जाळून टाकलें-- नंतर रतीनें गणेशाचें व्रत करून पतीस संजिवन केलें. न ह्या चतुर्थीस लोक रतीकंदर्पदा चतुर्थी असें ह्मणोत, असें बोलते झाले.

चैत्र शुद्ध चतुर्थीस नृकेसरी चतुर्थी ह्मणतात. याचें कारण मच्छ व गणेश पुराणांत सांगितलें आहे.

श्लोक–मधुमासे सिते पक्षे चतुर्थ्यां क्ष्मात्मजांन्हिगे ॥ भरण्यां चैव माध्यांन्हे बभुव नरकुंजरः अर्थ–चैत्राच्या शुक्लपक्षांत चतुर्थीला भरणी नक्षत्रावर माध्यांन्ह कालीं नरकुंजराचा जन्म झाला याचें कारण शुभ्रसेन या नांवांच्या राजानें नरकेसरी नांवांच्या आपल्या मुलानें गणपतीची सेवा न करावी म्हणून पुष्कळ छळ केला. शेवट ठार मारण्या करितां सिंव्हासनावर बसून तलवार हातीं घेऊन उद्युक्त झालाअसतांना सिंव्हासन फोडून त्या नरकेसरी करिता गणपति बाहेर पडून त्या राजासच मारते झाले. व मुलाचें रक्षण करून गणपती म्हणते झाले मी याच चतुर्थीस उत्पन्न झालों व तुझें रक्षण केलें या करितां याच चतुर्थीस लोक नरकेसरी चतुर्थी असें ह्मणोत. या चतुर्थीचें उपोषण करून अठयाचें पन्हें करून जो माझ्या नांवाने एकवीस ब्राह्मणांना पाजील व माध्यांन कालीं पुजा वगैरे जो करील त्यास संपत्तिं, संतती मी देईन चैत्र वद्य चतुर्थीस वसंत चतुर्थी म्हणतात. ह्या चतुर्थीस शमीक रुषिचा मुलगा जो वसंत त्यानें वसंत रुतुंतील पुष्पें व श्वेत दुर्वा यांनीं गणेशाची चंद्रोदयीं पुजा केली. गणेश त्याला प्रसन्न होऊन तुझ्याच नांवांची चतुर्थी होवो असा त्याला वर दिला त्याची इच्छा परिपुर्ण केली असें मेरु कल्पाच्या विनिय स्तवकांत वर्णिलें आहे.

वैशाख शुद्ध चतुर्थीस परशुवाह चतुर्थी म्हणतात. त्याचें कारण–जम दग्नीस सहस्त्रार्जुनानें त्रास देऊन काम धेनू नेलेली समजून भार्गव रामास राग आला व भार्गवरामानें मयूरपुरीं येऊन तपश्चर्या केली नंतर गणेश प्रसंन्न होऊन भार्गवरामास आपल्या हातांतील परशू दिला व अनेक अशीर्वाद देऊन म्हणाले कीं हे भार्गवरामा मी ह्या वैशाख शुद्ध चतुर्थीस तुला प्रसंन्न झालों तुला मी परशू हातांत दिला या करितां याच चतुर्थीस लोक परशू वाह चतुर्थी लोक म्हणोत व तुलाही लोक परशूराम असें म्हणतील.

वैशाख वद्य चतुर्थीस दाशरथी चतुर्थी म्हणतात याचें कारण रावणा पासून आपणांला यश यावें व सिता बंदिंतून सुटावी या करितां सागर तीरीं रामचंद्रानें तप केलें, व कुष्मांडाची फळें गणेशास अर्पण केलीं त्या फळांतूनच गणपती उत्पन्न होऊन रामचंद्रास यश येईल असा वर दिला व ह्या चतुर्थीस दाशरथी चतुर्थी असें लोक म्हणोत. व मी कुष्मांडांतून उत्पन्न झालों या करितां लोक कुष्मॉंडी चतर्थी असें म्हणतील.

ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीस ज्येष्ठ-राजचतुर्थी ह्मणतात; तिचें महात्म्य मरुकल्माच्या तृतीयस्तबकांतील दुसऱ्या अध्यायांत फार मोठें सांगितलें आहे. ॥ श्लोक ॥ ज्येष्ठराजस्यमहाम्यंपापघ्नंपुण्यवर्धनं ॥ मुक्तिप्रदं सुबुद्धिनांचतुर्थीव्रतमुत्तमं ॥ तावत्‌गर्जन्तिविप्रेंद्रगंगाभागीरथीक्षितौ ॥ यावन्नायातिपापघ्नीज्येष्ठेज्येष्ठाचतुर्थिका ॥ १ ॥ अर्थ ॥ ज्येष्ठराज व्रताचें मयात्म्य फार मोठें आहे; पृथ्वीतलावर गंगाभागीरथीचा महिमा जोंपर्यंत ज्येष्ठमहिन्यांत ज्येष्ठानांवाची चतुर्थी आली नाहीं तोंपर्यंतच हिचा कथाभाग सागर मंथन करून चौदा रत्नें निर्माण केलीं त्यांत लक्ष्मीच्या अगोदर ज्येष्ठा या नांवाची तिची वडील बहीण उत्पन्न होतांच ही महा कृत्या आहे असें जाणून तिला कोणीही वरीना नंतर नारदानें एका ब्राह्मणाशीं तिचें लग्न लाविलें नंतर तिनें अंगिरसऋपीच्य मागण्यावरून ज्येष्ठयमहिन्यांतील चतुर्थी केली व गणेश तिच्या पोटीं येऊन ज्येष्ठराज हें नामाभिधान धरते झाले व मातोश्रीची ज्येष्ठादेवी

या नांवानें कीर्ति करून जगांत वंदनीय केली व ह्मणून ज्येष्ठमहि-न्यांतील चतुर्थीस ज्येष्ठाचतुर्थी ह्मणतात. हिचा शास्त्राधार भाद्रपदांतील चतुर्थीसारखाच.

ज्येष्ठ वद्य चतुर्थीस कोकिळाचतुर्थी म्हणतात. दक्षयज्ञांत सतीनें शिवाची निंदा ऐकल्यावर देह विसर्जन केला नंतर कोकिलेचा वेष धारण करून ज्येष्ठ वद्य चतुर्थीचें व्रत केलें तेणेंकरून गणेश चंद्रोदयीं प्रसन्न होऊन तिला आशिर्वाद देते झाले कीं तुझा महिमा कोकिला रूपानेंही फार वंदनीय होईल. दोन आषाढ एके ठिकाणीं प्राप्त झाल्यावर जे तुझें व्रत करतील ते त्रैलोक्यांत पूजनीय होतील व मलमासांतील कोणत्याही चतुर्थीस कोकिलाचतुर्थी याप्रमाणें लोक म्हणतील असे कालिकापुराणांतील ३६ वे अध्यायांत सांगितलें आहे.

आषाढ शुद्ध चतुर्थीस शयनाख्या चतुर्थी म्हणतात असें गणेश भागवतांत सांगितलें आहे हिचा कथाभाग असा आहे कीं या चतुर्थीस माध्यानकाळीं अंदोल्यावर भगवान आपल्या संपूर्ण स्त्रियासहवर्तमान शयन करितात व संपूर्ण पूजा भगवान् निद्रिस्त असतानाच भक्तजन करितात तेणें करून गणेश प्रसन्न झाले व ब्रह्मदेव आदिकरून देवास सांगते झाले कीं आषाढ शुद्ध चतुर्थीस माध्यान्हकालीं माजी पूजा करून जो मला अंदोल्यात घालून भक्तीने निजवील मी निद्रस्त अस-ताना माझी पूजा वगैरे समारंभ जो करील त्याला अक्षय सुख व संपत्ती-वान करून अंति स्वानंदभुवनास नेईन त्याचे सर्व पितर संतोषीत होतील व त्याच्या वंशाचा क्षय कधीही होणार नाहीं असी कथा आहे अषाढा-तील वद्य चतुर्थीस पार्वतीवरदा चतुर्थी ह्मणतात याची कथा रुद्रमलांत गणेश तंत्रात आहे पार्वतीच्या पोटीं गणपतीनें अवतार घेवून सरस्वतीशी लग्न लाविलें नंतर पार्वतीने आपला मुलगा मंगलमूर्तीच आहे जाणून आषाढ शुद्ध चतुर्थीचे शयनव्रताख्य चतुर्थीचे व्रत केलें रोज माध्यान्ह-काली मोरयाची सरस्वतीसहवर्तमान अंदोल्यावर निजले असतानाच पूजा केली व वद्य चतुर्थी प्राप्त झाली असतां चंद्रोदयीं पार्थिव विनायकाची

पूज्ा केली नंतर गणपतीने पार्वतीस सांगितले कीं मी तुझा बाळ झालों या करितां मी साहा महिने निजतो पण तुला फार त्रास न यावा या करिता आज पासून मी सांगतो असे जनाची गाढे शयनाख्य चतुर्थीचे उपोषण करून व्रत करावे अषाढ शुद्ध चतुर्थीस मजला माध्यान्ह कालीं झोपाळ्यावर समारंभाने निजवावे नंतर श्रावण शुद्ध चतुर्थीस माध्यान्ह कालीं पुन्हा समारंभाने मला मंगल स्नान घालून उठवावे उत्तीष्ठ ब्रह्मण-स्पते या मंत्राने उठवावे ह्मणजे मी सर्वांचे कल्याण करीन असा पार्वतीस वर दिला सबब या चतुर्थीचे नाव पार्वतीवरदा चतुर्थी पडले ॥ श्रावण शुद्ध चतुर्थीस प्रबोधनी चतुर्थी ह्मणतात मंगळमूर्ती झोपाळ्यावर निजले असताना सर्व देवानी आपणास सिंधु दैत्याने फार त्रास दिला ह्मणून इक्षु सागरीं भगवान निद्रस्त असताना प्रार्थना मानसीकच केली पण सर्वसाक्षी गणेश श्रावण शुद्ध चतुर्थीस माध्यान्हकालीं उठून सर्व देवास सांगते झाले देवहो मी गौरीचा मुलगा मयूरेश्वर नामानें होऊन दैत्यास मारीन भाद्रपद शुद्ध चतुर्थीस माझा अवतार होईल काळजी करू नये असे प्रबोधन केले सबब प्रबोधिनी चतुर्थी ह्मणतात असी कथा आहे आह्मी सप्रमाण चोविस चतुर्थीचे तात्पर्य लोकास चतुर्थी महिमा कळून थोडक्यांत कार्यभाग व्हावा सबब संक्षेप गोष्टीरूप वर्णन केलें आहे श्रीगजाननार्पणमस्तू इति चोवीस चतूर्थीचे महाराष्ट्र भाषायुक्त संक्षिप्त चरित्रं संपूर्णमस्तू श्रीगजानन विनायक प्रसन्नोभवतु ॥

## ॥ गणेश करुणाष्टके प्रारभ्यते ॥

नमोनि तुला वक्रतुंडा गणेशा ॥ तुला प्रार्थितों मी मला तारि ईशा ॥
नको अंत पाहूं निजानंदनाथा ॥ मयूरेश्वरा धांवरे धांव आतां ॥ १ ॥
विवेकें मनाला बहू बोध केला ॥ परी मागुता सर्व तो व्यर्थ गेला ॥
करूं कायरे नावरे आवरीतां ॥ मयूरेश्व० ॥ २ ॥ जगीं पाहतां सर्व
ठायीं गणेशा ॥ नवे मोकळा धांवे परी ही मनीषा ॥ म्हणूनी असें

प्रार्थितें एकदंता ॥ मयूरेश्व० ॥ ३ ॥ नको सारआसार संसारसिंधू ॥ नको देहदारादि संबंधबिंदु ॥ तुझी मी करी आस हे सिद्धिकांता ॥ मयूरेश्व० ॥ ४ ॥ जगीं पापरूपी असा मीच येक ॥ नसे दीसती दीनबंधो अणीक ॥ बहु पातकी त्यासि तूं होसि त्राता ॥ मयूरे० ॥ ५ ॥ भुशुंडि कसा तारिला पापराशी ॥ तुवां अंगि कां चर्चिलें सिंदुरासि ॥ नसे पातकी कायतो कायनाथा ॥ मयूरे० ॥ ६ ॥ तसा क्रौंचनामा तुवां मूषकासि ॥ बळें बांधुनि आणिलें वाहनासी ॥ असंरुपात ऐसें वदूं काय ताता ॥ मयूरे० ॥ ७ ॥ विषेसीं वसी सर्प तो नाभि केला ॥ गुरु स्त्रीगमी चंद्रही दे हकेला ॥ तदा तारिले त्वां तया भ्रंशचित्ता ॥ मयूरे० ॥ ८ ॥ प्रथम करुणाष्टकं संपूर्ण ॥ द्वितीयाष्टक प्रारंभः ॥ ॥ तयाहून मी वेगळा पापरूपी ॥ जरी वाटतों ढुंढिराया तथापी ॥ तुला पूजितां पाप कोठें अनंता ॥ मयूरे० ॥ १ ॥ नको अंत पाहूं नको कष्ट देवूं ॥ नको दुःखडोहीं त्यजूं पाप ठेवूं ॥ नको पाहिं वापा गणेशा समर्था ॥ मयू० ॥ २ ॥ जरी देह गेला तथापी पुन्हा मी ॥ स्तवूनी तुझा मागुती जन्मकामी ॥ सदा घेवुनी मुक्ति मागेन नाथा ॥ म० ॥ ३ ॥ उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ •धनागार स्वप्नभ्रमभास वाटे ॥ तुझ्यावीण कांहीं नसे गोड चित्ता मयू० ॥ ४ ॥ दिनानाथ चिंतामणी नाम तूझें ॥ असें गाजतें जाणुनि चित्त माझें ॥ सदा ध्यातसे तूंचरे तातमाता ॥ मयू० ॥ ५ ॥ जसा चातका वर्षतो मेघबिंदु ॥ नुपेक्षी कदा मेघ त्याचा समंधु ॥ तसा आर्त मी तूं प्रभो आर्तभर्ता ॥ मयूरे० ॥ ६ ॥ जसी वासरा गाय हंबाकरेहो नुपेक्षी कदा वत्सला वासरेंहो ॥ तसी गाय तुं लेकरूं मी सुदंता ॥ मयू० ॥ ७ ॥ असे ह्रेद चित्तीं नसे कामतृप्ति ॥ सदा भ्रांति विध्वंसनी ज्ञानव्याप्ति ॥ असूनी अशी ज्ञातवी कर्मसत्ता ॥ मयू० ॥ ८ ॥ जयजय मंगळमूर्ति मोरया ॥ तिसरें करुणाष्टक प्रारंभः ॥ गणेशाचिया सेवका वक्र पाहे । असा या जगीं तो बली कोण आहे ॥ नसे पाहतां एकदंता कृतांता ॥ मयू० ॥ १ ॥ कदा भेटसी मायबापा दयाळा ॥ खरें सांग बा येइ तूं एक वेळा ॥ पदोपदीं ये वाटते भेट

आतां ॥ मयू० ॥ २ ॥ जगत्पालका कां नयेसी स्वभृत्या ॥ न कां तारिसी हें मला सांग स्तुत्या ॥ कसेंही असो देव माझें अनंता ॥ मयू०॥ सदा काळजीनें निजानंद जातो ॥ असें जाणतो मागुता शीण येतो ॥ परी हा अशा ओढुनि घेइ चित्ता ॥ मयू० ॥ ४ बहू कष्टलो देह माया नुरागे ॥ धनागार यांचादि समंध योगे ॥ उपेक्षूं नको हे नको गुणवंता ॥ मयू० ॥ ५ ॥ वदू काय नेत्रांतुनी तोय दाटे ॥ खरें सांगतो जन्म हा व्यर्थ वाटे ॥ अहा शीणली जन्म देवोनि माता मयू० ॥ ६ ॥ अहा देह माझा पराधीन देवा ॥ जरा रोग बाधा सदा काय सेवा ॥ बहू गांजिती त्रासवी पाव आतां मयू० ॥ ७ ॥ गणेशात्मजे प्रार्थिले नित्य तूते ॥ परी का नयेसी प्रभो सांग मातें ॥ अहा मी अती तापलो एकदंता मयू० ॥८॥ इति गणेशसुत गणेशदासविरचित गणेशाष्टके संपूर्णमस्तु ॥

करुणाष्टक चवथें ॥ चिंतामणी दे तुझिया पदाला ॥ गाथीन ऐसेंचि देयी पदाला ॥ तुजवीण मजला कांहीं नसावें ॥ ध्यानीं सदा चित्तलयीं असावें ॥ १ ॥ नागानना पाशधरा गणेशा ॥ विघ्नांतका मंगल आदि-ईशा ॥ शास्त्रें पुराणें तुजला स्तवीती ॥ हेरंब लंबोदर हे म्हणेति ॥२॥

ढुंढिराज कुलभूषण भक्तिचे ॥ एकदंत निज दैवत आमुचे ॥
जन्ममृत्यु सकळासि निवारिते ॥ श्री निरंजन भवाब्धि तारिते ॥

पिता माता बंधु तुजविण नसे कोण मजला ॥
बहू मी अन्यायी परि सकळही लाज तुजला ॥
न जाणेमी कांहीं जप तप पूजा साधन रिती ॥
कृपा दृष्टी पाहे शरण तुज आहे गणपती ॥

## ॥ श्री वरदमूर्तयेनमः ॥

॥पद॥ [illegible] या चालीवर

॥ कोणि पेरिले नयनें [illegible] नाना रूपी दिसे ॥ जिकडे पाहावे तिकडे अवघे गणपति रूपी [illegible] ॥ धृ० ॥ काय करूं मज कांहीं कळेना जिवा लागले पिसें ॥ पाहता मन [illegible] गणपति झाले अवघे एकचि दिसे ॥ निर्गुण निर्मल आत्मा गजमुख द्वैतचि कांहीं नसे ॥ ध्येय ध्याता

ध्यान सोडुनि पाहे हृदयीं वसे ॥ चा. ॥ अनु हताचि वाद्यें वाजति कडकड कडका जाहला ॥ वरद हस्त मस्तकीं ठेविता अनुभव देहीं अला ॥ १ ॥ बहु जन्माचें सुकृत ह्मणुनि सद्गुरुनि मजला ॥ ज्ञानांजन घालितांचि मज मी अनुभविलें त्याला ॥ धृ. ॥ नव द्वारासि घालुनि कुलपे दश महि उघडे ... ॥ घालुनि ज्ञानांजन गुरूनें मीपण दाखविलें ॥ भास उडाला शब्द दडाला एकचि अवघे ठेले स्वयंज्योति असिपदाख्य गजमुख पहाता ... उन्मन झाले काय होवु उतरायी गुरुवरी ह्मणुनि हर्ष झाला ॥ ... हस्त मस्तकीं ठेविता अनुभव देहीं अला ॥ व० २ ॥ भ्रूकुटि वर ... श्रीहट गोल्हाटाचे वरी ॥ औठ पीठ मूळपीठ माथ्याचि वाट अवघड खरी ॥ चढता मग मी कष्टी जाहलें गुरुनि धरिले करी ॥ तेंव्हा वाटे धन्य मी जाहलो गुरुपदिं भ्रमरापरी ॥ इडा पिंगळा मध्ये सुषुम्ना त्रिवेणी संगम झाला ॥ वरदहस्त मस्तकीं ठेवितां अनुभव देहीं आला ॥ ३ ॥ व. ॥ संग रहित निसंग होवुनि गणपतिमय मम मन केलें ॥ चिन्मय मुद्रा लागुनि गेली तन्मय सद्गुरुनि केलें ॥ विनायकाची पूर्ण संगती घडली किती वदु मन मुरले ॥ सत्य सत्य गुरु स्मरुनि आज हे यतिवर तुम्हा कळविले ॥ चा. ॥ देह भावना धरूनि दास हा गणपतिचा झाला ॥ वरद हस्त मस्तकीं ठेवितां अनुभव देहीं अला ॥ ४ ॥ श्री विनायकार्पणमस्तु

## पद भक्तरामाचें.

मोरोबा यावें समयाला सादर व्हावें ॥ धृ० ॥ कोठिल पक्वानें मी वाढूं ॥ तुजला क्षिप्रा मोदक लाडू ॥ अतां मी कर्ज कुणाचें काढूं ॥ काय बोलावें ॥ स० ॥ १ ॥ कुठिल दुधभात आणि कढी ॥ कुठली रुग्ग पोळी खीचडी ॥ भाजीभाकर अहे या घडी ॥ तुह्मी पहावें सोडुनि जनकनृपाची पुरी ॥ त्रिशिरा विरोचनाचे घरीं ॥ दूर्वा भक्षुनि तृप्त अंतरीं ॥ होसि सद्भावें ॥ स० ॥ २ ॥ विनवी भक्तराम मल्हारी ॥ तुज प्रार्थितसे कमलारी ॥ भक्षुनि माझि भाजिभाकरी ॥ सफल करावें ॥ समयाला सादर व्हावें ॥ ३ ॥

## ॥ श्री साधु भक्तरामकृत जोहार ॥

परमसुंदररूपसुंदिल रक्तपंकजकांतिकोमल रूढविदारण भक्तवत्सल शुभदविक्रम कीर्तिनिर्मल अखिलकंटक दुष्टहारक अमल लोचन बुद्धिचालक दुरितनाशन कामपूरक रदकरांबुज दीनतारक वरदअब्जज तुष्टिदायक सिंधुरासुर दैत्यभेदक जितसुरासुरचित्तवेधक फणिफणार्पित पादपंकज चंडगर्जित मापमोचक कमठनाशन सिंधुपीडक इक्षुभक्षण चित्तकारक मोदकाप्रिय दुष्टछेदक सदयमावर विश्वव्यापक सिंधुरादिक शिरच्छेदक ऋषिमुनीजन चित्तवेधक अमरभूषण पाशधारक अखिलभूषण गौरिनंदन भुवनसुंदर श्रीगजानन असुरकंदन हातूमंडण असुरअंतक योगिनायक विरोदिरांतक हाविनायक निखिलदानव दुष्टकंजन मूषकध्वज योगिरंजन अतुल कीर्तिव्यस्तभंजन अग्रपूज्यवर हागजानन भक्तरामकृत स्तवनतोषक सिद्धिबुद्धिपति हा विनायक ॥ १ ॥ वंदन ॥ जय जय ब्रह्म कुलावतंस । क्षत्रियकुलावतंस । ज. ज. । वैश्यकुलावतंस । ज. ज. शूद्राकुलावतंस । ज. ज. । सर्वकुलावतंस । ज. ज । मंगलधामावतंस । ज. ज. कैवल्यधामावतंस । ज. ज. ब्रह्मानंदावतंस ज. ज. योगिराजावतंस । ज. ज. । अखिलभूषणावतंस । ज. ज, भक्तरामस्तुतितोषकावतंस । नमस्ते । नमस्ते ॥

## ॥ श्री साधु भक्तरामकृत अभंग ॥

गजानना गजानना गौरिनंदना गजानना गजानना कुळभूषणा गजानना गजानना शारदापती शारदापती गजानना गजानना विमळमती गजानना गजानना मनमोहना मनमोहना गजानना गजानना सिद्धिरमणा गजानना गजानना भक्तवत्सला भक्तवत्सला भक्तराम ह्मणे तुझी अगम्यलीला ॥ २ ॥

समाप्त.

## बारा विनायक नामव्रत.

माघ शुद्ध चतुर्थीचे दिवशीं माध्यान्हकालीं मंगळमूर्तीचे पूजन झाल्यावर पुण्याहवाचन वगैरे करून गुरूची पूजा करावी व मी द्वादश विनायकनाम ग्रहणव्रत द्वादश मासपर्यंत करणार असें सांगून प्रथमतः सवा मासा सोने घेऊन त्याचा सुंदर चवकोनी पत्रा करून नाम लिहावें व पूजा करावी नंतर गुरूपासून उच्चार करून घेऊन निजतां उठतां बसतां जेवतां पाणी पितां नाम ग्रहण करावें त्या वेळेस फक्त गुरुपूजन अथवा गुरुपादुकेस नमस्कार करून ब्राह्मणाच्या अथवा आपल्या वडील मनुष्याच्या तोंडातून नामोच्चार करवून घ्यावा ह्मणजे झालें असें बारा महिने बारा नामाचें व्रत करावें पुन्हा तीच ती नामें दुसऱ्या वर्षी घ्यावीत असें बारा वर्षें हें व्रत केलें तर गणेश प्रत्यक्ष भेटतो व संतती संपती देतो व सर्व दुःख नाहींसें होतें असें लंबोदर माहात्म्यांत सांगितलें आहे.

## बारा विनायकाची नांवें.

| | |
|---|---|
| जय सुमुख विनायक | जय विघ्ननाशन विनायक |
| जय एकदंत विनायक | जय गणाधिप विनायक |
| जय कपिल विनायक | जय धूम्रकेतू विनायक |
| जय गजकर्ण विनायक | जय गणाध्यक्ष विनायक |
| जय लंबोदर विनायक | जय भालचंद्र विनायक |
| जय विकट विनायक | जय गजानन विनायक |

द्वादशैतानिनामानियःपठेत्श्रुणुयादपि ॥ तस्यदुखंचरोगंचहरिष्येनात्रसंशयः

## मंगलाष्टक,

स्वस्तिश्रीगणनायको गजमुखो मोरेश्वरं सिद्धिदं ॥
बल्लालो मुरडं विनायक मठं चिंतामणिस्थेवरं ॥
लेण्याद्रिं गिरिजात्मजस्सुवरदो विघ्नेश्वरोओझरं ॥
ग्रामे रांजण संस्थितो गणपतिः कुर्यात्सदा मंगलं ॥ १ ॥

## छप्पन विनायक.

### ॥ कटाव. ॥

॥ ओटपोटगत अष्टविनायक ॥ अनंतअकृति आशापूरक ॥ श्री मयूरेश्वर मयुरपुरीं कऱ्हातीरीं पदराज विराजे ॥ सिद्धिटेकिचा सिद्धिविनायक ॥ पल्लिनगरिं बल्लाळविनायक ॥ पुराडिं नांदे गुप्तविनायक ॥ चिंतामणि थेऊररहिवासि ॥ गिरिजात्मज लेण्याद्रिनिवासी ॥ विघ्नेश्वर ओझर गांवामीं ॥ रांजणगांवीं गणपतिवासी ॥ राजुरनगरीं श्रीमयुरेश्वर ॥ सिंदुरवाडा सिंदुरप्रियकर ॥ लिंबागणपती मूर्तिमनोहर ॥ आदाश दशभुज धुंडीमनोहर ॥ खेडें चिंतामणि कपिलेश्वर ॥ नाणीं धुरंधर पूर्वजनीला उज्जनीप्रिय हे गजानना नर्मदा तटिं ओंकारगुणेश्वर ॥ सकळ महोदर चोळीमहेश्वरिं श्रीगज गजवर ॥ गंडकीनगरीं धुंडीसुंदर ॥ प्रयागनगरीं वाहन उंदीर ॥ पुरिंआयोध्या मथुरा माया ॥ अवंती कांची द्वारावती गोकुळ रामेश्वर काशींते बहुरूपाते धारण करूनी आष्टपंच छपन्न एकला धुंडीविराजें अनंतव्यापी सृष्टीपालण ॥ कारण साजे नामरूप धारण महाराजे त्रिकुट नगरीं दुर्जन उद्धर ॥ उंबरखेडीं भवसवदागर ॥ परळीनगरीं पार्वतिईश्वर ॥ मुद्गलक्षेत्रीं गणपती पहा ॥ गोळेगांवीं त्रिजगदाधिप ॥ गणेशवाडीं शिवगणपती हा ॥ नामल गांवीं आशा पुरक ॥ राक्षस भुवनीं वरद विनायक ॥ नव गण राजुर एक पंचमुख ॥ गणपती वास्तव्य तें नाशिक ॥ असुरा हारक वासी लिंबक ॥ प्रवाळाशीं सिद्धि विनायक ॥ मठीं विराजे बुद्धि विनायक ॥ पुळें समुद्रीं विकट विनायक ॥ व्यास सरस्वती व्यास विनायक ॥ देवगिरीवर संकट नायक ॥ विरुळीं नांदें लक्ष विनायक ॥ पारनेरपुरीं श्री गणनायक ॥ पंढरपुरिचा हरि नांदे व्यापक ॥ अनागोंदि तो श्रीकल्पद्रुम ॥ बंबपुरीं गंगोत्तम उत्तम ॥ कोल्हापुरी हा लक्ष्मी प्रीयतम ॥ कऱ्हाड क्षेत्रीं क्षिप्र प्रसादन ॥ शर्मा गर्मातर देव गजानन ॥ सातारीं मणीराज गजानन ॥ अंगापुरिं हा आत्म गजानन ॥ वांईस नांदे तो प्रणवानन ॥ पुरंधरि

तो कश्यप नंदन ॥ पुण्यग्रामीं जयति गजानन ॥ गणेशखिंडो पार्वती नंदन ॥ लवळ्या गणपति सत्य सनातन ॥ ऐसा अनंत रूपी गणपति हा ॥

## गणेशनंदनकृत प्रार्थना नामावली.

शुद्ध मती मज देरे ढुंढे ॥ त्वत्पादिभक्ती देरे ढुंढे ॥ विमल वाच्या देरे ढुंढे प्रसंग ओळखी देरे ढुंढे ॥ धूर्तपणा मज देरे ढुंढे ॥ जन सुख कारक देरे ढुंढे ॥ हित बोधककर देरे ढुंढे ॥ अंतर जाणिव देरे ढुंढे ॥ बहुजन मैत्री देरे ढुंढे ॥ विद्याधन मन देरे ढुंढे ॥ उदासीनता देरे ढुंढे॥ मागो नये ते देरे ढुंढे ॥ जाणिव नेणिव देरे ढुंढे ॥ तुझी अवडी मज देरे ढुंढे ॥ मोरेश्वर गुरु देरे ढुंढे ॥ चिंतामणि गुरु देरे ढुंढे ॥ गणेश गुरु मज देरे ढुंढे ॥ ढुंढिदास मज देरे ढुंढे ॥ दर्शन तव मज देरे ढुंढे ॥ सावधपण मज देरे ढुंढे ॥ गायन गोडी देरे ढुंढे ॥ अलाप् गोडी देरे ढुंढे ॥ अनेक कळा मज देरे ढुंढे ॥ संततिसंपत्ति देरे ढुंढे ॥ वस्त्राभरणें देरे ढुंढे ॥ कीर्तिविशद मज देरे ढुंढे ॥ बहुत पाठांतर देरे ढुंढे ॥ अर्थारोहण देरे ढुंढे ॥ तत्पदतां मज देरे ढुंढे ॥ नवविधभक्ती देरे ढुंढे ॥ धर्ममती मज देरे ढुंढे ॥ अलिप्तपण मज देरे ढुंढे ॥ मजविण तू मज देरे ढुंढे ॥ आत्मरूप मज देरे ढुंढे ॥ भावभक्ति मज देरे ढुंढे ॥ सर्वस्व तु मज देरे ढुंढे भक्तरामकृत देरे ढुंढे ॥ गणेश नंदन प्रार्थित ढुंढे ॥ तुझि अवडी मज देरे ढुंढे ॥

## चिंतामणी देवाबद्दल तुकारामाचे आभंग.

श्रीगणेशायनमः ॥ वांझ गाय दुभती ॥ देवा ऐसी तुझी ख्याती ॥ १ ॥ ऐसे मागत नाहीं तुज ॥ चरण दाखवावे मज ॥ २ ॥ च्यातक पाखरूं ॥ त्यासी वर्षे मेघ धारू ॥ ३ ॥ पक्षि राजहंस ॥ अमोलिक मोति त्यास ॥ ४ तुका ह्मणे देवा ॥ कांगा खोचळासि जीवा ॥ ५ ॥ परत मी आहे सहज आहे दुरी ॥ वेगळे भिकारि नामरूप ॥ १ ॥ नलगे स्थापें न धरावा संकोच ॥ सहज तें नीच आले भोगा ॥ २ ॥ पडियेलें ठायीं उसिरु

सेवावें ॥ अर्थ तेचि केलें देवें ऐसें ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मी आह्मा जी वेगळे ॥ केलेति निराळे द्विजदेवा ॥ ४ ॥ चिंतामणी देवा गणपतिसि आणा ॥ करवावें भोजना दुजें पात्री ॥ १ ॥ देव ह्मणति तुक्या एवढी कैसि थोरीं ॥ अभिमाना भितरी नागवले ॥ २ ॥ वाढ वेळ झाला शिळे झालें अन्न ॥ तटस्थ ब्राह्मण बैसलेती ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा तुमच्या मुक्तें ॥ आणिन त्वरीत मोरयासी ॥ ४ ॥ २१६३ ॥ भोक्ता नारायण लक्ष्मिचा पति ॥ ह्मणुनि प्राणाहुति घेतलिया ॥ १ ॥ भक्त आणि भोक्ता करता आणि करविता ॥ आपण सहजता पूर्णकाम ॥ २ ॥ विश्वि विश्वंभर कृपादृष्टि सांभाळि ॥ प्रार्थना करितां ब्राह्मणाचि ॥ ३ ॥ कवळो कवळी नाम घ्यावें गोविंदाचें ॥ भोजन भक्ताचें तुका ह्मणे ॥ ४ ॥ २१६४ माझा स्वामि तुझि वागवितो लात ॥ तेथे मी पतित काय आलो ॥ १ ॥ तिर्थ तुमच्या चरण जाहालें पै निर्मळ ॥ तेथें मी दुर्बळ काय वाणुं ॥ २ ॥ तुका ह्मणे तुह्मि देवा द्विजा वंद्य ॥ मी तों काय निंद्य हीन याती ॥ ३ ॥ २१६५ ॥ पत्र ६०१ ॥

## ॥ पद ॥

सर्व संकटे हरो मोरया गोसावी सद्गुरो ॥ ध्रु० ॥
दीनानाथ दयाळ दयाघन भक्तकाम सुरतरू ॥ १ ॥
भक्तराम मल्हारी प्रार्थित नमन तुला मी करू ॥ २ ॥

---

टीप—नरकेसरी चतुर्थी बद्दल पृष्ठ ४९ यावर गणेश पुराण असें ह्मटले आहे तें चूक आहे. त्या ठिकाणीं गणेश भागवत पुराण समजावें.

**समाप्त.**



# ॥ श्रीगणेशायनमः ॥

श्रीमद्गणेशचरणसंशोधनमानसपरमयोगिराजेन मयूरेश्वरेण देवेन पवनतीरवास्तव्येन श्रीमन्महागणपतेः पदरत्नावलिर्विरचिता । प्रारंभः ॥ तथाच ॥ तद्वंशजेन । चिंतामणियोगिराजेन देवेन रचितापदावलिः । प्रारंभः ॥ तद्वदाद्यगाणपत्यधुरंधरेण गोसावीनंदनेन रचिता पदावलिः । प्रारंभः ॥ निरंजनेन योगिराजेन कृता पदरत्नावलिःप्रारंभः ॥ तथाचनाना-गणेशरतभक्तैश्च विरचिताप्रदर्शनीया करुणाष्टकादिविविध गणेश-स्तवनावलिःप्रारंभः ॥ **श्लोक** ॥ यस्याःस्मरणमात्रेण । महापापात्प्रमुच्यते ॥ तस्मात्सतांशुभावाणी । श्रावितव्याजनाःखलु ॥ १ ॥

## अथ सद्गुरु मोरेश्वर गोसावी योगिराज यांचें वर्णन.

### श्लोक.

अतिचित्रकलापाढ्यः । सदारामपरस्थितिः ॥ कालिकाजनितानंदो । मयूरेशोविराजते ॥ १ ॥ **टीका** ॥ अतिचित्राणि । यस्मिन्सःसमासांतकप्-सचासौकलापः वाग्रचनं ॥ तेनाढ्यः ॥बहुकरुणायुक्तयमकत्वात् । सचासौ-आरामश्चसदारामः ॥ सत् । त्रिकालाबाधितोयआरामः ॥ शांतेर्निवासभूतः । पूर्णानंदमयोनिर्द्वंद्वसमाधिरूपोयः ॥ ससदारामः । तस्मिन् ॥ स्थितिर्यस्य । स्थितिर्व्यवस्थासमाधिरूपायस्येति ॥ जीवन्मुक्तत्वात् ॥ कालिकायाः ।पार्वती नामकमानुर्जनित आनंदोयस्मात् ॥ सकालिकोनि ॥ मयूरेशः । मोरयागोसावी

तिनाम्ना ॥ विराजतेशोभते ॥ बर्हिणःपक्षे ॥ अतिचित्रःयःकलापःबर्ह ॥ आरामः तत्परास्थितिर्यस्य । कालिका ॥ मेघमालिका । तयाजनितआनंदः। यस्येति ॥ गणेशपक्षे ॥अतिचित्रा। चमत्कारिकायाकलासातांपातिसोऽतिचित्र कलापःचंद्रः ॥ तेनाढ्योयुक्तोयः । सअतिचित्रेति ॥ भालचंद्रेत्यर्थः ॥ विराजते । शोभते ॥ सदायोरामपरःशंकरः । तस्मिन् ॥ स्थितिर्यस्य ॥ पुत्रत्वात् ॥ कालिकया । पार्वत्या ॥ जनितआनंदोयस्येति । मयूराणामीशः ॥ ईनः ॥ विराजते । शोभते ॥ मयूरेश्वरेतिनाम्ना ।

## अथ सद्गुरु चिंतामणि महाराज देव यांचें वर्णन.

नारायणेनार्चितपादसंधो । यःकौतुकस्यांजनभावयोगात् ॥ स्वयंकलार्धेंदुशिराबभूव । चिंतामणिर्देवसुरोगणेशः ॥ १ ॥ **टीका** ॥ नारायणेन-नारायणसंज्ञकज्येष्ठपुत्रेण ॥ अर्चितो ॥ मर्दनादिपूजायुक्तकृतः । पादसंधः॥ पादभागोयस्येति । यः ॥ कौ । धरायां ॥ तुकस्य। तुकारामसंज्ञकशुद्रस्य ॥ विठ्ठलभक्तस्य । अंजनभावः ॥ मलिनभावः । तस्य योगात्कारणात् । स्वयं स्वयमेव । मनुष्यरूपोपि ॥ कलायाः अर्धः । अर्धभागः ॥ तेनयुक्तोयः ॥ इंदुश्चंद्रः॥सशिरोयस्य । तद्रूत्वभूव ।बभौ॥ चिंतामणिः । चिंतामणिनामकः ॥ देवसुरः । देवानांविष्ण्वादिदेवानांयःसुरः ॥ देवः । सदेवसुरः ॥ गजाननः । तादृशोबभूव ॥ मनुष्योपिगणेशवत्तद्भूवेत्यर्थः । गणेशः ॥ हेरंबेत्यर्थः ॥ चिंतामणेस्तत्वंज्ञात्वा । प्रत्यक्षंसगुडं ॥ चिंतामणियोगिराजंवीक्ष्य। रामदास तुकारामादिप्रभृतयः। त्वमेवदेवसुरोसीति । ऊचुः ॥ तेनप्रसिद्धवचनेन । देव सुरेतिसंज्ञकोबभूव ॥ गणेशपक्षे ॥ नारायणेनविष्णुना ॥ मधुकैटभबल्यादि विविधदैत्यसंघान्हंतुमर्चितः । पादसंधः ॥ पादभागोयस्य । सनारायणेति ॥ व्याजाद्बलिंवंचितुमित्यादिवचसः । यः ॥ कौतुकस्य । कुतुहलस्य ॥ अंजन भावः । अहंब्रह्मास्मीतिभावस्तस्ययोगात् ॥कारणात् स्वयंनिर्द्वंद्वोनिष्कलंको निरामयोपि ॥ कलार्धेंदुशिराः । साकारात्मकोभालचंद्रोबभूव ॥ गुणेशत्वात्। चिंतामणिः ॥ चित्तेनिवासभूतत्वाच्चिंतामणिः । देवसुरः ॥ देवानां। विष्ण्वादिसमस्तसुराणां ॥ सुरः । देवः ॥ सदेवसुरेति । ब्रह्मणस्पतइतिवेदवाक्यैर्देव सुरेगम्यते ॥ गणेश ॥ गणानां । समष्टिव्यष्टिगणानांईशः ॥ ईनः ॥ तेन

गणेशः । ब्रह्मणस्पतिरूपकत्वात् ॥ गणानांत्वागणपतिंहवामहेति । तथाच ब्रह्मणांब्रह्मणस्पतेतिश्रुतिवाक्यतः ॥ तथाच ॥ गणेशहृदयेमौद्गले । स्मृति वाक्यतः ॥ गकाररूपंविविधंचराचरेतिवचसः । गणेशोऽसिपदाख्यो विनायकोगम्यते ॥

## पंचश्लोकी गणेशपुराण.

नमस्तस्मैगणेशाय । ब्रह्मविद्याप्रदायिने ॥ यस्यागस्त्यायतेनाम । विघ्नसागरशोषणे ॥ १ ॥ ध्यायेत्सिंहगतं । विनायकममुं दिग्बाहुमाद्येयुगे । त्रेतायांतुमयूरवाहनममुं षड्बाहुकंसिद्धिदं ॥ द्वापारेतुगजाननंयुगभुजं रक्तांगरागंविभुं ॥ तूर्येतुद्विभुजंसितांगरुचिरं सर्वार्थदंसर्वदा ॥ २ ॥ युगेयुगे भिन्ननामा । गणेशोभिन्नवाहनः ॥ भिन्नकर्माभिन्नगुणो । भिन्नदैत्यापहारकः ॥३॥ सिंहारूढोदशभुजः । कृतेनाम्नाविनायकः ॥ तेजोरूपीमहाकायःसर्वेषांवरदोवशी ॥ ४ ॥ त्रेतायुगेबर्हिरूढो । षड्भुजोयोर्जुनःछविः ॥मयूरेश्वरनाम्नाच। विख्यातोभुवनत्रये ॥ ५ ॥ द्वापारेरक्तवर्णोऽसौ।अश्वारूढश्चतुर्भुजः ॥ गजानन इतिख्यातः। पूजितस्सुरमानवैः॥६॥कलौतुधूम्रवर्णोऽसौ।अश्वारूढोद्विहस्तवान्॥ धूम्रकेतुरितिख्यातोम्लेंछानीकविनाशकृत् ॥७॥ जन्मान्येतानितान्येवम् । यः श्रुणोतिनरोत्तमः ॥ सगणेशपुराणाद्यात्तत्फलंलभतेध्रुवं ॥ ८ ॥ सर्वरोगहरं पुंसां । सर्वबाधाप्रनाशकं ॥ पुरातनंपुराणांहि । गणेशस्यमहात्मनः ॥ ९ ॥

### श्लोक.

नेत्रीं दोन हिरे प्रकाश पसरे अत्यंत ते साजिरे ।
माथाशेंदुर पाझरे वरिवरी दुर्वांकुराचे तुरे ॥
माझे चित्त विरे मनोरथ पुरे देखोनि चिंता हरे ।
गोसावीसुत स्वामिराज कवि रे त्या मोरयाला स्मरे ॥ १ ॥

# ॥ श्री गजानन समर्थ ॥

## ॥ गणेशपंचपदी प्रारंभः ॥

कुंकुमाभंसदानंदं । भक्तसंकटनाशनं ॥ सिद्धिबुद्धिस्थितंनित्यं । ध्यायेत्सिद्धिविनायकं ॥ १ ॥ नमस्तस्मैगणेशाय । सर्वविघ्नविनाशने ॥ कार्यारं-

भेषुसर्वेषु।पूजितोयस्सुरासुरैः ॥ २ ॥ गणेशंरघुनाथंच।गुरुंवंदेजगद्गुरुं ॥ ढुंढेः पंचपदींदिव्यां । प्रवक्ष्यामिसुखप्रदां ॥ ३ ॥ मोरेश्वरंयोगिराजं । सद्गुरुंज्ञान कोविदं ॥ चैतन्यंशाश्वतंनित्यं । प्रणमामिनिरंतरं ॥ ४ ॥चिंतामणिंजगत्पूज्यं। योगिराजंगजाननं ॥ मयूरेशसुतंवंदे । ढुंढेःपंचपदिस्थितं ॥ ५ ॥ नारायणंमहाराजं । चिंतामणिसुतंपरं ॥ ढुंढिराजकलापूर्णं।प्रणमामिनिरंतरं ॥ ६ ॥ निरंजनंचबल्लालं । मल्हारिंज्ञानकोविदं ॥ शंगणेशदेवमहं । प्रणमामि निरंतरं ॥ ७ ॥

## ॥ अथ पंचपदी–प्रारंभः ॥

## पद.

वक्रतुंड महाराज जयजय चिंतामणि गणराज ॥ धृ० ॥ नामस्मरणें नाशतिविघ्नें करसि सुरमुनिकाज ॥ज०॥ १ ॥ धांव धांव किती अंत पाहसि रक्षी निजजनलाज ॥ २ ॥ गणपतिचा सुत विनवि गणेशा ॥ रंगा येई आज ॥ ज० ॥ ३ ॥ भजन ॥ श्री गजानन जयगजानन जयजय गजानन वदावदा । सुटतिल भवबंधनें तुह्मासहिनाहीं आपदा॥१॥ **श्लोक** ॥ अनेनप्रीयतांदेवो । भगवान्सिद्धिश्रीपतिः ॥ श्रीगजानन पूर्वेषामस्माकं कुलदैवतं ॥१॥ मानसपूजा ॥ नाना रत्न विचित्रकंरमणकं सिंहासनं कल्पितं।स्नानंजान्हविवारिणा गणपते पीतांबरं गृह्यतां । कंठेमौक्तिकमालिकां श्रुतियुगे द्वेधारि ते कुंडले । नानारत्नविराजितोरविविभायुक्तःकिरीटःशिर ॥ १ ॥ भाले चर्चित केशरं मृगमदामोदां कितं चंदनं । कस्तूरी तिलकोद्भवंसुकुसुमं मंदारदूर्वाशमीः ॥ गुग्गुलोद्भवधूपकंविरचितंदीपं सुवत्यायुतं । भक्ष्यं मोदकसंयुतं गणपते क्षीरोदनं गृह्यतां ॥ २ ॥ तांबूलंमनसामयाविरचितं जंबूफलं दक्षणां । साष्टांगंप्रणतिः स्तुतिर्बहुविधा पूजां गृहाणप्रभो ॥ क्वाहंमेसततं । तवार्चनविधेर्बुद्धिस्तवालिंगन ।इच्छातेमुख दर्शने गणपते भक्तिस्तुपादांबुजे॥३॥

## ॥ पंचपदी प्रारंभारति ॥

पूजेचा आरंभ मांडिला भक्तानि ॥ उशीर तूं न लावी येई धांवोनि

उदासपण त्वां न धरावें चित्तीं ॥ लडिवाळ बाळ तुझें मी येई काकुलती ॥ १ ॥ जयदेव जयदेव जयजय हेरंबा ॥ सत्वर यावें स्वामि पूजा प्रारंभा ॥ २ ॥ सोडुन विर गुंठी चरणा झाडीन ॥ पंचप्राणज्योति तुज ओवाळीन ॥ ज. २ ॥ दिन वचन परिसोनि वेगें उठला ॥ मूषक सिद्ध करूनि आरुढ पैं झाला ॥ रत्नसिंव्हासनिं येउन बैसला॥ थोर भाग्य माझें आनंद झाला ॥ जय. १ ॥ आणुनि धूपदीप तुज दाखविला ॥ क्षिरापति नैवेद्य तुज समर्पिला ॥ त्याचे भक्षण करी गणपती ॥ अनाथनाथ देवा येतो काकुलती ॥ २ ॥ षड्रस पक्वांन्नें आणिक फळ जाति ॥ काय न्यून तूज आहे गणपति ॥ त्रयोदश गुण तांबुल मुखीं सेवा जी ॥ दक्षणा अर्पण करितो देवाजी ॥ ३ ॥ घेऊनि निरांजन तुज दाखवीन ॥ मंत्र युक्त पुष्पांजलि तुज समर्पीन ॥ त्राहित्राहि ह्मणुनि चरणी लागलो ॥ क्षमा करि अपराध तूज बोलला ॥ ४ ॥ एक वीनंति स्वामि तुज करितों ॥ तुझानामघोष तुजपुढें गातों ॥ वेडेंवा- ॥ गडें रंगि नाचतो ॥ परीस माझे देवा तुज वीनवीतो ॥ ५ ॥ नेणे कळा कुसरि थोरथोरांपरि ॥ नकळे मज कांहिं बहुता प्रकारि ॥ वेडें अज्ञान तुजपुढें गाउनि ॥ आणिका चाड नाहिं तूजवाचोनि ॥ ६ ॥ अनेक भक्त तुझे आहेत उदारा त्यामाजि आज्ञान मी मोरेश्वरा ॥ वेडा आज्ञानी ह्मणे चिंतामणि ॥ परीस माझी देवा विनति तव चरणिं ॥ ७ ॥

॥**भजन**॥ हेरंबा सिद्धिरमणा। कां नये दिनाची करुणा॥

# सद्गुरूस नमस्कार.

नमिला श्रीगुरु मोरया गोसावी । त्यासि अष्टभावेंहो प्रणिपात॥ १॥प्रणिपात करितों तुजवा गुरुराया ॥ नेणें आणिक दुजाहो तुजवाचुनीया॥ २ ॥तुजवाचोनि नाहिं कर्म हा छेदक ॥ तोडिसी भवदुःखहो क्षणमात्रें ॥३॥ क्षणमात्रें तारिले पापि हे उत्कट ॥ ह्मणुनि नाम प्रगटहो त्रयलोकीं ॥ ४ ॥ त्रैलोकिं प्रसिद्ध ऐसा विघ्नराजा ॥ भक्त भवार्णवींहो तारियेले ॥ ५ ॥ तारियेले जीवसंख्या नाहिं त्याची॥ माउली भक्ताचि कृपाळूही॥६॥ कृपाळु ह्मणविसी

मजकां उपेक्षसी ॥ माझि सर्व लाजगा आहे तूंसी ॥ ७ ॥ तुज सद्गुरुराया करितों विनवणी ॥ निष्ठुरत्व मनिं हों नवरि देवा ॥ ८ ॥ संसारि येवोनि मोरया पाहोनि ॥ दास चिंतामणिहो विनवितसे ॥ ९ ॥ **भजन ॥**
भ्रुशुंडिवरदा श्रीगणराजा । येईहो मयुरेशा ॥ दीनोद्धारा पतित पावना धांवरे विघ्नेशा ॥ २ ॥ मज पावलाहो सद्गुरुमोरयाहो ॥ भवश्रम हारलाहो ॥ ज० ॥ धृ० ॥ १ ॥ मोरयागोसावि योगी कलयुगिं अवतरला हो कलयुगिं अवतरला ॥ मृत्युलोकिं पवनतीरिं वासहो केला ॥ ३ ॥ गणेश भक्ति प्रगटाया गुरुरूप झाला । हो गुरुरूप झाला ॥ सबाह्य अभ्यंतरि व्यापक होऊनियां ठेला ॥ ४ ॥ दीनजनाची आली करुणा अद्वैत झाला सद्गुरु अद्वैत झाला ॥ समाधि घेवुनि ब्रह्मानंदे विनटला ॥ ५ ॥ गणेश तनया प्रथम दर्शनीं आनंद केला ॥ गुरुनें आनंद केला ह्मणोनि चरणीं लोळुनि विनवी तारि गुरो मजला ॥ ६ ॥

## पद. चिंतामणि गुरूचें.

जगिं धन्य धन्य चिंतामणि साधु भलेहो ॥ धृ०॥ पवनतिरीं वास करी । ध्यायि सदा सिंदुरारि। मनोरथ पूर्ण करी । पाहुंचलाहो ॥१॥ जगंनिवास मोरया । मोरयाम मोरया । वास करुनि निरसुनिया । मोहपाश सुखीं विनटलाहो ॥ २ ॥ मल्हारि वरद मूर्ति । पाहुचला व्यक्त कीर्ति चित्तवृत्ति हरुनि जाति । निरखिता तयाला हो ॥ ३ ॥

## ॥ भजन. ॥

जयचिंतामणि सिद्धिपते । जयचिंतामणि बुद्धिपते ॥ १ ॥

## ॥ पद.॥

तिन्हि अक्षराचें नाम तुह्मि ह्मणारे वाचे ॥ दुहेरो ॥ चुकतिल भवबंधने । दोष जातिल जन्माचे ॥ १ ॥ जयजय मोरयाहो । माझ्या मोरयाहो ॥ रंगा यावेंहो । माझ्या मोरया हो ॥ वाट पहातोंरे । तुझी मोरयाहो ॥ कधिं मज भेटसीरे । माझ्या मोरयाहो ॥ धांवे धांवण्याहो । माझ्या मोरयाहो ॥ धृ० ॥ १ ॥ विघ्नेशाचे नामीं तुह्मि करावा घोष ॥ दुहेरीं ॥ नासतील

पातकें । दोष जातिल भवक्लेश जयजय ॥ २ ॥ गजानन गजानन । ह्मणारे मना ॥तुह्मि ह्म०॥सुटतिल भवबंधनें । तुज नाहिं यातना ॥ज०॥३॥ मयूरपुरीं कऱ्हेतीरीं । रहिवासु केला मोरया ॥ मोरया. ॥ ध्याया भक्तहो तुह्मिं त्याचा सोहळा॥ ज.॥४॥मो.॥जन्मोजन्मि दास तुझा । आहे गणराजा मी हाआ. ॥ आणिक दैवत नेणे । आह्मां नलगे या काजा ॥ ज. ॥ ५ ॥ सिंदुरे डवडविले रूप । देखिलें डोळा ॥ आज मी दे० ॥ कोटि सूर्य तेजें त्याच्या लोपल्या कळा ॥ ज. ॥ ६ ॥ धांवे धांवे मोरया देई तूं भेटी ॥ मजलादे.॥ अखंड नाम तूझें म्यां । धरिलेंसे कंठी॥ज.॥७॥मृत्युलोकिं कऱ्हातिरी । रहिवासु केला ॥ मोरया. ॥ निजभक्तासि द्यावया मुक्ती सोहळा ॥ ज० ॥ ८ ॥ मुषकावरी आरूढ होउनि । येई गणपती ॥ येई० ॥ बहुत देवा शिणलों मी या । संसाराप्रती ॥ ज० ॥ ९ ॥ चतुर्भुज मंडित रूप। देखिलें नयनीं ॥ आज मी दे. ॥ हें मन वेधलें । तुझ्याचा चरणा ॥ ज० ॥१०॥ परशू कमल अंकुश घेउनि । आली माउली॥ झडकरी आ. ॥ हें मन वेधलें वा तुझ्या चरणाजवळी ॥ ज. ॥ ११ ॥ गणनाथ गणनाथ । ह्मणारे सदा ॥ जनहो ह्म. ॥ भय नाहिं तुह्मांसी यमाचें कदां॥ज. ॥ १२॥ मोरयाहो मोरयाहो । जे भक्त ध्याति ॥ निशिदिनीं जे. ॥ तयाच्या कामना । सर्व पूर्णचि होती ॥ ज. ॥ १३ ॥ मोरया गोसावि तूज ॥ करितों वीनंती ॥ तूज करितों वी. ॥ तारी भक्ता येई तूं वेगें गणपती ॥ ज. १३॥ जन्ममरण गर्भवास । चुकवीता नाहीं ॥ तुजविण चु० ॥ एक आहे तो बापा गणराज पाहि ॥ ज. ॥ १४ ॥ मोरयागोसावि याचे देहीं पैवासू करिशी दे. ॥ द्वैत नाहीं तयासी । हृदयिं गणेशु ॥ ज. ॥ १५॥ मयूर. पूरीं कऱ्हातिरिं रहिवासु केला ॥ मोरया र. ॥ भक्तिभाव देखोनीयां । चिंचवडीं आला ॥ ज० ॥ १७ ॥ जपतप आनुष्ठान नलगे साधन देवा ॥ नलगे सा० ॥ देई देवा माझे तूं । हृदयिं चरणसेवा ॥ ज. ॥ १८ ॥ दुष्ट भोग झाले मज । नकळेची गति ॥ मो. न. ॥ चिंतामणिदास तूझा । करितों वीनंती ॥ ज. ॥ १९ ॥ इष्टमित्र मायबाप । झाले निष्ठूर ॥ मो. झा. ॥ कायावाचा मनोभावें । धरिला आधार ॥ ज. २० ॥ गणेशा तुजविण

सणएक । न ठेवी मज ॥ मो. न ठे. ॥ सांडुनि सर्वहि गोत शरण आलों मी तूज ॥ जय. ॥ २१ ॥ मुषकावरी अरूढ होऊनी येई गणपती ॥ अडकरी ये० ॥ मोरया गोसावी योगि करितो वीनंती ॥ ज० ॥ २२ ॥

## ॥ पद. ॥

प्रथम नमु देव गणराजू । देवी गौरींचा आत्मजू ॥ चतुर्भुज फरशुध्वजू तो विघ्नराजु । वंदु आतां ॥१॥ उपांगश्रुति टाळमृदंग । सारजा गायन करिति शुद्ध ॥ तेणे रंग नानाविध । गणराज माझा नृत्य करी ॥ २ ॥ साहा राग छत्तिस भार्या । आलाफ करिति सारजा माया ॥ धिध्धीधिमिकिट नाचे गणराया । रंग पहावया देव आले ॥ ३ ॥ ऐसा रंग बरवाउजा । प्रसन्न होई तुं विघ्नराजा ॥ मोरया गोसावि ह्मणे दास तूझा । गणराजा मजनुपेक्षिरे॥४॥ प्रथम नमु देव लंबोदरू ॥ जो सिद्धिबुद्धीचा दातारू ॥ वेदशास्त्रासि जो आधारू । तो विघ्नराजु नमियेला ५ ॥ रंगि उभी सारजाथन । पुस्तकवीणा करि घेऊन ॥ सानुसानु ध्वनी उमठति जाण । गंधर्व गायन करिताती ॥६॥ तयामाजि उभे नारद तुंबरू । मृदंग वाजति धिमिधिमिकारू ॥ टाळाचा आहे महागजरू । रंगि मोरेश्वर क्रिडताति ॥ ७ ॥ गणनायक नृत्य करिता । धिमिधिमि भूमि दणाणिता॥गिरिगिरिगिरीगिरी भवरी देता ॥ ताल तोडीताल छंदे ॥ ८ ॥ ऐसे तांडवनृत्य मांडिले । विमानि देव तटस्थ राहिले ॥ मोरया गोसावि योगि बोलिले । रंगि भेटले गणराज ॥ ९ ॥

## ॥ पद. ॥

तुझिया भेटीची बहु । आसरे मोरया ॥ लेखितां बहुत । झाले दीसरे मोरया ॥ २ ॥तूजवीण कोण आह्मा आहेबा मोरया ॥ ३ ॥ रात्रंदिवस वाट तुझि । पाहे बा मोरया ॥४॥ जन्मोजन्मिचा तूझा । दासरे मोरया॥५॥ आणिक कोणाची चाड नाहींरे मोरया ॥ एक वेळां कृपादृष्टी । पाहेंबा मोरया ॥ ६ ॥ धेनूवत्सा लागीं जैसी मोहेरे मोरया ॥ वेगें तूं येईलवलाहीरे

मोरया॥७॥एकवेळां उद्धरीया । दीनासरेमोरया ॥८॥ त्रासदेई सकळकर्म । कर्मासरेमोरया॥९॥संसारसागरीं दुःख । भारीरेमोरया ॥ १० ॥ एकवेळां दयासिंधु । तारीरेमोरया ॥ ११ ॥ आयागमनतं । निवारीरेमोरया ॥१२॥ दिनानाथा एकवेळां । तारीरेमोरया ॥१३॥ दीनवत्सल देवआला । पाहारेमोरया ॥ १४ साष्टांग दंडवत । घालारेमोरया ॥ १५ ॥ मोरयागोसावी तन्मय झालारेमोरया ॥१६॥ चरणांबुजदेखुनियां । निवलारेमोरया ॥१७॥

॥ पद ॥

अकळअवतारकऱ्हे पाठारी । ब्रह्मकमंडलुगंगा । राहिवासतयेतिरीं । भीमकुंडगणेशतीर्थ । तेथिल महिमा थोर । तेथेंकेलीयापैं स्नान । कर्म नाहींऊरीं ॥ १ ॥ जय जय जय जय जय जय लंबोदरा । सकळासिद्धीचा तूं दाता होशील विघ्नहरा ॥ धृ० ॥ तुझें केलिया भजन । चुकतील येरझारा । तूं भक्तजनवत्सल । कृपाळुवा मोरेश्वरा ॥२॥ भाद्रपद शुद्ध चतुर्थीसी । चार्‍हींद्वारें केलियामुक्ति होय । चार्‍हि दिवसउपवास करोनियाचारिपाहे । एकनिष्कामकरिती । सायोज्जताहोय । एककामना इच्छिती । इच्छाफलदेतो आहे ॥३॥ पूर्वद्वारीति मांजराई।आदिशक्ती ति माया दक्षिणद्वारीं ती आसराई भवानीमोहमाया । पश्चीमद्वारिंतीवोझराई माता ती वंदुनियां । उत्तरद्वारींहोयमुक्ती मुक्ताबाई देखिलिया॥४॥माहाद्वारीं तिकृपाळु मातागवराई । दृष्टिसन्मुखजननी जवळिउभा भैरवभाई । वृक्ष उत्तम वामभागीं अधिष्ठानतयेठाईं । वृंदावनीचामहीमा । तो मी वर्णुंकाई ॥ ५ ॥ ऐसा परिवारसाहित । मयुर गांवि आहे । भक्तयेतील यात्रेसि तयांचें चित्त पाहे ॥ मोरयागोसावि दासतुझा । तुजनित्यध्याये । प्रतिमास दर्शना लोटांगणी येतो आहे ॥६॥

॥ पद ॥

येईहोगजानन । येईहोगजानन । माझ्याजीवाचे जीवलग । येईहो गजानन ॥ धृ०॥ उद्धरीलेजीव तूज येतीरे शरण । कष्टलीसमाते तूं होभक्ताकारणें ॥१॥ भाद्रपदमासआला भक्ताउल्हास झाला । कधिं तूज देखीनमी । आपुल्याडोळां ॥ २ ॥ दुष्टभोग आहेतीहों प्रपंची । सोडवी मजतूंहो ।

आतां चुकवीं यातायाती ॥३॥सत्यलोकया टाकुनिया राहिवास धरियेला तूंहोकृपाळुमाउली । थोर नवलावकेला ॥४॥ माझिया वायण्यामाते । धांवे लवकरी ॥ कष्टलीसभारी ॥ माझीरांडनकरी ॥ ५ ॥ सोडवणे माझेतूंहो येईमयूराई ॥ कैसा देह ठेवूं आतां । करूंमीकाई ॥ ६ ॥ चिंतामणी दासरंक । विनवी एकभावें । कृपाकरीमज माझे हृदयीं रहावे॥७॥

॥ पद ॥

दुर्घटसंसारीं कष्टलों बहुभारी । एकदांभेटितूं लवकरीहो देईमज ॥ १ ॥ प्रपंचाची मायामनलागलीसे देवा । भजनतुझेमजसेवाहोनघडेत्रि ॥ २ ॥ कोणाचा प्रपंच कांमजलावीला चरणतुझे मजअंतरलेहो मोरेश्वरा ॥ ३ ॥ मनुष्यदेहीबहुभोगितो बहुकष्ट पापआहेरे उत्कटमी काय बोलूं ॥४ ॥ आणिकएक विनंति पारिसें तूं गणपति । अपुला छंदमंगलमूर्ति हो लावि मज ॥ ५ ॥ पापांत ठेविलें पापकीतिभोगूं । कृपामज-करी तूं सनाथारे मायबापा ॥ ६ ॥ माझिये मानसीं लागली बहुआस । भटि देईं तूं विघ्नेशाहो दिनालागीं । दिधली त्वां मज आशाहो । नकरी तूं निराशा । आहे तुझामज भरंवसारे मोरेश्वरा ॥ ७ ॥ आझुनकिती भोगभो-गूंमी दातारा । कृपातूज उपजेनाउदारा मी कायकरूं । येई तूं लवकरि शिणलो मी देहधारी । आरुढे मुपकावरिहो दीनालागीं ॥ ८ ॥ करुणा तुजभाकितों अखंड ध्यानिंमनीं धरिले दृढ मनिंहो चरण तुझे ॥ ९ ॥ करुणेचि वचनेंनिवेदितो चरणीं । दासचिंतामणिरे विनवितो ॥ १० ॥

॥ पद ॥

विश्वरूपसदाशिव येथेहो॥ देखिलाडोळां ।सर्वेपाळानीळानंदढिवळा अर्धांगीं बैसली श्रीशैल्यबाळा । मुगुटिगंगाशोभे वाहे झुळझूळा ॥ धृ० ॥ जयजय शंकरयेथेहो जयजयशंकर शूळपाणि ॥ ब्रह्मादिक ऊभेकरजोडुनि ॥ धृ० ॥ त्रिपुंड टिळकदिव्यकुंडलें ॥ मुखप्रभाकोटि भानुतेजलोपलें । अध-रादिसि हळाहळ कंटींमिरवलें वासुकिहारगळांपदकशोभलें ॥ २ ॥ त्रिशूल डमरूजटाचाभारु । विभुतिचें उधळण झाला अंधारू । रुंडमाळाशोभति सर्पविखारु । अतिरूपलावण्य उमाशंकरु ॥ ३ ॥ कमंडलु आधारमेखळा-

साजे । किर्तिमुखबाह्यवटशोभतिभूजे शिंगिया एकनादें गगनींगर्जे । आनंदे ब्रह्मानंदे नाचतिभुजे ॥४॥ व्याघ्रांबर परिधान चरणिं तोडरू नुपुरेंझणत्कारु गर्जे आंबरु मोरया गोसावि योगिगंभीर वरदमूर्ति कृपेनें ध्यानिंशंकर ॥५॥

॥ पद ॥

गणराजचरणिं माझें लुब्धलेंसें मन । पाहावया निजरूपद्यावें भक्तिचें अंजन समदृष्टी झालिया जीवा होईल समाधान । नवोले लटके विघ्नराजातुझी आणरे ॥ गण० ॥ १ ॥ मोरेश्वरभजनीं प्राण्या कांरेनभजसी । दुर्लभहानरदेहदेहींहितनवीचारसी । यातायातिभोगुन व्यर्थजेरेझारेभागासि । त्यजुनकामक्रोध शरणजाई सद्गुरुसीं ॥ २ ॥ निरसुन अहंसोहं विघ्नराजा शरणजावें धर्म अर्थ काम मोक्ष सर्वार्थीं भजावें जपतपअनुष्ठाननलगे साधन करावें । अखंडमोरेश्वर ध्यानहृदयीं धरावें ॥ ३ ॥ भजतां मोरेश्वर आह्मां देहा सार्थक झालें । नकरितां सायास आह्मां ब्रह्म सांपडलें । मोरयागोसावि गुरुकृपें आह्मां निजरूपजोडलें । विनविंचिंतामणि गोसावि आह्मा निजरूपपावलें ॥ ४ ॥

॥ पद ॥

संसारिं घालोनिदेवामजकांरे कोपलासि । काय अन्याय म्यां केले मजकांतूंवीसरलासि ॥ध्रु०॥ देह गेला माझा व्यर्थ तूं कैसादिनानाथ । झणि लावि तु न उशीर उतरीं तूं पैलपार ॥ १ ॥ धांवेंबाधांवे बामोरया । जाऊं कोणाबोभावया। त्रासकरी या कर्मांचा। नेणेमी आणिकदूजा॥२॥ आतां कांहीं हिमजनलगे पूरेदेह सूखपीडाकारिहाप्रपंच। तेणेंभयसंसाराचें॥३॥ पुनरपिनये मीयापंथा भवदुःखतोडींव्यथा । कोणाजाऊं मी शरण नेणे मी तुजवांचून ॥ ५ ॥ कृपासिंधू तूं ह्मणविसी । मजदीना उबगलासी । कोठेंजावें मी कृपाळा । विनवितों तुज दयाळा ॥ ६ ॥ मनमाझें व्याकुळझालें । दाखवि मजपाऊलें मनोरथमाझे पुरवीं ह्मणे दासचिंतामणि ॥ ७ ॥

॥ पद ॥

मजसुखपावलेंहो मोरया देखिलाहो ॥ श्रममाझा हारलाहो ॥ ध्रु०॥१॥ केलें विघ्नेशभजन । तेणें हरलें मी तूं पण ॥ २ ॥ यातायाती मी चुकलो ।

चरणीं तूझे विनटलें ॥३॥ घेतां नाम तुझें वाचे ॥ भय नाहीं संसाराचें॥४॥ न करितां तपतीर्थे । कृपा केली गणनाथें ॥ ४ ॥ पूर्वपुण्यें जोडि झाली॥ भेटलि गणराजमाउली ॥ ५ ॥ भाग्योदय थोर झाला । शरण आलों मी महाराजा ॥६ ॥ विनवि चिंतामणी ॥ दास अखंड देई भक्तिरस ॥ ७ ॥

॥ पद ॥

मयूरपुरगावीं रहिवास धरीयेला ॥ थोर भाग्य त्याचें जन उध्दारीला ॥ १ ॥ तयाच्या ठायासि जारे एकु भावें । देहें हंकार या टाकुनिया यावें ॥ २ ॥ येई येई तूं येई मोरेश्वरा । तुजविण नाहींरे भक्ता साहकारी ॥ ३ ॥ वाट वत्स जैसा धेनूची पाहती । तैसि आशा तुझि लागली गणपति॥४॥तनमनधनलावामोरयाचरणीं ॥ फुकटासाठीं तुह्मा सांपडलाधनी ॥ ये० ॥ ५ ॥ सावध होउनीया जारेतयाठायां ॥ मागील वासनाटाकातुह्मिमाया ॥ ६ ॥ मायानका धरूं विषयसुखाची । तेणेंहित कांहीं नोहे तुमचें जाणा ॥ ७ ॥ अंतकाळीं तूज न येतीरे काया । शरण जाई एक्यामोरयाच्यानामा ॥ ८ ॥ भवबंधनकोणचूकवील ॥ देहअंतीं तुजकोणसोडवील ॥९॥ ह्मणूनि धांवाधांवाकरा संसाराची ॥ जोडिकराएक मोरयानामाची ॥१०॥ व्यर्थ ह्मणशील तूं माझे माझे प्राणा॥सर्वांहि टाकून जाशील अज्ञाना॥११॥सकळीक राहतिल आपुलेले ठायीं ॥ तेथें तूज कोण सोडवीता नाहीं ॥ १२ ॥ ह्मणुनि धरा तुह्मी मोरयाचि सोई ॥ हित कांहीं तुह्मी विच्यारावें देहीं ॥ १३ ॥ विनवि दास ह्मणे चिंतामणी॥ गर्भवासा देवा मी शिणलों भारी ॥१४ ॥ चरणापासुन तूं न करि मज दूरीं ॥ ह्मणुनि चरण तूझे धरले दृढ भारी ॥ १५ ॥

॥ पद ॥

हें मन वेधलेंहो मोरयाचे ध्यानीं ॥ आणिक नावडे या मोरया वांचोनी॥१॥कथा मोरयाचि सांगा माझे कानीं॥नाहीं तरी प्राणाचि होइल हानी ॥२॥ मज हांसोत तरीहो हंसोत ॥ परिमज सांगा या मोरयाचि मा॥३॥तेणें मनाचे पुरेल आरत॥नाहीं तरी प्राणासि हो उपाधिघात॥४॥ या हो जनामी काय मज काज॥दिनानाथ कृपाळु महाराज॥५॥ एकदंत

हो सुंदर चतुर्भुज ॥ तोचि हृदयीं आठवतो मज ॥६॥ त्रयलोक्यहो व्यापक गजानन ॥ सुंदर लागलें या मोरयाचें ध्यान ॥ ७ ॥ कांहिं केलियाहो न परते मन । व्यर्थ कासिया करितां समाधान ॥ ८ ॥ देह विनटला मोरयाचि सोई । तयासि प्रतिकारहो नचले कांहीं ॥ ९ ॥ मोरया गोसावी एकरूप देहीं । दिनरंक मीं लोळे त्याचे पांयीं ॥ १० ॥

॥ पद ॥

कां बा रुसलासी । कां बा न बोलसी ॥ निष्ठुर झालासी । तूं कां मजसीं ॥ १ तुं बा न बोलसि आतां काय करूं । बहुत श्रमलों कोणीकडे जाऊं ॥ २ ॥ बहुत अपराध । किति काय सांगूं संख्यानाहीं बहुत अन्याई ॥ ३ ॥ आशातुझीबा लागलीबहुत कोपनधरि तूं विनवीतोतुज ॥ तूं जारिकोपलासि जाउंकोणापासीं मायबाप स्वामिमाझाहोसी ॥ ४ ॥ मोरयागोसावी जोडले आह्मांसि तोतूं एकरूप भासले मानसीं ॥ ५ ॥ विनवी दासह्मणे चिंतामणि ॥ तनुमनवेधलें तुझेबाचरणीं ॥ ६ ॥

॥ पद ॥

पतितपावन सुंदरा । येयेहो श्रीमोरेश्वरा दाखविचरण उदारा श्रीमोरेश्वरा धांवरेपावरे । मोरयामजला येई दयाळा नयेसीरे तरी तुझी लाजतूजला ॥ २ ॥ हृदयींमाझे राहावें सनाथ करावें जन्मोजन्मीं उद्धारावें दासह्मणतावें ॥ ३ ॥ निढळावरी बाहु ठेवितां वाट पाहतां मजरे तुझी आशा असतां शिणलों आतां ॥ ४ ॥ बहुत दिवस झालेती । येई गणपती दाखवि चरण मजप्रती । फिटेल भ्रांति ॥ ५ ॥ करुणा वचनि विनवितों दास ह्मणवीतों सकळहि अन्याय क्षमा त्वां करावे आतां ॥ ६ ॥ शरीर भोग भोगिले कष्टहि झाले । कांरे तूं पावसि माउले धांवे दयाळे ॥ ७ ॥ आतां मज न उपेक्षी कोणरे रक्षी । चरण तुझे साक्षि मोरया तूंचरे रक्षीं ॥ ८ ॥ अंत माझा न पाहावा । येई तूं देवा क्षणभर उशीर न लावा धांवे बा देवा ॥ ९ ॥ बहुत दिवस लेखितां कंठेना ताता धाडिशी मूळ भजानि आतां सोसेना व्यथा । नको देऊं यमाहाती दास तूझारे ॥ लाज तूझी तूजरे कठिण नोहेरे ॥ १० ॥ कठीण तूं मज झालासी माये तु कैसी । वृंदावळी साचन

करमी जाऊं कोणापासि आतां एक विनंति ऐकावि । दास ह्मणवावें जन्मोजन्मि उद्धारावें चरणि ठेवावें ॥ चिंतामणिदास विनवि भक्तिही द्यावि । भक्तिवीण उद्धारावें हेंचि करावें ॥११॥

## ॥ अभंग ॥

एकचित्त करुनी मन । नित्य ध्यायीं गजानन ॥ १ ॥ ह्मणा नाम मोरयाचें । सकळ कारण जन्माचें ॥ २ ॥ जं जें इच्छिसील मनीं । तें तुज देईल तत्क्षणीं ॥ ३ ॥ आणिक कष्ट नको करूं । नित्य ध्यायीं विनायकु ॥ ४ ॥ भुक्तिमुक्तिची आरत । ध्यायां मोरया दैवत ॥ एवढा महिमा जयाचे पायीं । तो देव आह्मां जवळी आहे ॥ ५ ॥ मोरया गोसावि नटला । जेणें उपदेश सांगितला ॥ ६ ॥ पावे पावे एक वेळां ॥ कृपावंतोता दयाळा ॥ ७ ॥ वाट पाहतों तुझी डोळां ॥ भेट देई तूं मजला ॥ ८ ॥ ध्यान लागलें लागलें । मन वेधलें वेधलें ॥ ९ ॥ तुझिया नामाचा मज भरंवसा ॥ कधिं तुज भेटेन विघ्नेशा ॥१० देह झाला उतावीळ चरणीं तुझ्या विनटेल ॥११॥ तूंचि विघ्नाचा नायकू । होसिल विघ्नाचा छेदकू ॥१२॥ देव नेणे मी आणिक दिना कोण सोडवीत॥१३॥तूं त्रिलोक दाता चिंतामणी ॥ दुजा नेणु त्रिभुवनीं ॥ १४ ॥ विनविदास चिंतामणि ॥ तुझ्या वेधलों चरणीं ॥ १५ ॥

## ॥ ललीतपद ॥

आज एक धन्य दिवस झाला हो माये ॥ गजानन रूप दृष्टि भासत आहे ॥ १ ॥ न गमे न गमे माझ्या मोरयावीण एक एक क्षण जाय युगा समान । गजानन मायबाप आह्मां जोडला । मोरया गोसावि योगी चरणीं विनटला ॥ २ ॥

## ॥ पद ॥

भवश्रम हारला हो मोरया देखिलाहो ॥धृ० ॥ नयनीं अवचींत भासला । अंगीं चंदन चर्चिला ॥ २ ॥ आला लवलाहि धांउनि । भेटि दिधली आलिंगुनि॥३॥ शुंडा दंड उभारिला नाभी नाभीसें बोलला॥४॥ असूरगंजन मोरेश्वर भक्तजना वज्र पंजर ॥ ५ ॥ मोरया गोसाविदातार । विघ्नअंतक मोरेश्वर ॥ ६ ॥

## बाळ संतोष पद.

मोरेश्वरा तूं मजदाता । भेट आसि तत्वतां दान देई तूं समर्था । बाबा बाळ-संतोष ॥ धृ ॥ दान मागतों तुज मी एक । चरणीं ठेविमजनिकट ॥१॥ आणि का अर्थि नाहिंकाज । बा० तूं ह्मणशिल । देइन धनसंपत्ति । नलगे मज धनप्राप्ति ॥ बा० ॥ हृदयींराहे गणपति बा. ॥ ३ ॥ तुज वाटेलदेइन पुत्र कलत्र । नलगे त्याचें सुखप्राप्त । याच्यासंगे दुःखप्राप्त । बाबा बाळ सं० ॥ ४ ॥ प्राप्त गतीच्या ठायीं । कोण न येतिल कामा । शरण आलों तुझियानामा ॥ बाबा बा० । विटलों विषयाच्या सुखा । बाबा० ॥ ५ ॥ लक्ष चौऱ्यार्शीयोनि हिंडनि । कष्ट झाले माझे देहीं । बाबा० । तेणे दुःखें राहो चरणी० ॥६ ॥ मागणें नाहिं तुजकाहिं उत्कट । उद्धरावे वेगींभक्त ॥ बाबा० ॥ दाना उशीर झाला बहुत ॥बाबाबा०॥७॥ तुझें दानलाधलेंगाजयांसि । चुकले गर्भरहिवासासि । बाबाबा० ॥ ८ ॥ त्याच्या झाल्यापुंण्यराशी ॥ बा. ॥८ ॥ प्राप्ति केलि मी तुझि पावें । चिन्-चिंतामणि गोसावी । बा० कृपास्नेहे भक्तापाळी बाबाबाळसंतोष ॥९ ॥

### ॥ पद ॥

माझ्या स्वामीचे भोगविलासरे ॥ धृ० ॥ चला जाऊं पाहुं त्या मोरयासरे ॥ चारदिवस करूं चरणिंवासरे । दर्शन झालिया पातकाहोइ नाशरे ॥ १ ॥ रत्न जडित मुगुट शोभिवंतरे । स्वामि माझा बैसला देउळांतरे । मोरया गोसाविपूजा करितरे । त्याचे हृदयीं नांदतो सततरे ॥ २ एक्यानेरें ती पूजा घेऊन हातीं रे । एक्या नरें आणिल्या पुष्प जातीरे । चंपक बकुली मोगरे मालतीरे । माहाराजाची पूजा करतीरे ॥ ३ ॥ बावनचंदनाचि शोभिवंत उटीरे । नवरत्नाचा हार शोभे कंठीरे । मृगनाभिचाटिळकुललाटीरे । गोरासिंदूर झळकतो भृकुटींरे ॥४॥ जाइजुइ आबया नाग चांफेरे । पायांत कमळें. शोभति घोपरे ॥ भक्त भ्रमर होउनि न्याहळताति रूपरे ॥ सदा आनंद मोरयाच्या कृपेंरे ॥ ५ ॥ भक्तजन द्वारें करावया जातीरे । स्वामि माझा बसला देवळांतरे । अमृत दृष्टि करुनि न्याहाळिति समस्तांरे ॥ त्याचे कृपेनें भाग शिणजातीरे ॥ ६ ॥ भक्तभद्र

जाति द्वारकरितीरे । मोरया गोसावि दिंडि घेऊन हातीरे । भक्त तेथें हरिकिर्तन गातीरे । सकळ जन तेथें लोटांगणीं येतीरे ॥ ७ ॥ तिन्ही द्वारें करूनि मुक्ताईसजातीरे ॥ मुक्ताबाई वंदूनीया महाद्वारींयेतीरे । पंच तत्वाच्या आरत्या ओवाळितीरे । त्यासि तात्काळ प्रसंन्न गणपतीरे ॥८॥ ऐसा आनंद होतसे मोरेश्वरीरे । मोरया गोसाव्याच्या खेळत असे घरींरे। निज भक्तासह परिपूर्ण पूरींरे ॥ ८ ॥ जोगवा ॥ प्रथ..ग आदिस्थानीं । होती वेकुंठीं भवानी । रहिवास मूळपीठ । भुमंडळासि नेउनि ॥ प्रगटली विश्वमाता । नाम जगदंबा भवानी । जोगवा विश्वरुप ॥ अंबापरि पूर्णस्वरूप ॥ ध्रु० ॥ नवे दिवसींपूर्ण झाले । योगीं उद्वार दिवला ॥ चंडमुंडवि भांडोनि आसन घातलें मुळपीठी ॥ जोग. ॥ १ ॥ जोगवा घालिमाये । तुजवो मागतेंस पाहें । देईहो भक्तिरस । विनविमोरया गोसावी । अननी ध्यानि शयनिहो स्मरगणराज हृदयीं । जोग० ॥ २ ॥ माहेर ॥ माहेर हो माझें ऐका हो साजणी गायिनमितेंहिहो वेळोवेळां ॥ १ ॥ सिध्दिबुद्धीं माता गणराज पिता षडानन चुलता हो आहे मज ॥ २ ॥ आजामाहादेव आजी ती भवानी नारदहामुनिहो मा तुला हे मातामह माझे ब्रम्हदेवजाणा कश्यप ऋ मामाहो दुजा मज ॥ ४ ॥ लक्ष लाभ दोन्हिबंधु हे साजिरे काशिराजा तिसरा हो आहे मज ॥ ५ ॥ भुशुंडी हे ऋषी मुद्गल माहा मुनी मोरया गोसावि भक्तजाणा ॥ ६ ॥ अनंत हे फक्त असति देवं राया तयांमाझि श्रेष्ठहो हेचिजाणा ॥ ७ ॥ चिंतामणिदास तुजहो मागतों जन्मोजन्मि हेच हो देई मज सासर सासुरहो माझें एका ॥ हो साजणी त्याचि हे परवडी मी सांगताहे ॥ ३ ॥ निर्दयदादुळा काम हाचि दीर क्रोध हाचि भावा हो आहे मज ॥ २ ॥ आशा तृष्णा दोन्ही जावा आनिवांचा याचा संगहो हाचि नको मज ॥ ३ ॥ लोभिष्ट सासुरा निंदा हेचि सासु याचा हेचि संगे मो त्रासलेसे ॥ ४ ॥ ह्मणोनीया छंद माहेरी लागला जाइनमोरेश्वरा मी आजि तेथें ॥ ५ ॥ तेणे संग तुटति गणराज देखिली या । मुख तेंचि पावेहो जन्मोजन्मीं ॥ ६ ॥ तेथें आसनांत सिध्दिबुध्दिमाता । भेटेलहापिता हो गणराज ॥ ७ ॥ तेणें सूख

वाटे मज हें बहूत प्रपंचाचें दुःखहो जाय तेव्हा ॥ ८ ॥ ऐसे हेसामुर गाइ चिंतामणी ॥ मोरया वाचोनि हो नाहिं कोणि ॥ ९ ॥

## पद.

तैसे माझें मन तुझे कारणी मोरया तैसे माझे मन। घन देखुनी अंबरीं। जैसा आनंद मयुरारे ॥ १ ॥ मेघ वर्षे भुमंडळीं । हर्षे बोभावती चातकरे। तै० ॥२॥ शशि देखुनि चकोरे । तृप्ति पावति अंतःकरणीरे ॥ तैसे० ३॥ बापा जळेवीण मीन । जैसा तळमळी मनींरे ॥५॥ बापा तनुमन विश्रांती । मज नावडे घरचारेरे ॥ ६ ॥ बापा कुसुमा वेगळा भ्रमर विश्रांति न पावेरे ॥ तैसे० ७ ॥ मोरया गोसावी मानसि । तुज ध्यातो मोरेश्वरारे॥ तैसे ८॥

जय जय हो जय गणनाथा ॥ तुजविण कोणहो सोडविल एकदंता ॥ १ ॥ येई येई तुं येई गजानना ॥ उशीर न लावि तुज भापितो करूणा ॥ २ ॥ दुष्ट भोगाचि काय सांगु गती ॥ भोग भोगोनि सांगतों तुजप्रती॥३॥प्रपंचे वेष्टिले काग म्यां करावें। तुज वाचोनि मी कोणासि सांगावें ॥ ४ ॥ उपेक्षां माझि तुं न करी उदारा । तुज विनावितों मी मोरेश्वरा ॥ ५ ॥ जन्मोजान्मिच्या होत्या पुण्यराशी ॥ तरि मी पावलों तुझिया चरणासी॥६॥ चरणी लाविले देवाजि पूर्वीच ॥ आतां कासया तु चाळविसि मज ॥ ७ ॥ गार्भवास मी सोसिले बहूत । आतां तुझिया नेमि आहे निश्चीत ॥ ८ ॥ धांवण्या माझिया तूं उशीर न लावी ॥ तुजविण काय मी देहन ठेवी॥९॥ ऐसी विनंतिहि परिसा गणपती । तुज ह्मणतो राहे माझें चित्ति ॥ विनवी दास हो ह्मणे चिंतामणी ॥ रात्रंदिवस मी तुझे चरणी ॥ ९ ॥

## पद.

अतांचि बापा सावधान होइ लक्ष लावि गजाननिरे ॥ काय तु प्राण्या विषई गुंतलासि शरण जाइ विघ्नेशीरे ॥ आझुन कांरे व्यर्थचि नाडसि सोडवण कर देहासीरे ॥ आपुले ठाई मी तु पण अणाशिल मग तू दिन-रूप होसीरे ॥ १ ॥ कांसया घेति हाति जपमाळा देह शुद्ध नाहि जालारे ॥ वस्त्रे टाकुनि विषयपाई लिन काय चाड तुजसीरे ॥ बाह्य दाख-उनि आपले जना अंतर शुद्ध नाहि झालेरे ॥ २ ॥ काय तुजला अज्ञान पडलें हीत देखि आपुलेंरे ॥ पुत्र कलत्र धन संपत्ति तुझीच तुजला

नवर्तीरे ॥ असत्य वदुनि पापे भरसि बांधुन यम नेति त्यासीरे ॥ ह्मणोनि कांहिं ठेवा ठेवि जरि भजाल मोरश्वर पाईरे ॥ ३ ॥ देहाचा भरंवसा न धरा कांहिं नलिनीवर जल पाहीरे ॥ तैसे जिवित्व आहे हे पाहीं ह्मणोनि सावधान होईरे ॥ आयुष्य भरंवशानें नाडिलें बहूत त्यासच कांहिं न होतेरे ॥ त्यासि झाल्या गर्भवासी यातना दृढ भजा एकदंतारे ॥ ४ ॥ नवचमास कष्ट भोगुनि मग आले बाळपणरे ॥ दोनचार वर्षे तेहि गेलि मग आलें प्रौढपणरे ॥ आपणपण तुज नटावि तरुण वासना धरि विषया चीरे ॥ तरुणपण मेले वृद्धपण आले मग तुज आहे कोणरे ॥ ५ ॥ आयुष्य त्वांरे व्यर्थ दवडिलें कोण सोडविल तुजलारे । येऊनि काळ घालिल पाश मग होशील बापुडारे ॥ गर्भवासाचि नसेल ऊरी त्वरें भजा मोरेश्वरीरे ॥ गजानना विनवी चिंतामणिदास लावि लक्ष चरणीरे ॥ ३ ॥

## पद.

॥ उद्धरीलेजीवा नकळे तूझा महिमा । ह्मणुनि तुझिया नामा शरण आलो बाप ॥ २५ ॥ जडजीव तारिले संख्या नाहिं त्याचि ॥ आशातु आमुचि पुरवि देवाबाप ॥ ३ ॥ भवार्णवि बुडतों धांवे धांवण्या । तेथिल यातना काय सांगु बाप ॥ ४ ॥ यातनेचें भयें लागलों कांसेसि । न धरीं तु उदास दिनालागी बाप ॥ ५ ॥ तुझिया नामस्मरणें पापें झालि दहन । रात्रंदिवस चिंतन आहे मज बाप ॥ ६ ॥ तुझिया चरण कमलीं मनमाझें लुब्धलें । दासचिंतामणि विनवितसे बाप ॥ ६ ॥

## पद.

नलगे गोरंजन नलगे वनसेवन । नामाचें कारण आहे मज बापा ॥१॥ नलगे ध्यान मुद्रा समाधि आसन । नामासिकारण हेच देईबाप ॥२॥ नलगे कळा तर्क । नलगे ब्रह्मज्ञान नामासिका ॥३॥ नलगे मंत्रशक्ति दैवत पूजनना पूजना ना. ॥४॥ मोरया गोसावि स्मरेगजानन नामासिकार ॥५॥

## पद.

एक भाव धरुनि जाईतु प्राण्या शरण जायगजाननीं ॥ १ ॥ भवदुःख तुझें होईल नाशन । मगमुक्ति पद जोडियेलें ॥ २ ॥ संसारि येवोनि काय

त्वारे केलें । गणराज पायअंतरले ॥ ३ ॥ काय तूं प्राण्या सांगजोडिथलें। व्यर्थतुझें जिणंवाया गेलें ॥ ४ ॥ माझें माझें करितां ठकलासि मूर्खा । कोणतूंज सोडविल दुःखां ॥ ५॥ नाम एक तारिलरे फूका । उद्धरील देखा कर्मसंगीं ॥ ६ ॥ आपुलें हीत तूं करणें । एक निष्ठा धरुनिमन ॥ ७ ॥ वेगिं तुझें होईल कर्म छेदन । मम जन्ममरण नाहिंतूज ॥ ८ ॥ ऐसायेक जणि उपदेश केला । गणराज पायिं लक्ष लावा ॥ ९ ॥ चिंता मणि ह्मणे स्वामिमाझासेवा । नाहिं तुह्मा भय याता याति ॥ १० ॥

## पद.

ब्रह्मकमंडलुगंगा पवित्रपावनजगा । तटींदक्षिणिभागिं मोरेश्वर ॥ जो पढिला पूराणिं आदिचिंतामणि । तोपाहुंलोचनिं धरणीवरबाप ॥ १ ॥ चलाहो जाउं मोरया पाहुं । इच्छिलेंफळ देईल देव ॥२॥ भाद्रपद शुद्ध चतुर्थिसि । पोहा मिळाला यात्रेसि । मोरया धरुनिमानसि गर्जताति । करुनि भीमकुंडिस्नान निर्मळ होऊनमन । देवदर्शनामग येतिबाप ॥२॥ प्रथमतां गौराईजननीतीं तें वंदुनि आदिस्थानिं । मग प्रवेशभुवनिं भैरवदेवा ॥ यंथाशक्तिसेवा कुंभजसभंवा । नमनदेवराया मग केलें बाप ॥ ३ ॥ मगभीं तरीं प्रवेशुनी । मंगलमूर्ति देखुनि दंडवत जाउं लोटांगणि । षोडश उपचार पूजा करुंनि । विघ्नराजा आरंभद्वाराचा ॥ तेथुनि या बाप ॥च० ॥ ४ ॥ पुर्वद्वारासिं जातां ॥ तेंथें मांजराई माता । तिचि पूजा करितां वेळू नलगे ॥५॥ बरविमोहंमाया । पूजा करुनिपाया । सर्वेचि देवराया जवळि येति बाप ॥ ६ ॥ दक्षिणद्वारासिं जातां । तेथें आसराई माता । तिचि पूजा करितां वेळुनलगे ॥ बरवी दीनदक्षा भक्ति करुनि लक्षा सर्वेचि कल्पवृक्षा जवाळियेति बाप ॥ ६९ ॥ पश्चिमद्वारासि जातां तेथें आसराई माता ॥ तेथें पंडुसुता श्रम झाला । बरवि तिमिरिजा । चरणिं करुनि पूजा । सर्वेचि विघ्न राजा । जवळि येति बाप ॥ ७ ॥ पावतां उत्तरद्वारिं । तेथें वेद माता मनोहारि । मुक्ताईची थोरि । करुनि पूजा । उल्हास होय ॥ जीवा तेथुन येति धांवा । तो होय विसांवा मोरेश्वरीं बाप ॥ ८ ॥ ऐसा अस्तव्र होतां गभस्ति जे चारिद्वारें करिति । ते फळ पावति । अभिळाषिचें ॥९॥

मोरया गोसावि ह्मणे मज आलि प्रचिती ॥ ह्मणोनि तुह्माप्रति सांगतसे बापा ॥१०॥

## पद.

॥ मोरेश्वरीं आहे माझा मायबाप तयासि निरोप हो सांगा वेगीं ॥ १ ॥ तुझिया भेटीचि आरत वेगीं पुरवी मोरेश्वरा ॥ २ ॥ एक वेळां माहेरिं मजनेई बापा ॥ २ ॥ मज दिधलें आसेदूरी ॥ माझे निष्टर मासुरीं त्याचें घर चाली मज कष्टवीलें ॥ ३ ॥ मजकरितिसासुर वासु । निरंतर किति सोसुं । मज लागि उदास तु नोहे देवा ॥ ४ देवा तूं उदासि होसि दुःख सांगु कोणापासी । मायबाप सखा होसिहो मायबापा ॥ ५ ॥ ह्मणून येतों काकुलति वेगिंपावे मंगळ मूर्ति । मोरया गोसावि तुजप्रति विनविताहे ॥ ६ ॥

## आरति.

आदि अवतार तुझा । अकलुकऱ्हे पाठारि ब्रह्मक मंडलु गंगा । रहिवास तयातीरीं स्नानेंकेलियाहो पाप ताप निवारि ॥ मोरया दर्शन ।जन्ममरण-पैंदूरि ॥ १ ॥ जयदेवा मोरेश्वरा जयमंगलमूर्ति । आरति चरण कमळा । ओवाळूं प्राण जोति ॥ ज.॥ सुंदर मस्तकींहो.। मुगुट दिसे साजीर विशाळ कर्णद्वयिं । कुंडलें मनोहार त्रिपुंडटिळक भाळिं। अक्षता तेजेश्वरा।प्रसंन्नमुख कमळ । मस्तकीं दुर्वांकुर ॥ज.॥ नयनें निर्मळहो।अतिभव्य यासुरेख एकदंत शोभताहे । जडितरत्न माणिक बरवी सोंड सरळ । दिसती आलोलिक तांबुळ शोभे मुखीं । अधर रंग सुरेख जय० ॥ ३ ॥ चतुर्भुज मंडितहो शोभति आयुधें करीं । परशु कमल अंकुश हो । मोदकें पात्र भरी ॥ अमृत फळ नागर शुंडा शोभे तयावरि । मूषकवहन तुझें लाडु भक्षण-करि ज० ४ ॥ नव रत्न कंठीं माळा । यज्ञोपवीत सोज्वळ ॥ ताईत सिरव तसें। ते जडाळ निर्मळ । जाई जुई नागचापे । पुष्पहार परिमळ चंदन कस्तुरीहो । उटि वेगुन परिमळ जय० ॥ ५ ॥ प्रसंन्न दिसे दोंद । तयावरि नाग बंद ॥ सर्वांगीं शेंदुर हो । वरिमिवि सुगंध ॥ नभिमंडळ सुरेख । विद्याकरीनि आनंद कटी सूत्र शोभताहे । मखला कटिबंध ॥

ज० ६ ॥ सुकुमार जानुजंघा ॥ पवित्र चरण कमल वर्तुलाकार घोटे ॥ यांचा दिसति सोज्वळे पाउलें काय वर्णू । अंगुलिकासरळ ॥ नखिचंद्र. मिरवतसे । भ्रम घेति परिमळ ॥ ज ० ७॥ चरणीं तोडरवाकीं । अंदुनाद पाजीरा । रत्न सिव्हांसनींहो । ओवाळु विघ्नहारा । देईल भुक्तिमुक्ति । तुकतिल वेरझारा ॥ गोसावी दास तुझा । मोरया गोसावी दास तुझा ओवाळुं विघ्न राजा ज० ॥ ८ ॥

## आरति.

मंगल मूर्ति राजा । नमियला देव । मनोमयीं येक चित्तिं । ऐसा धरूनीया भाव । मोरया प्रसिद्ध हा । त्रय लोकीं चाराव ॥ पूरवि तो कामना । कैवल्य उपाव ॥ १ ॥ जयदेवा मोरेश्वरा । जय देवा विघ्न राजा । नमो गौरि आत्मजा । आरति ओवाळीन । पावे चिंतल्या काजा ज० ॥ २ ॥ रिद्धि सिद्धि फळ दायका देवा तुचिगा होसि। रक्षिसि चरणा पासि । भय नाहीं तयासि । रवरव कुंभि पाकिं । मुक्ति देसी तयासि ॥ रक्षिसि शरणांगता । विघ्न राजा तु होसि ॥ जय ॥३॥एकदां जाउ यात्रे । एक दंत हा पाहुं राहून मयूर पुरिं । येउनि ब्रह्मादिक हारि । हार हा राहे येउन नाहीं जाती । देवें धरील भाव ॥ ४ ॥ चिंतिल्या चिंतामणि । फळ इच्छिले देसि चहुद्वारि खेटाकरिति । एक कामना ध्याति. चहुयुगिं तुचि देवा । आदि वेद शास्त्रासि चतुर्मुखि ब्रह्मवर्णि । ब्रह्मा काम धेनु आमुची ॥ ५ ॥ तरूण वृद्ध बाळ । माहा द्वारीं धांवती । तात्काळसिद्धत्यासि । भक्त वत्सल होसि । तारक पूर्ण ब्रह्म । दृष्टिपाहे तु आतां । त्रय लोकिं तुंचि देवा । कल्पवृक्ष तु दाता ॥ ६ ॥ मोरया दास तुझा । विप्रकुळ उत्तम । मानसिं नाम तुझें । तया पावलें वर्म । ह्मणती विश्वमुखीं पूर्ण पाहतो ब्रह्म । महा भक्त देव धन्य । नाहिं जाणतानेम ॥ ज० ॥७॥

## आरती.

अनुपम्यदिव्य शोभा । रविकोटी मुगुटिं। त्रिपुंडरेखियेला । मृग नाभि ल्लाटिं । मुखप्रभा काय वर्णु दिव्यकंदर्प कोटि । कुंडलें रत्न दिप्ति पदक शोभे कंटीं ॥ १ ॥ जय देवा ढुंढि राजा जय मूषकध्वजा आरती

ओवाळिन अभय वरदसहजा ज० ॥ २ ॥ सुंदर मुक्ता माळा ॥ पुष्पहार रुळति । आजान बाहुदंड बाहुवट शोभति डुलति चारिभुजा दशांगुळिं मिरवती आयुधें सहित देखा बापा मंगलमूर्ति ॥३॥ स्थुळ हें दोंद तुझें वरि उटि पातळ विचित्र नागबंध शोभे नाभिमंडळा चौदाविद्यांचें भुवन निर्मळ कशिला पितांबर वरि रत्न झळाळ ॥४॥ मेखला रत्नजडित जानु जंघ नादर पोटऱ्या गुल्फ दोन्हि अंदुवांकि साजिऱ्या तोडर रुळति महाथाक आसूरा पाउलें काय वर्णू तेजे लोपल्या तारा ॥५॥ योगिया ध्यानि गम्य सिंव्हासनि गणपति उभया वारि शक्ति समवस्त्र गोति घालिति विंझणवारेवरि चौरे ढाळिति गोसावि योगियाच्या ध्यानि मंगलमूर्ति ॥ ६ ॥

## पद.

पूजाप्रांत आरंभिला विघ्नराज संतोषला तुह्मिचलावे चलावे सिध्दि बुध्दि मंदिरात ॥ १ ॥ उदे उदवूनिया ॥ मंदिर लिहिलें चित्रेंहि सुंदर ॥ २ ॥ रत्नजडित मंचकावरि । शोभे सुपती सुंदरी ॥ ३ ॥ वरी पासोडा क्षिरोदक । शोभे आरुवार आनेक । लावुनिया रत्न दीप्ति । सेवेंलागिं उभ्या शक्ति ॥ मुक्ता फळाचा चांदवा । वरि बांधिला वरवा ॥५॥ सुगंध द्रवें घेउनि सिद्धि । उभी चरण सेवें बुध्दि ॥६॥ ॥ सुगंध द्रव्येंहीं आणुनि । तुह्मा समर्पणा लागुनि ॥७॥ पायघडिया लागि शेले । त्यासि कस्तूरि परि मळे ॥ ८ ॥ करुणा वचनि विनविले ॥ महाराज संतोपले ॥ ९ ॥ देवमंदिरिं पावले । भक्त अज्ञाहि लाधले ॥ ११ ॥ महराज मंचकावरिं । बैसुनि सुखे निद्राकरी ॥ १२ ॥ सिध्दि बुध्दि चरण चुरी ॥ दिनाम तांबुळ दिधला करि ॥ १३ ॥ तुह्मि पहुडावें तहुडावे । घेवुनि पादुका शिरिं । उभा नारायण द्वारि ॥ १४ ॥

## आरति.

॥ एकविस स्वर्गी मुगुट सप्तपाताळिं चरण ॥ आगम्य गम्य रूप आनंद घन । मयूरपुरि राहिवास कैलास भुवन । ब्रह्मादीक सुरवरा नकळे महिमान ॥ जयदेव जयदेव जयजेयगजवदनां ॥आदिपुरुष भाळि चंद्र त्रिनयना॥ १॥ कृपाअमृतघना भवताप शमना ॥ ओवाळु अष्टभावे आरति तवचरणा॥२॥ सहस्त्र वदनें शेष वर्णाना झाला ॥ नकळे तुमचा महिमा स्तविता श्रमला॥

मौन भरून वेद श्रुति परतल्या । तोचि मोरेश्वर भारति अवतरला ॥२॥ कोटि सूर्य प्रकाश कोटी निर्मळ । सर्वात्मा सर्व जिविचा जीवाळा ॥ मोरया गोसावि पाहे अवलीला ॥ देव भक्त प्रेमें घेति सोहोळा ॥ ३॥निर्गुण णवंता तुंविघ्न हारा ॥ भक्त तारा
व या कृपा सागरा ॥ अभय वरदहस्ता ॥ तुंफरश धरा ॥ भवसिंधुतारका तुं करुणाकरा ॥ १ ॥ जयदेव जयदेवज गणपति वेल्हाळा ॥ आरति ओवाळु तुझ्या चरण कमळ ॥ १ ॥ सिंव्हासन कुसरि मिरवती ठसे ॥ तेजे महा थोरभानु प्रकाशे ॥ तयावरि सुकुमार गणराज बैसे ॥ ब्रह्मादिक स्तवितातिं मुनिगण संतोषे ॥ २ ॥ कनक मंडपावरि कलश शोभति । हिरे जडित रत्नें किडा फांकति ध्वजा पताका वरि मीरवती ॥ आकळासि न कळासि कवणा तुं मंगल मूर्ति ॥ ३ ॥ षोडश विधि पूजा झालि गणपाळा । नरसुरगण गंधर्व आनंद सकळा सिद्धिबुद्धि सहित होतसे सोहोळा लिंबलोण करि उमा वेल्हाळ ॥ ४ ॥ अष्ट भावे आरति आनंदे मूर्ति । निजबोधे ओवाळु कल्याण कीर्ति ॥ मोरया गोसावि योगि करतों विनंति शरणांगता दाता तूं मंगलमूर्ति ॥ ५ ॥

## आरती.

अधार चक्रावरि नृत्य मांडिले थोर । टाळश्रुति मृदंग वाजति गंभीर ॥ ब्रह्मविष्णु आदि उमेशंकर । निर्गुण ब्रह्मकवणा न कळेचि पार ॥ १ ॥ जयदेव जयदेव जयनिर्विकल्पा ॥ आरति ओवाळु निर्गुग निजरुपा ॥१॥ नृत्य करितां शेष करी डळमळ । कूर्मल पविमान राहे निश्चळ ॥ भारिंवर हा दाढा उपटे समूळ ॥ गिरि गिरि भवरि देतां दणदणि पाताळ ॥ जय ॥ २ ॥ कडकड कड आकाश कडाडे दारुण ॥ घड घड घड गर्जे गगन। चळ चळ चळ ॥ पृथ्वी कांपे त्रिभूवन ॥ धिगाधिग् धिग नृत्य करि गजानन ॥ ३ ॥ तेत्तिस कोटि देव वर्णीति सीमा परमानंद पूर्ण ब्रह्मपरमात्मा॥अगणित गुण सागरा ॥ भाळिचंद्रमा ॥ नटला सूरवरा नकळे महीमा ॥ ४ ॥ ऐसे तांडव नृत्य झालें अम्दूत । हरिहार ब्रह्मादिक उभे तटस्थ मोरया गोसावि योगि ध्यानस्थ ॥ एक रुप होउनि ठेलेद्वैता अद्वैत ॥ ५ ॥ धरणी धर महाराजांचीं पदें.

## पद.

ध्यान भजन करित तुह्मीं मथुर पुरीं जा ॥ ध्रु० ॥ सकळ तुमचे ताप-हरिल दुरित सर्व दूर करिल । विमल मना करुनि सदा पाय पाहत जा ॥ १ ॥ विघ्नाचा कोणअरी । तोचि आहे कर्‍हे तिरीं । सत्य मिथ्य पाहुनि नित्य ध्यातजा ॥ २ ॥ वेदशास्त्र वर्णिताति हेचि मंगलाचि मूर्ति ॥ अवतरलि दिनाह्मागि धरणीधर काजा ॥ ३ ॥

## पद.

कांहिं उमजारे ॥ शिणतां व्यर्थ कशालारे ॥ ध्रु० ॥ मी मी ह्मणतां बारे ॥ तुमचा शोध नाहिं तुह्मांरे ॥ १ ॥ सावध होउनि पाहारे आविद्येची सारे ॥ २ ॥ मिथ्या भासति भवपसारे ॥ ३ ॥ धरणी धरदासारे. ॥ विश्व-ब्रह्मचिहेसारे ॥ ४ ॥

## पद.

काय माझें माझें ह्मणुनि व्यर्थ बोलसी ॥ ध्रु० तात माता बहिण बंधु दारा पुत्र मित्र तुझे । अंति तुझ्या कोणी कामा नये जाणसी ॥ १ ॥ नल निदला वरिल जल । तरल जैसें तैसें पहा । यौवन धन आयु आसुनि काय डोलसि ॥ येथें तुझें पाहतां बारे शोध नाहीं आता ॥ मृग जळवत मिथ्या भिंति काय तोळशीरे ॥ ३ ॥ ऐसें पाहुनि सत्य मनिं । धरणीधर नित्य गणी गुरुप्रभावे ।सत्य राहे वरदमागसी ॥ ४ ॥

## पद.

गजवदना तुह्मिकारे भजानाहित न अहित तुह्मां कांहिं कळेना ध्र० लक्ष चौऱ्यांशी योनिसि फिरतां कष्टें नर तनु प्राप्तहि जाणा ॥ १ ॥ साधन करितां या देहासी । साध्य असुनि बाकां उमजानां ॥ २ ॥ कांहिं खटपट करणें न लगे मन कुसमाते अर्पाचरणा ॥ ३ ॥ मग तो इच्छा तुमाचि पहा बरें । धरणी धरहा कसा पुरविना ॥ ४ ॥

## पद.

वदनी मुख कर घेई नाम । होउनि तु निष्काम ॥ ध्रु ० मंत्र तंत्र मंत्रादिक साधनें जाणुनि मुंचमुकाम ॥ २ ॥ भक्त मनोरथ सहाजचि पुरविल पहा तो मंगल धाम ॥ २ ॥ नामाचें साधन जरि होईल पाहासिल

निज सुखधाम ॥ ३ धरणीधर दासाचा निश्चय पाहुनि पुरविल काम ॥ ४॥

## पद.

जेजें जिकडें पाहसि तिकडें विनायक जाणिजे ॥ धृ० भ्रांतपरी भ्रमुनिव्यर्थ काय करसि तूं अनर्थ ॥ आरे आरे आरे स्वकिय अर्थ हाचि पाहिजे ॥ १ ॥ सर्वांघटि मटि एक असोनि पाहसि अनेक ॥ नको नको नको कांहिं श्रम मनन पाहिजे ॥ तत्व दर्शी महाराज सद्गुरुसि पुसुनि काज । त्वरें त्वरें निज हित गुज त्वरित् समजरे ॥ ३ ॥ मना समज उमज कांहिं नित्य प्रार्थितों मि पाहि ॥ भज भज भज धरणी धर हेंचि सांगिजे ॥ ४ ॥

## पद.

नीजव्योमि चंद्र गणेश सविता रूप आहे आस्तोदय नाहित्यासी शोधि लवलाहे ॥ १ ॥ सर्व साक्षि असुनि तया जडबुद्धि पाहे ॥ अहं सोहंभावें जीवअसे मिथ्या कसी ताहे ॥ जैमा श्रीमान्स्वप्निं दैन्य आपुलें पाहे भ्रांति करुनि दरिद्री मि हें नाम ठेविताहे॥२॥ अविद्या हे निबिडध्वांत तेव्हां दूर जाय ॥ श्रुत्यंयुक्त्याशिष्ट संगेप्रकाश तेथें होय ॥ ३ ॥ त्यासि मग यम नेम कर्मधर्म कांहे ॥ नित्य मुक्तधरणीधर त्यासि ह्मणत आहे ॥ ४ ॥

## पद

गजानन नाम मंत्र सतत जपी रे ॥ भवभूत पीडा तुज आहे जरी रे तरि उपाय सांगतों ऐके त्वरित बरा रे ॥ १ ॥ गुरु पंचाक्षरि असा पाहावा कोठेंरे ॥ ज्यादृष्टा दृष्ट होतां सुखशेष राहिरे ॥ २ ॥ उतारा हा सांगतों ऐके तुजसि खरा रे ॥ मन चरवृत्ति दृधि मिळवोनि ठेवि रे ॥ ३ ॥ मग अंगिं वारें येवुनि बोलसि तूं स्पष्ट रे ॥ तेव्हां धरणिधराहित आपुलें हेंचि करीरे ॥ ४ ॥ तेव्हां समाधान तुझें करितों पाहा रे ॥५॥

## अभंग.

नाम घ्यारे मोरयाचें तरि सार्थक जीवाचें ॥ १ कलियुगिं नामाविण अन्य उपाय नये जाण ॥ २ ॥ नामें बहूत तरले पुन्हां जन्मासीन आले ॥ ३ ॥ धरणि धरा मज द्यावें नित्य नामची वदवावें ॥ ४ ॥

## अभंग.

तुज मागतों मी आतां ॥ मज द्यावें एकदंता ॥ १ ॥ तुझे ठायीं माझी भक्ति ॥ विरूढावि गणपति ॥ २ ॥ तुझे ठायीं ज्याचि प्रीति ॥ त्याचि घडावि संगति ॥ ३॥ धरणीधरा ऐसें ध्यावें ॥ सर्वा भूतिं लीन व्हावें ॥४ तुज शरण शरण ॥ आलो पतित मी जाण ॥५॥ तुझा अपराधि मी खरा ॥ आहे इक्षुचापधरा६ माझि येऊंदे करूणा ॥ तूज लागिं गजाननां ॥७ धरणीधरा तुजवीण ॥ दासा नाहीं दुजें जाण ॥ ८ ॥

## अभंग.

देवा तुझे ठायिं माझि दृढ भक्ति ॥ राहो गणपति सर्व काळ ॥ तुजवीण मज आणिकाची स्तुति ॥ करावया भ्रांति लावि मज ॥ २ ॥ माझेचक्षु लागिं तुझें अवलोकन ॥ घडावे नमन वारंवार ॥ ३ ॥ धरणीधरा नामा विणजे श्रवण ॥ तयाचे ते कर्ण संज्ञा मात्र ॥ ४ ॥

## अभंग.

चला जाउं मोरेश्वरा पाहुंसिद्धिबुद्धि वरा ॥ १ ॥ मस्तक ठेवू चरणांवरी ॥ उभे राहुं महाद्वारी ॥ २ ॥ मग सुख आपणा ऐसें ॥ ब्रह्मादिकांतेंही नसे ॥३॥ ऐसा अनुभव आहे खरा ॥ भावें पुसा धरणीधरा॥४॥

## अभंग.

देवा मज हेंचि द्यावें ॥ तुझें भजन घडावें जे मी करीन अवलोकन ॥ तेथें तुझेंचि स्फुरण ॥ २ ॥ जिकडे माझें मन जावें तिकडें शुंडायुक्त व्हावें ॥ ३ ॥ याचक धरणीधर विनवी ॥ दासा कृपा ऐसि दावी ॥ ४ ॥

## अभंग.

अणखि मागतों मी देवा ॥ नित्य घडावि ही सेवा ॥ १ ॥ भूत निंदा क्षुद्रसंग ॥ हा मज न घडावा व्यासंग ॥२ ॥ सदोदित तुझें प्रेम राहे ऐसा करवि नेम॥३॥धरणीधर दीनावाणि ॥ दास विनवितों चरणी ॥४ ॥

## अभंग.

अखंड आहे ज्याचें वदनीं शुद्ध नाम चिंतामणी ॥ १ ॥ त्यासि योग याग धर्म ॥ घडति नैसर्गिक कर्म ॥ २ ॥ त्याचें दर्शन जे घडि

होय ।। भवदैन्य तेव्हां जाय दास द्यावा धरणीधरा ।। ब्रह्ममुखाचा तो थारा ।। ४ ।।

## अभंग.

अगणितकीर्ती माझा मंगलमूरती ।। याचि स्वरूपस्थिति नकळे कवणा ।। १ ।। श्रुतीसी कळेना योग्यासि स्फुरेना ।। अन्याचि गणना कोण करी ।। २ ।। आह्मी जडदेही ऐसें जाणूनिया ।। पाहतों मोरया सगुण झाला ।। ३ ।। कृपेचा सागर माझा धरणीधर दासाचा उद्धार करितों पाहा ।। ४ ।।

## अभंग.

काय म्या तें देवा वीनवावें तुतें ।। नाहीं ज्ञान मातें पहा पहा ।। १ ।। मुकातें वाचाळ पंगुतें पायाळ ।। करसि दयाळ आपुले कृपें ।। २ ।। तरि माझ्या हेचि बोबड्या बोलातें ।। स्विकारावें माते मयुराबाई ।। ३ ।। भक्ति माझि दृढ राहो तुझे पायीं ।। धरणिधरा देई सर्वकाळ ।। ४ ।। ।।

## अभंग.

तुझे पायीं देवा घातलीसे मिठि ।। प्रपंचराहाटि चुकवि मज ।। १ ।। योगयागधर्म नहोय ते मातें ।। ह्मणोनि पायांतें धरितों देवा ।। २ ।। आवडि मज एक करितों भजन ।। दुसरें तें जाण कांहीं नोहे ।। ३ ।। धरणिधरा तुझा माझा हा स्वभाव ।। कसोनिकरावें सुखें मातें ।। ४ ।।

## अभंग.

कोणातें शरण जावें तुजवीण ।। आहे मी अज्ञान कृपा करी ।। १ ।। माता जरि क्रोधें बाळका टाकील ।। मगकां राहिल त्याचा प्राण ।। २ ।। वैश्यपुत्रा लागिंपित्यानें मारीलें ।। बल्लाळें धरीलें तुझें ध्यान ।। ३ ।। तेंव्हांतुज कैसी उपजलिदया ।। माझिया मोरया दयानये ।। ४ ।। ऐसे न करावे धरणिधरा द्यावे ।। भजन घडावें सर्व काळ ।। ४ ।।

## अभंग.

आलिया जन्मासि ऐकावें पुराण ।। गणेशाचें जाण सर्व काळ ।। १ ।। जया पुराणाचा अगाध महिमा ।। व्यासादिका श्रमवर्णावया ।। २ ।। तेथे म्यांपामरें वर्णावेंतें काय ।। परिगणराय वर्णवितो ।। ३ ।। त्याचिसत्ता कांहिंको

णासि समजेना. अंधासि तो जाणा डोळस करी ॥ ४॥ मूर्खासि तें ज्ञान धरणिधरा देई अनुकंपेचे छायीं वसवि सदा ॥ ५ ॥

## अभंग.

अनंत जन्मिचें सुकृत॥त्याचि गजाननीं प्रीत ॥ १॥ तो जरि जन्मासहि आला भवदुःख नाहिं त्याला ॥२॥ यमादिकां त्याचें भय अन्यगणना तेथें काय ॥३॥ धरणीधराचा कैवारि॥तोचि जाणावा निर्धारी ॥ ४ ॥

## अभंग.

पाहा मंत्र हाची सोपा गजानन मायबापा ॥१॥नलगे वर्ण आणि आश्रम॥ कांहिं करणें नलगे धर्म ॥२ ॥ उद्धरति सर्व ज्ञाति ॥ नका संशय आणू चित्तिं ॥ ३ ॥ धरणिधराचें साधन बुधें जाणावें कारण ॥४॥

## पद.

तूं सावध होउनि पाहि ॥ मना सावधान मानवदेहीं ॥ध्रु॥ बहु जन्म घेउनि श्रमला॥आतां कैसें तें विसरला करुं नयें ऐसे स्नेहाळा॥तूं भजरे दीन दयाळा॥नको मानुं याचा भरंवसा देह आहे पाहा तूं कैसा॥ उदकावरि बुदबुद जैसा॥१॥तूं जाणसि हें अनुमान शतआयुष्यवेदप्रमाण॥परि मिथ्या नसे हें ज्ञान॥ येथें पूर्वकर्म प्रधान॥सांडि सांडि हि कल्पना तूं भजरे द्विरदानना हें साधन मुख्य सुजाणा ॥२॥ तुजवाटे बाळपणांत॥ आपण व्हावें क्रीडासक्त॥ मग तरुणपणामधि हेत स्त्रीसक्त असावें गमत॥ पुढें वृद्ध अवस्थेमाजी दिनगणना करितो यमाजी तेंव्हां सावध हो का जि॥३॥ या माटि घडिपळ आतां॥ तूं भजरे एकदंता॥ हा उपाय सुगम पाहातां पाहा होईल तरिचा आतां॥नाहिंतरी व्यर्थ श्रमसि धरणीधरा हित न करिसी॥ मोहा मदिरा घेउनि बुडास ॥४ ॥

## पद.

अरे तूं कां भुललासि आतां फमशील नरतनु ही जातां. ध्रु रक्तमांस अस्थिचा पिंडा नश्राचिम्बळ पाहतां दोपळांचा नाहिंभरवंसानको करुं अहंता ॥१॥ आई नाहिं माई भाई बाप आणि चुलता ॥ कोण कोणाचा समज बापा नको करूं याचि चिंता ॥ २ ॥ अवघा आहे ज्याचा खेळ त्याचा लावि-

पत्ता अवघे माझे ह्मणुन तुजला अंति बसेल गोता ॥ ३ ॥ तुझे सुखाचे भागी मगळे धरणीधर पाहा आतां ॥ दाणा खाउनि पक्षि उडती घेई याचि दृष्टांता ॥ ४ ॥

## पद.

मज निष्ठुर होउं नको गणरायारे ॥ दास तुझा मी सेवाचोर आहे परि घातलि मिठि पायांरे ॥ १ ॥ वत्सगाईसी बहुतप्रकारें । छळि ह्मणुनि कां करि कोपारे ॥ २ ॥ धरणीधर तुज शरण आला असे । यावरि दयेचि करि छायारे ॥ ३ ॥

## पद.

हेरंबाचें सद्भावें नाम घ्यावें हो ॥ निरसूनीयां माया आनंदें स्वस्थ राहावें हो ॥ धृ ॥ कांहो शिणतां या पोटासाठीं हो ॥ अनंत श्री जो त्यासि धरा कंठीं हो ॥ १ ॥ मग त्यासि लागेल तुमची चिंता हो । ऐसा अनुभव आहे सर्वांसि पाहातां हो ॥ २ ॥ गर्भस्थानिं असतां संरक्षीलें हो ॥ शेष वृत्ति कारणें काय झाले हो ॥ ३ ॥ दिन दयाळ माझा हा धरणिधर हो ॥ विकल्प सोडुन भजा निरंतर हो ॥ ४ ॥

## पद.

गावा निशिदिनिं ध्यावा मंगलमूर्तिसिअद्वय भावा ॥ धरुनि मिपण सांडुनि आत्मानात्म विचार करावा ॥ धृ ॥ त्याहुन भिन्नत्व पाहा कांहिं नाहिं ऐसें असतां उगाच चक्रापरिकां भ्रमतां ॥ समजे ना तरी उमजूनि ध्यावी ॥ १॥ पाहा या दृष्टांतावरूनि पात्र स्नेहें वार्ति करुनि।प्रकाश तेजा वांचुनि जैसा नाहिं तैसा अनुमानावा ॥ २ ॥ जैसे आकाश पाहे ॥ सर्वहि व्यापूनि कोठें आहे॥जळिं स्थळिं काष्टीं पाषाणिं धरणीधर तैसा पाहावा॥३॥

## पद.

मतिला काय तुझ्या झालें । अवघें भुरळ कसें पडलें ॥ धृ० ॥ आपुले दृष्टि करून पाहासी प्राणि जन्मुनि मेले ॥ तरि सुखाचि इच्छा तुजला पशू बरें ह्मणवीले ॥ १ ॥ हत्ती घोडे शिबिका सेवक धनादीक मिळविले ॥ तुजवर जेव्हां गुजरेल तेव्हां याचें कांहिं न चालें ॥ २ ॥

मनवाजीसी विवेक लगाम देऊनि जे वर बसले ॥ नाम भल्ल तो घेऊनि सरळ मोठे मोठे गेले ॥ ३ ॥ या आख्यानें धरणिधरा त्वां जावें तरि निट झालें ॥ गुंतुनिया मोहासि किति एक नाना योनिंत फसले ॥ ४ ॥

## पद.

मना तूं भाव धरी नीका । हृदयीं चिंतीवि नायका ॥ धृ ॥ आप्त-परकि मिथ्या आवघे पाहाती तुझा पैका ॥ तो नाहींसा झाला ह्मणजे देतिल तुजला धक्का ॥ १ ॥ उगाचि भटकत फिरूं नकारे प्रपंच आहे लटका ॥ सावधपणि तूं सावध होई मगहि जाईल घटिका ॥ सारासार विचार करून पहा तरिच होइल सुटका ॥ दुर्लभ तनुही जाईल निघुनि आला पुन्हा त्या झोका ॥ ३ ॥ चुकेल चौऱ्याशींचा फेरा धरणिधरातें ऐका नामस्मरणीं निश्चय ज्याचा त्याला येईल हा ठोका ॥ ४ ॥

## पद.

तुला शरण आलों चरण त्वरित दावि मोरया ॥ धृ० ॥ भक्तिहीन दीन लीन । जालें तुझे ठाईं त्राहि हो ॥ १ ॥ सुष्ट नसे दुष्ट आहि कष्ट तुला हो ॥ स्पष्ट आह्मां सांग आतां स्वस्थ राहि तूं हो ॥ २ ॥ चित्तीं तुझें वसें जसें तसेंच पाहि हो । पतितपावना धरणिधरा नामि सफळ हो ॥ ३ ॥

## पद.

गणराया तुं लवकर येई ॥ भेटि आनाथासि देई ॥ धृ० ॥ तुजविण सकळही व्यर्थ आह्मासि ॥ सर्व सौख्य तुझे पाईं ॥ १ ॥ ध्यान पुजन यमनियमन घडति योगादिक ते पाहींरे ॥ २ ॥ सर्वसाक्षि सर्वात्मा विभु तुज करुणा येउंदे कांहिंरे ॥ ३ ॥ धरणीधरा दासाचे हृदयीं अहर्निशि तूं राहींरे ॥ ४ ॥

## पद.

सोडि संग प्रपंचाचा ॥ गजर करी त्या नामाचा ॥ धृ० ॥ संतत संपत्त काया जाया आभास अविद्येचा ॥ समजुनि उमजुनि घेऊनि प्रहर्ष शोक करिसि कोणाचा ॥ १ ॥ स्वतंत्र असतां गोता खासी झोका हा

मायेचा ॥ जीव शिवाचा अभेद पाहीं प्रसाद घे गुरु घरिचा ॥ २ ॥ धरणिधरा दीनाला आश्रय तुझ्या एक भजनाचा ॥ सत्कवितेचा अनुभव ज्येणें विचार बहु पुण्याचा ॥ ३ ॥

## पद. ( गारुड )

पहा सखेडि देव आहे कैसा ॥ ज्याचें गारुड न गमे श्रुतिमहेशा ॥ धृ० ॥ आदिमध्य अवसानस्वरें ॥ जिवा शिवासि भुलवि नागसूरें ॥ मायाढोलाचा नाद करणि भरे ॥ मग सोहंभाव न राहिले सारे ॥ १ ॥ वेडा होउनि पडे गर्भवासि बाल्य तारुण्य वृद्ध व्हावे ऐसी ॥ लहरा येति त्या विविध मनासि ॥ अहं कोहं ह्मणून फेरे घेसि ॥ गुरुपंचाक्षरि पाहणें आलें यासी ॥ २ ॥ आपणा नोळख झालि कैसी ॥ विवेक झाडणि करितां ओळखीसी ॥ धरणिधरा दे ठाव पायांपासि ॥ ३ ॥

## पद.

दावि पाय मोरबा आतां ॥ धृ० ॥ कामादिक षट्शत्रु बलिष्ट जाचिति मज अनिवार ॥ धांउनि येईं दयाळा सोडवि देवा नाहिं धीर ॥ २ ॥ सिंदूरे गौरी चोरुनि नेतां ॥ स्तविता प्रगटसी वीर ॥ ३ ॥

## पद.

आह्माला मंगलमूर्तिचा आधार ॥ धृ० ॥ उभृत शुंडा करूनि देतो नाभिकराचा थार ॥ सगूण निर्गुण नटून आपणाचि दावितो विश्वाकार ॥ श्रुतिस्मृति जो ठायिं पडेना नकळे अंत न पार ॥ अनन्यचिंतन करि धरणीधर समजेल सकळहि सार ॥ १ ॥

## पद.

मोरोबा दे पायाची जोड ॥ धृ० ॥ तुजविण कवणा शरण मी जाऊं क्रोध मनींचा सोड ॥ १ ॥ नाना दुखें भोगुनि सारिं । सोडिना वासना खोड ॥ २ ॥ माया तुझी हे तुचि निवारि ॥ काढि कृपेचि तोड ॥ ३ ॥ धरणीधर हा एवढेंचि जाणें । नाम तुझें बहु गोड ॥ ४ ॥

## पद.

गणपति मी पाहिला स्वरुपी सुंदर दिसलारे ॥ धृ० ॥ रक्तांबरधर

शुंडाविराजित मूषकावरि बसलोरे ॥ ग० १ ॥ भक्तराज कैवारी प्रभु तो । मोदक भक्षित आला हो ॥ ग० २ ॥ गणपतिचा सुत पाहुनि मूर्ति तन्मयडोहीं बुडलाहो ॥ ३ ॥

## पद.

गणपतितें आठवा । जनहो तुह्मि गण० ॥ ध्यान पुजन यमनेम न घडति । हृदयपुटिं सांठवा॥१॥ ढुंडि पदिं मन ठेऊनि दुःखा यमसदनी पाठवा ॥ जनहो ॥ २ ॥ गणपति सुतकथी ॥ गणपति नामें भव सिंधू आटवा ॥ ३ ॥ मोरयार्पणमस्तु ॥

## भुपाळि.

भावें अष्टविनायक भजा स्वानंदीच्या लावा ध्वजा । सिद्धिबुद्धि जयाच्या भाजा । धांवति काजा भक्ताच्या ॥ धृ० ॥ मोरगांवीचा मोरया स्मरतां नेतो भवभय लया । सिद्धटेकचा सखया सिद्धिविनायक भजावा ॥ १ ॥ बल्लाळेश्वर पलि क्षेत्रीं मुरुविनायक नाम पवित्री । अखंड ध्याति गाति वक्रि दाखवि नेत्रिं निजस्वरूप ॥ २ ॥ थेवुरिं नांदे चिंतामणि चिंतित देतो अर्धक्षणीं ॥ गिरिजात्मज मोक्षदानी लेण्यांद्री हो पहाजा ॥ ३ ॥ ओझरचा तो विघ्नेश्वर सकळ सिद्धिचा दातार॥अखंड ध्याति गाति नर करिति पार भवसिंधु ॥ ४ ॥ भा० ॥ रांझण गांवीचा गणपती स्मरतां देतो भुक्ति मुक्ति संकटि रक्षी दासा प्रती ॥ मंगलमूर्ति मोरया॥५॥ प्रातःकाळि ही भूपाळि स्मरतां गांतां चंद्रमौळि मोरयागोसाव्या जवळि उभा राहे गणराज ॥ ६ ॥

## काकड आरति.

काकड आरति होति श्रीविनायका ॥ भावें ओंवाळिती भक्ति ओंवाळिती सिद्धिबुद्धिनायका ॥ धृ० ॥ सत्वरजतमात्मक काकडा केला । भक्ति स्नेहें युक्त ज्ञानाग्नीनें चेतविला । ज्ञानाग्नीनें उजळला ॥ १ ॥ विद्याविद्या सिद्धिबुद्धि चारि दोभागीं ॥ मध्यें निर्गुण प्रणववदन पाहताति योगी ॥ २ ॥ अहं सोहं तालघोष होतोत्यासंगें ॥ अनुहतमृदंगाचि ध्वनि उमटति त्यारंगे ॥ ३ ॥ सनक सनंदन ध्याति शुक कपाल अवधूत सत्य-

ज्ञानी निरत ह्मणूनि गर्जताति भक्त ॥ ४ ॥ मुद्गल भ्रुशुंडि सोमकांत॥ भ्रुगुवरेण्यादिभक्त ॥ व्यास वसीष्ठ नारद येउनि पाहति गजमुख ॥५॥ निराभास निर्विकार निर्गुण निश्चल अव्यक्त ॥ चिन्मयमूर्ति स्वानंदासनि पाहता तीं निजसुख पाहति निजभक्त ॥ ६ ॥ उपनिषदादि वेद-शास्त्र गुरुमहिमा वर्णीत गुरूविण अनुभव नकळे त्यासि लागेना अंत ॥६॥ अंबा भास्कर हरिहर ब्रह्मारूप गणाधीश ॥ मोरयागोसावि पाहे हृदयि-परमपुरुष ॥७॥ काकड आरति हो ति श्रीविनायका भावें ओवाळिति भक्ति ओवाळिति सिद्धिबुद्धिनायका ॥८॥

## निरंजन स्वामींचीं पदें.

कैसें येणें व्यापिलें मंगल निलयें जनिं वनिं वनधरणि या कश्यपतनये नानाकारे संचरलें अद्वयनभहे तैसें येणें कोंदिले अंतर्बाह्ये कै० ॥ १ ॥ जळिं हा खेळे तव सदनीं सवेंचि लोळें कोठें भक्षी नवसुंदर नवनीत गोळे क्रिडा करिता वाजताति खुळ खूळ वाळे ॥ ज्याच्या संगें सज्जन जन निवति भोळे ॥ कैसे० ॥ २ ॥ अपूर्व वसने सेवीनव अन्नें भक्षी ॥ सारिगगम पदनिधि ध्याय गायन लक्षी ॥ नृपवर मोठे सामर्थ्यें निज रक्षी चर्चा करिति जननामि गाति पक्षी ॥ ३ ॥ ऐसे द्वैत पाहतां विधिनंदन भ्रमले ॥ नानाद्वारें फिरले बहु दुःखि श्रमले यको-नि सर्वहिजन निरंजनी ते भरले ॥ तेथें दासापाहुनि वन घन संचरले ॥ कैसे० ॥ ४ ॥

## पद.

गणपति राहे ज्याचें अंतरि । मुक्तचि तो संसारीरे ॥ धृ ॥ सुर रिपु कंदन काश्यप नंदन कासि भुवनि विहारीरे ॥१॥शुक्लांबरधर दशभुज सा-युध भक्तकाज कैवारीरे ॥ २ ॥ स्वधर्म पालक अधर्म छेदक मुनिजन निजसुख कारीरे ॥ अनंत ब्रह्मांडाधिपती हा सर्वांहि समनिर्धारीरे ॥ ३ ॥ नित्य निरंजन चिन्मयचिद्घन दासाचा कैवारीरे ॥ दीन दयाळ दासा रक्षक होय स्वयंभुज गारीरे ॥ ४ ॥

## गोसावी नंदन पद.

दिनानाथा दयाळा येईगा गणाधीशा गणधीशादि. ॥ बहु तनुहि तापलि हे तापत्र यतुं वारि॥आतां वेगि तारि मोरया भवसिंधु पारावारी ॥ पतित पावन नाम हें तूं साच करावें स्वामी आहे सेवाचोर परंतु ह्मणवितो तुझा मी बंधु माता तात सखामज तुजविण कोणि नाहिं ॥ गोसाविनंदन विनवि करुणा दृष्टि पाहिरे दि० ॥ ५ ॥

## पद.

आह्मि मोरोबाचे चाकर ॥ टाळ विणा मृदंग गाउसुस्वर ॥ ब्रह्मा विष्णु शीवशक्ति दिवाकर॥ सह परिवारे चरणिं निरंतर॥ आ० ॥ धृ०॥ अडशेरि नेमियल्दिरशेरी ॥ लाडु मोदक भात वरान्नें ॥ चतुर्विध षड्रस पक्काने दूध तूप दधिसाखर ॥ १ ॥ वतना सोन्याचि गणना । मुद्रा रौप्यस्थरत्न बहुरत्ना पटकुरे बहु साधि भरजर ॥ ३ ॥ चाकरि नेमियलि सरदारी ॥ नवविध भजनाची अक्तचारि ॥ निसबत हरिहर हेअधिकारी॥ सुभेदार कन्हेपाठारि ॥ मोरेश्वरि आह्मि जाउ निरंतर ॥ आह्मि० ॥ ४ ॥ निरंजन दासालागि गजानना हेचिवेगी द्याविचाकरि नव भागि ॥महाराजा सत्वर ॥ मोरो० ॥ ५ ॥

## पद.

अद्वय ब्रह्म या गाई चारितो बाई ॥ धृ ॥ कोटि मदन वपुसुंदर तुं होसि जळमिन पाही हो ॥ बाई चारितो इक्षु सागर क्रिडितो बाई ॥ दहिं दुध तुप लोणि हा खाई ॥ १ ॥ जो उत्पत्ति स्थिति संहारि त्यासि बांधित सुमदा पायी हो ॥ ३ ॥ निरंजन जनिरंजनि ह्मणे देवा ठेवि मज पायीं हो ॥ २ ॥

## पद.

सिद्धिरमण बुद्धिरमण भजन करायाचें ॥ धृ० ॥ रत्न जडित सिंव्हासन मयुर वाहन ज्याचें ॥ त्रिपुरारि ध्यानकरि विघ्नहारि त्याचें ॥ १ ॥ शमिपत्रें दुर्वांकुर चंद्र शिरि शोभे ॥ त्यासि निरंजन ह्मणें नाम देयि वाचे ॥ २ ॥

## अभंग.

कोण गावीं आहे माझा चिंतामणि मात तरी कोणी सांगा त्याचि ॥ १ ॥ लागतसे पाया येतों काकुलति माझा मंगलमूर्ति दावी तया ॥ २ ॥ घडिपळ जाय युगाचे समान जाउं पाहे प्राण मोरया विण ॥ ३ ॥ जिवन दासह्मणे संतया सजनि दाखवा नयनीं स्वामि माझा ॥ ४ ॥

## पद.

चिंतामणि चिंतामणि जयसिद्धि पते ॥ चिंतामणि चिंतामणि जयबुद्धिपते ॥ सिंधूरा रुणहारा साधु सुमनविहारा ॥ १ ॥ पवनाशन कटिसूत्रा अग्नी रविशशि नेत्रा ॥ २ ॥ करधृत अंकुश पाशा सुंदर तुंदिलवेषा ॥ ३ ॥ भालेधृत शशिखंडा अलि कुलमंडित गंडा ॥ ४ ॥ मुक्तमणि कृत हारा जान्हविती रविहारा ॥ ५ ॥ काशीराजगणेशा ॥ पालक पूर्ण परेशा ॥६॥ सुमदामा धनतनया सुररिपु खलजन विजया ॥ ७ ॥ नित्य निरंजन दासा पालक दासविलासा ॥ ८ ॥

## अभंग.

संत समागम शुद्ध माघमास हाचि मुख्य मास गणेशदासा ॥ १ ॥ सार्थ दिवस चारिकरावा संभ्रमसंतसमागम शुद्ध पक्ष ॥ २ ॥ श्रवणाचे बीजा श्रवण करावें ॥ हे वर्म जाणावें प्रतिपदा ॥ ३ ॥ कीर्तनें सत्कीर्ति पावावि वर्णावि जाणावि द्वितीया भक्त राजा ॥ ४ ॥ आठवाचा अठवविसराचा विसर जाणावि चतूरें त्रितीयाहो ॥ ५ ॥ पदपाप्ति घडे पद सेवनाने चतूर्थिस ज्ञाने ओळखावे ॥ ६ ॥ पंचमी पारणें होय उपासका ॥ तेथें विनायका द्वैत नाहीं ॥ ७ ॥ ऐसा श्री गणेश माघमाशी झाला निरंजन तेथें एक असें ॥ ८ ॥

## द्वारयात्रा पद.

श्रवण हें पूर्व द्वार । तेथें श्रवणाचे सुरवर । तेहि आचरले थोरथोर । तेहि झाले सुखसागर॥१॥आह्मि मोरोबाचे चाकर। सदा ध्यावूच मोरेश्वर । ध्रु ॥ भावें करूं ही चारी द्वारें । तेणें चुकतिल जन्म फेरे । काम काम नाहिं वोसरे ॥२॥

दक्षिण द्वार तेहेमन । तेथें मोरयाचें मनन तेंही अचरले बुधजनें तेंही झाले सुख संपन्न हो ॥अ.३॥
पाश्चिम द्वार हें तें चित्त तेथें निजध्यास दैवत । तेंही आचरले बहुत तेथें झाले कृत्य कृत्य हो अ. ॥४॥ तुर्या अवस्थाहो जाणिव । समज उत्तर द्वाराचा भाव । तेथें साक्षात्काराचा देव।गणेश दासाचा समजा ठाव।अ.५
जनिं निरंजन रंगला जलिं स्थलिं हो पाहुं लागला । पाहतां पाहतां गणेश जाहला । पाहातां बल्लाल । करि नमस्कार । अ० ॥ ६ ॥

## पद.

उभा ब्रह्मयापाशी त्याचि दुर्घट विघ्ने नाशी हो ॥ उत्पत्ति कार्यासि दिधला वरारंभ सृष्टी हो । वरिलें कंन्य कासि सौख्य झालें त्या विधिसी-हो ॥ भावें भजता त्या सकळ कल्मष नासीं हो॥ १ ॥ गणेश रंगी उभा त्याचि फाकलीसी प्रभा हो ॥ लावण्याचा गाभा त्याचे पायीं सर्वेही शोभा हो ॥ धृ.॥ उभा कुंडि राहे कपिल मुनि मूर्ति पाहे हो ॥ केसरि वहन आहे त्याचि शोभा वर्णू काय हो । उपमाचि नसाहे
तैसा स्वप्ना माशीं जायहो ॥ दैत्या करीं धाय संतसज्जन उपाय हो ॥ २ ॥ उभा रानि होता जेथें सिंदूरासुर हो ॥ सिंदूरें ओढितां मुक्त केली शिव कांताहो ॥ मर्दोनि सिंदुरासुरा झाला शिव सुतहो भक्ति भावें ध्यातां झाला तो गजमुख हो ॥ ४ ॥ उभा विघ्नासुरा दर्प हारातो।चिपु-राहो ॥ क्रौंचाही किंकरा वाहन केले शुक्र उंदिरा हो ॥ ऋषि भार्या सुंदरा गणेश आला तीच्या वरा हो ॥ त्याचि कीर्ति फार लंबोधरा तुह्मि स्मरा हो ॥ गणेश॥४॥उभा ब्रह्माद्रिवरी विद्या केल्या स्वप्रकाश हो॥ श्रुति स्मृति संताप तैशी पुराणें घोषहो ॥ उपदेशिले ब्राह्मणाशि गणाधी-शहो ॥ यत्न करोनि गणेश मयुरपांखरावरि बैसे हो ॥ ५ ॥ उभा ना-रायण वेष धरूनि आपण हो । वर दिधला सुमंदेसि मग झाले पुत्र हो ॥ विश्व दावियेले आपले पसरूनि मुख कमळ हो ॥ धूमकेतु अभिधान ध्या-सुमंदेचा नंदन हो॥६॥ उभा पंचानन झाला शिवा प्रसंन्न हो॥ बीजदिधले संपूर्ण शंकर केला सुख संपन्नहो । गणेश नामी निरंजनाचा आहे नीज ध्यासहो ॥ याळागि त्याह्मणा तुह्मि गजानन हो ॥ ७ ॥

## पिशाच्यपद.

सुखे नांदत होते मि संसारी हो तव अवचित झालिये परीवो ॥ध्रु०॥ मजहो संचार झाळये शरीरी हो मज नेवुनि घाला मोरेश्वरी हो ॥ १ ॥ सुंदरहो दैवत लागले मोरगांवीचे तेथे उतारु न शके कोणीसाचे बाई येहो दैवत लागले मोरगांवीचे ॥ २ ॥ सकळिक ह्मणती झालि झडपणीहो बोलवा पंचाक्षरि करा झाडणीहो ॥ ३ ॥ मंत्र रक्षा येथें न चले कांहींहो देहभाग गुंतला मोरया पाईहो माझे तनू मन गुंतले मोरया पाई हो नेणति बापुडि कारेति जाचणीहो ॥ ४ ॥ दास तुझा मोरया गोसावीहो याहो मोरया वेगळे नेणे काहीहो ॥ ५ ॥

## पद.

थेउरगांव तेथें देव चिंतामणि नांदे इच्छादानी हो मोरेश्वर ॥ अकळु अवतार देवलंबोदर प्रत्यक्ष मोरेश्वरहो नांदतसे ॥ २ ॥ महाउग्र स्थळ राहीले गजानन दीनभक्त जनहो तारावया ॥ ३ ॥ पाहुन शुद्ध स्थळ अवतार निर्मळ भुक्तिमुक्ति तत्काळ हो होति तेथे ॥ ४ ॥ मोरयागोसाविकरी निजध्यास प्रत्यक्ष विघ्नेश हो हृदयि त्याचे ॥ ५ ॥

## पद.

मोरयाहो मोरयाहो मोरयाहो मोरया मोरयाहो मोरयाहो मोरयाहो माझ्या मोरयाहो मोरयाहो मोरया ॥ ध्रु० ॥ दैवे केला डोळा पुण्य केले पाई माझ्या मोरयासि बाहीहो आलिंगीन ॥ १ ॥ दैवाचिया नरा बुद्धि केलि लल्लाटी मोरयासि दृष्टि हो देखियले ह्मणूनि मोर० ॥ २ ॥ शेंदूरें चर्चिलाहो जयांचाहो माथा तया गणनाथाहो नमन माझे ॥ ३ ॥ भागलो कष्टलो आलो मोरेश्वरा त्याचे घरी डेराहो अमृताचा ॥ ४ ॥ भादवेचवथीसि जे द्वारे करीति ते फळ पाविति अभिलाषीचे ॥ ५ ॥ मायबापाहुनि मोरया आगळा नकरि वेगळाहो जिवाहूनि ॥ ६ ॥ मायबापाहुनि मोरयावरीहो लोणमी घडीहो उतरीन ॥ ७ ॥ कऱ्हेच्या पाठारि नांदे ईच्छादानी नाम चिंतामणीहो मोरेश्वर ॥ ८ ॥ मोरेश्वर देव कमंडलुगंगा पापे जाति भंगा हो देखलीया ॥ ९ ॥ कनकाचा परि वेळू उजळू दीपका ओंवाळुं

नायका हो मोरेश्वरा ॥ १० ॥ शंख भेरि तूरे वाजविति कल्होळा होतसे सोहळाहो मोरयाचा ॥ ११ ॥ मल्हार भक्त रामहो हाति पंचारति घेवुनि ओवाळितहो मोरेश्वरा॥१२ ॥

## पद

गणराज दयाळा दाखवी चरण माझे भुकेले लोचनहो पहावया ॥ १॥ धेनू जाय वना वाट पाहे वत्स सदना ॥ तैसि गत माझ्या मनाहो झालि असे ॥ २ ॥ आजुनि का नयेसीं बा सखया गणराजा कवण्या भक्ताच्या या काजा हो गुंतलासी ॥ ३ ॥ दूर करीसी मजशी आठवावे कवणासी मिठि मारिली चरणासीहो दृढ भावे ॥ ४ ॥ विनवावे तुज कितिबा सखया मंगळमूर्ती दीन तुझा मि काकुलती येत आहे ॥ ५ ॥ काय म्या करावे बा कोठे मी राहावे गणाधीशा तू तारावे मजलागि ॥ ६ ॥ माझा चिंतामणि गुरु सकळा । कल्पतरू त्याणे माझा अंगिकारु केला देवा ॥ ७ ॥ माझि चिंतामणि मावुलि सुखाचि निजभक्ताची वाट पाहे ॥ ८ ॥ चिंतामणी गुरुनि तुजलागि दीधले नामहि ठेविले कलाधरू ॥ कला धरा देवा माझ्या मोरेश्वरा माझा अंगिकार करा मोरेश्वरा ॥ ९ ॥ विनवि भक्तराम चिंतामणिदास मल्हारिहो त्यास ह्मणति जन ॥ १० ॥

## बाळसंतोष

माझ्या कलाधरा मोरेश्वरा ॥ दान द्यावेहो दान द्यावें हो सत्वर ॥ बाबा.॥ करुणाकरा मज तारा ॥ बाबा. ॥ दान मागतो मी तूज चरणापाशि ठेवि मज ॥ बाबा. १ ॥ अन्य नाहि माझे काज ॥ बा. २ ॥ माझा चिंतामणि मोरया सद्गुरू मोरेश्वर तनया ॥बा. ३ ॥ धावे हेतु पुरवावया ॥ बा. ३ ॥ माझी तुज येउदे करुणा ॥ चिंतामणी गजानना ॥ बा. माझा भाव तुझे चरणा ॥ बा. ४ ॥ धांवे सद्गुरु चिंतामणे ॥ अन्य देव मी न जाणे ॥ बा. ॥ किती तूज विनवीणे ॥ बा. ५ ॥ तूच माझे कुलदैवत ॥ सद्गुरु चिंतामणी नाथ ॥ बा. ॥ भक्त राम तूज प्रार्थित ॥ बा. ॥ ६ ॥

## पद

गजानन माझा शिवरूप जाहला ॥ दृष्टि म्या पाहिलाहो आजि

डोळा ॥ १ ॥ सिद्धिबुद्धि दोन्हि गंगा गौरि जाण। दशभूज तोहि हो देखिलाहो ॥ २ ॥ आयुधेसहित दशहस्ति जाणा नंदी हा मूषक हो शोभे त्याला ॥ ३ ॥ ऐसा गणराज विधी हा पाहिला ॥ तात्काळ जाहला विष्णु तोचि ॥४॥ चतुर्भुज तोहि सिद्धि यासहीत अंकुशफरशहो चक्रगदा ॥५॥ गरुडवाहन मयूर येथे शोभे ॥ लक्ष्मिनारायणहो ह्मणति त्याला ॥ ६ ॥ तैसेच हे नांम सिद्धिविनायक ऐसे त्रिगुणात्मक हो नाम त्याचे ॥ शिव विष्णु तेही रूपेही धरूनि साजतीहि तीनिहो गणराजा ॥ ८ ॥ मोरया गोसावि ह्यानि दया मजवर केली॥ तेणे स्मृति ज्ञालिहो बोलावया॥९॥ अज्ञान बोबडे चिंतामणि वर्णि ॥ मोरयासि रंजवि हो वेळोवेळा ॥१०॥

## शेंजेचेपद.

परापरती भव्य खोलि । सुगंधेंति उदयेलि । मंचक सामर्थ्ये भारि। सुमनें आढळ ॥१॥पहुडले गणाधीश । आज्ञा ज्ञाली सकळांस मांडिलाहो भोगविलास । सुख बहु होतसे॥२॥सिद्धि बुद्धि दोन्ही नारि। सेवाकरिति परोपरी ॥ एक पुष्पहार करि।घेऊनि कंठि घालिती॥३॥दुसरि कुसरि देत विडि ।राजसावर डोळेमोडी लिंबलोणेदृष्ट काढी।उपचार होतसे॥४॥गजाननें धरिलें पाणी । अंगि दोन्ही प्रीति राणि ॥ दोहिकडे दोघिजणी समाधान होतसे ॥ ५ ॥ सामवेद मंजुळ गाय । नादात ब्रह्मा लीन होय । सुख तें सांगतां नये निरंजन कोंदछे ॥ ६ ॥

## गजाननाची करुणाष्टकाचे श्लोक प्रारंभ.

तुझे भक्त देवा असंख्यांत कोटी ॥ सदा सर्वदा ध्यास भावार्थ पोटि ॥ कर्में सार्थके काळ जो साधियेला ॥ गणेशा वृथा भार ज्ञाले धरेला ॥१॥ किति मंत्र यंत्रावळा शोधिताति ॥ किती धारणा ध्यान मुद्रा धरिति ॥ रिकामा नसे बा क्षणयोगियाला ॥ ग० २ ॥ किती एक वेदांत ऐकोनि न्हाति ॥ किती भक्त तीर्थाटणालागि जाती ॥ तयाचे मनीं भक्ति वैराग्य मेळा ॥ गणे० ३ ॥ किती धूम्रपानादि पंचाग्नि घेति ॥ किती याचकालागि सर्वस्व देती ॥ कितीकासि नानापरी स्वार्थ ज्ञाला ॥ ग० ४ ॥ किति नग्नदीगांबरादि उपासी ॥ विवीधापरी साधिताती तपासि ॥ प्रपं-

चासि हाणोनि लत्ता प्रहारा ग०॥ ५ ॥ जनि एक संगेंचि शास्त्रप्रबोधें वरा राग उच्चार गाताती छंदे। उदासी नसे सत्कथा तो ये कथेला ॥ग०॥६॥ चतुर्थाश्रमादिक्रमे आश्रमासि ॥ धरूनि वरी आवडी अर्चनासि ॥ विवेकें जनी आपुलासा देव केला ॥ ग० ७ ॥ जनीं एक आचार संपादिताति ॥ बहुसार विचार विवंचिताति ॥ सदा सर्वदा ध्याति बुद्धीपतीला ॥ ग०८॥ बहूता जनीं वेद अभ्यास केला ॥ कळेशास्त्र शास्त्रार्थ विद्वजनाला ॥ धरिश्रोतहो स्मार्थ हो मावयाला ॥ ग० ॥ ९ ॥ बहूता जनाचि प्रयत्नाचि केले ॥ भजोनि तुला कीर्ति ठेवोनि नेले ॥ नका देव निरंजन भक्तपाला ॥ गणे० ॥ १० ॥

## श्लोक.

गणपती तुझें नाम चांगलें शरण मी असें दावि पाउलें ॥ त्वरित येइ तूं विघ्ननाशका दाविदाविरे पद विनायका ॥ १ ॥ नाहि मज दुजा सोडता जनीं ॥ सात्र धीपतींतूंज वांचुनि ॥ त्रिभुवनेश तूं सुजनरक्षका ॥ दा० ॥ २ ॥ पाशअंकुशा धरुनिया करीं ॥ राहसि सदा दास मंदिरी ॥ वर्णिति तुझ्या निगम कौतुका ॥ दा० ॥३॥ जो धरी तुझे चरण मानसीं ॥ जवळि त्याचि वा तूं अहर्निशी ॥ धरिसि आपुले हातिं मोदका ॥दा०४॥ कां तुला दया अजूनि वां नये ॥ वत्स मी तुझें ह्मणुनि त्वरित ये ॥ दिन घटीपळें जातिरे फुका ॥ दा० ५ ॥ शोकसागरीं घालसी मला यांत कायरे प्राप्ति हो तुला ॥ सांग सांग तूं विघ्नअंतका ॥ दा० ६ ॥ मूर्ख मी मती मंद जाणपा । तूं करी प्रभो मजवरी कृपा ॥ दान येवढें देई याचका ॥ दा० ७ ॥ तवकथा मुखीं सर्वदा वसो ध्यान मानसीं तव विभो ठसो ॥ हरसि तूं महा श्रेष्ट पातका ॥ दा० ८ ॥ तूं उदारवा ऐकुनि जनीं॥ धरिलि आसरे मी तुझी मनीं पुरवि वासना भक्त तारका दा.॥ ॥ ९ ॥ सतत नाम हें मनिवसो तुझें ॥ मागणे नसे मोरया दुजे ॥ भाकितों तुला बुद्धि चालका ॥ दा० १० ॥ वडिल बंधु त्या षण्मुखा प्रति ठकउनि पयापीसि धीपति ॥ आलपही नुरो देसि कार्तिका ॥ दा ० ११ ॥ धरिति मानसीं जे तुझे पदा ॥ हरति त्याचि हो सर्व आपदा ॥ मुक्तिचा

त्किंही देशि भाविका दा० ॥ १२ ॥ तुज शुभा शुभीं सुज्ञ पूजिति ॥ स्वत्पदिं प्रभो लक्ष ठेविती ॥ मायबाप तूं त्रिभुवनात्मका दा० ॥ १३ ॥ अंगि लाविशी दिव्य शेंदुरा । भालि लेखसी पीत केशरा ॥ कस्तुरी मध्यें रेखिला टिका दा० ॥ १४ ॥ भरवसा तुझा धरियला मनीं ॥ तारि मोरया भव भयातुनीं ॥ वत्सभी तुझे विश्व व्यापका दा. ॥ ९ ॥ भक्तसंकटीं घालसि उडी ॥ भक्तिची तुला बहुत आवडी ॥ करिदया विभो प्रीति वर्धका ॥ दावी० ॥ १६ ॥ माय आपुल्या रक्षि लेंकरा ॥ अधिक त्याहुनि तूं परात्परा ॥ दास तारसी आस पूरका दा० ॥ १७ ॥ कठिण काळि या जननि टाकिती निजसुता अशा दाखऊं किती ॥ तूंन टाकिसी स्वपद पूजका दा० ॥ १८ ॥ पतित ह्मणुनि मी भो करी दया ॥ शोक सागरीं याकृपालया ॥ रक्षि माय तूं स्वात्म पालका दा० ॥ १९ ॥ गणपते तुझ्या पदरजा पुढें विघ्नतें करी काय बापुडे ॥ मति बहूत तूं देसि साधका ॥ दा० २० ॥ मस्तकीं तुझ्या मुगुट साजिरा॥ रत्नखचित त्या साजिरे तुरा ॥ कंठि शोभती रत्नमालिका ॥ दा० २१ ॥ योगि मोरया दास हा तुझा ॥ हाक मारितो पाहि एकदा येइ धावण्या बुद्धि पालका ॥ दा० २२ ॥

## पद.

सिद्धिरमणा त्वां यावें जय जय जगदीशा पावे । बुद्धिरमणा त्वा यावे ॥ धृ ॥ भवसिंधुच्या बंदि पडलों कवणें मुक्त करावे ॥ घेवोनिया पाशांकुश मयुरा रूढ होउनि यावें ॥ २ ॥ विषयादिक असुराहिं छळलें यास्तव प्रभो प्रगटावें ॥ मर्दुनिया षड्वैरि आह्मातें निजपादिंवा स्था पावें ॥ ३ ॥ नित्यनिरंजन निर्गुण तूंरे सुंदर रूप धरावें ॥ जगदोत्धारण दासारक्षण ब्रीद हे साच करावें ॥ ४ ॥

## पद.

पायापैं ठेवा मोरोबा पाया पैं ठेवा ॥ श्रीगणपति महाराज मजला पाया पैंठेवा ॥ छत्रपती महाराज मजला पायापै ठेवा ॥ धृ ॥ कामा धामालागि पाटवा शेत मळे करावा ॥ मोरोबा शेतमळे करवा ॥ देणें घेणें येणें जाणें

हुजूरचा ठेवा ॥ १ ॥ अन्न अच्छादन प्रालब्धाधिन सरंजाम द्यावा हो मोरोबा सरंजाम द्यावा ॥ चतुर्विधा षड्रस पक्कान्नें पंक्ति लाभ व्हावा ॥ मज० ॥ २ ॥ षडगुण ऐश्वर्य ईश्वरदेवा काय करूं सेवा मोरोबा ॥का०॥ चतुर्विधा पुरुषार्थि अनन्य भांव असो द्यावा ॥ म० ३ ॥ आशा पूरक सिद्धि विनायक मयुरेश्वर बापा हो मयु० ॥ गांवो गांवा तरि या गांवि सुभेदार ह्मणवा ॥ मजला पायापैं ठेवा हो मोरोबा० ॥ ४ ॥

## पद.

मोरया माझ्या सखयारे ॥ धृ ॥ तुजवांचुनि कांहींच नेणें जप तप आनुष्ठान क्रियारे ॥ १ ॥ श्री गणनाथा मंगल मूर्ति करी दिनावरि दयारे ॥ म० २॥ गोसावि नंदन ह्मणे मज कैसि उताविळ तुज पहावयारे मोरया ॥ ३ ॥ कां पाय स्मरानाहो पायस्मराना ॥ धृ० ॥ वेदपुराणें शास्त्रें स्तविति प्रणवरूपि भगवान ॥ का० ॥ निर्गुण नित्य निरामय प्रभु जो भक्ता गोचर जाण ॥ २ ॥ गणेश देवा तें संरक्षुनि निवारिति विघ्ने नाना ॥ ३ ॥

## पद.

पायघड्या ॥ मोरया पाय घडिया तळवटि । वरिं पदें गोमटिं । ठेवुनीया जग जेठी । जाताति मंदिरा । चालिले हो मोरया सिद्धिच्या हो मंदिरा । चालले हो मोरया बुद्धिच्या हो मंदिरा ॥ धृ ॥ नारद आणि तुंबर दाविति अपार संगीत सूस्वरा ॥ चा० ॥ १ ॥ हृदय मंदिरी कैसा घातलासे मंचक । तया वरि सुमन शेज साजिरा ॥ २ ॥ श्री देवचिंता मणि तद्रुप सांन्निध देखुनी ॥ आनंद वाटे मनि नारायण कुमरा ॥ ३ ॥

## विडा.

विडा घ्या हो गजानना विश्वजगत्रजीवना । विनविती सिद्धि बुद्धिलक्ष लवोनिया चरणा ॥ धृ० ॥ शांतिही नागवेलि भूतदयाही सुपारी वैराग्य

चूर्ण जाण ॥ बोध कर्पूर त्यावरि ॥ वि० ॥ विवेक हें जायफळ । वेलालवंगा सद्भक्ति विरक्ती जायपत्री ॥ खदीर तो आत्म स्थिती ॥ वि० ॥ ॥ १ ॥ ऐकोनीया कर्णोत्तरें स्विकारलें हो दयाळें दीधला कृपावंतें काशिराजासि तांबुल ॥ ३ ॥

## पद.

तें ध्यान मज देईं गणेशा ॥ ध्रु ॥ हार्ति परशुवरदाभय लाडु मोदक प्रिया ॥ १ ॥ सिंदूरर्चर्चित शुंडविराजितते ॥ २ ॥ गोसावि नंदन । घाली लोटांगणते ॥ ३ ॥

## पद.

अदिति पार्वति गणेश नंदन ह्मणती अपुलाअपुला हो ॥ध्रु०॥ दशभुज देखुनि अदिति सिंव्हारूढ मंगल मूर्ती॥त्यासिआलिंगन दे ह्मणतां येरू ह्मणे हो सर्पहाति ॥ १ ॥निरखी माझा षडभुजा हा कैसा ह्मणसि सुत माझा॥ निवट लंपट निर्लज्जा तुह्मि नित्या नित्यासि समजा ॥ २ ॥ यावरि बोले ऋषिचीभार्या नेणासि विनायक चर्या । वळखुन याचे गुणगा आर्ये अभिलाषु नकोगे गोजिर्या ॥ ३ ॥ त्यावरि बोले शैल्यजा मयुरावरल्यागणराज्या ॥ वळखूनीया निजआत्मजा वद तुझा किंवा हा माझा ॥ ४ ॥ मुनिची युवती त्यावरि बोले ऐके ऐके गुजगवरी ॥ गणेश दासाचा कैवारी सुरांतकाचा हा वैरी ॥ ५ ॥ चिंतामणि ह्मणे उभयसती त्या भांडुनि भांडुनिया दमल्या ॥ पूर्ण ब्रह्म हें जाणुनि आपुल्या शांत होऊनि घरि आल्या ॥ ६ ॥

## पद.

भजगणराजाशी तराया ॥ भवसिंधु हा उतराया ॥ ध्रु० ॥ राक्षसि दुर्जन खलविरजा मर्दुनि करि जो विर जाया ॥ २ ॥ चित्रोद्धारण पदस्पर्शानें नेतो सत्पथि हर्षानें ॥ भ० ॥ ३ ॥ नित्य निरंजन निज दासाचा पालक त्रीजगि श्रुतिसाचा ॥ ४ ॥

## पद.

चिंतामणि स्मरणिं स्मरणराहू दे ॥ ध्रु० ॥ देवाधि देवा तुझिया गुणा-

चिकथा पावन । तेथें राहो माझ्या मनाचें आसन हो ॥ १ ॥ तुझिया सद्रूप चिद्रूप मूर्ति तेथें राहो । माझ्या मनाचि सद्वृती हो ॥ २ ॥ काया-वाचा मानस भजवा ह्मणतो दास प्रभुतो गणेश ॥ चि० ॥ ३ ॥ देव सुंदर गणेंद्र भालचंद्र हो । संकट हारक परम शरणेंद्रहो ॥ ३ ॥ दुर्वांकुर शिरिं सिंदुर लेंपन बहु प्रियकर आहे उंदिर वाहन हो ॥ ४ ॥ सुरनर पदरज वंदिति ज्याचे हो ॥ तो गुण मंदिर स्मरामनोहार हो ॥ ५ ॥ चरणिं स्मरण विष दमन करुनी हो ॥ सज्जन रंजन निरंजन साह्य कारीहो ॥ ६ ॥

## पद

शतमख रिपु हरितयाचा ॥ नंदन चालिला भोजने ॥ २ ॥ षडभुज मंगलमुर्ति निरखुनि रतिपति अंतरिलाजे ॥ नंद० ॥ ३ ॥ गणेश देव मंगल मूर्ति पाहुनि हर्षित होवोनि साजे ॥ ४ ॥ हा हा पहारे मंगल धाम । सुकावले कोटि काम परात्पर परब्रह्म विग्रहि हो ॥ धृ ॥ ज्याचे काळ भयघोर ॥ महाबली तो असूर ॥ मर्दुनीया सिंधुरदेव बंदी सोडविले ॥ हा० १ ॥ ऊतरिला धराभार केला दैत्याचा संहार आनंदले चराचर यशवर्णितातो ॥ हा० २ ॥ ब्रह्मादिक पुरंदर लोकपाळ अगोचर पादाब्जिठेउनिशिर वंदिति भावेहो ॥ हा० ३ ॥ निराकार निरंजन दासालागि जो सगुण ॥ साहिचारि वंदिजन गाति गुण तयाचें ॥ ४ ॥

## पद.

तूंचि तुजा असासि सदोदित ॥ धृ० ॥ स्थावर जंगम तूंचि सर्वही होवोनिया वससी सदोदित ॥ १ ॥ आंडज जारज होवोनिया तूं उंच-पदीं वससी सदोदित ॥ २ ॥ प्रभु निरंजन एकचि आपण द्वैतपणें नमसी सदोदित तूंचि तुजा० ॥ ३ ॥

## पद.

मांगु मि कायरे दिन बंधु मायारे नात्ररे सांगुमि० ॥ध्रु०॥ पाहाशंखशर्मा पाशी अगणित नामें तरला ॥ नामा केवर्तक भवनाशि स्मरणेचि उद्ध-

रिलारे ॥ १ ॥ सर्वांमध्यें नीचसामा वाचे घेता नामा ॥ पुत्रासहीत मुक्त- चिकेला ऐसा ज्याचा महिमारे ॥ सां० ॥२॥ नित्यनिरंजन चिन्मयचिद्घन दासाचा कैवारीहो सिंहनसूकर नरना कुंजर लिला विग्रह धारीरें ॥ ३ ॥

## पद.

धुंडि गजानन कारे ह्मणाना ॥धृ० ॥ व्यासपराशर नारदमुद्गल चिंतिति नित्यजयासि पुराणारे॥१॥नामासामा नामेतरले भवपुरिहाचि उपायजाणारे ॥ धूंडि० ॥ २ ॥ नित्यनिरंजन चिन्मयचिद्घन दिनदयाल करिल करुणारे ॥ धू० ॥ ३

## पद.

धुंडि मोरया मंगलधामा परिपूर्ण कामा । कामवरदा मेघश्शामाविश्राम धामा ॥ धुंडि०॥ सिंधु जामात पद्मी अनुजाधर श्रीगणराजा । वारिभवभय श्रीवधु पूजा अग्र पूज्या ॥ धुं० ॥१॥ नलिनी रमणा रघुवर वरदासदानं- दा ॥ नंदानंदाराध्यसुखदा निर्गुणनिर्द्वंद्वा ॥ धृ०॥ २ ॥ धरणाभरणापवित्र नेत्रागोत्रजपुत्रा ॥ पुत्रात्मजपुत्रा मित्रावृत्रारिमित्रा ॥ धृ ॥ ३ ॥ सुत्रामा- वरदा सकलसुरेशा लावण्य कोशा ॥ नामें तारिशि निरंजन दासा जयजय जगदीशा ॥ ४ ॥

## पद.

जयजय गुरुगंगे गुरुगंगे ॥ चिन्मयंभगतरंगे ॥ ज० ॥ १ ॥ ज्योतिर्मयतवलहरि ॥ जाकुनिमागिल पातक हारि ॥ जय ॥ ॥ २ ॥ कर्मज्ञान विराशी जासी जनानिजसुखवासि ॥ जयजय गुरुगंगे ॥ ३ ॥ भगवज्जनतवथारा ॥ टाकुनिपावासिपूर्णअधारा ॥जय०॥ नित्यनिरंजननिर्गुण दासा गजमुखरूपेकरी विपाशा ॥ जय० ॥ ४ ॥

## पद.

सद्गुरुचे बापाबोल सप्तपाताळाहुनखोल अबोलते बोलबोलवेना ॥ १ ॥ बापासद्गुरुचिसेवा शेवादुर्लभहीदेवा ॥ भक्तिचा हा लाभद्यावा निरंतर॥२॥ सद्गुरुचेमहीमान नकळेशास्त्र आणि पूराणा॥वेदश्रुतीचे वचन नेति नेति॥३

अनन्य शरण सद्गुरुसिनिरंजन ॥ चरणिलावुनीयामन सदाध्यातगुरुपाय॥३

## पद.

गणाधीशा तुजविण जळो माझे जीणे । फिरतांहि जीवणे भुमंडळि शुन्य ॥ ग० ॥ ध० ॥ तुजविण दुजे पाहता वाटतासेलज्जा । माझिदृष्टि स्वरुपावरि बैसवावितूझ्या ॥ १ ॥ तवचरणावीण शिर नको ठेऊं माझे ॥ सर्वप्रकारें स्वामि अंकित आहे तूझे ॥ २ ॥ निरंजना प्रभुस्वामि तुजवीण काया । पतिविणा जेवि नारि जन्म तिचा वाया ॥ ३ ॥

## पद.

हेरंबादयाळा माझी विनंतिपरिसा ॥ स्मरणाचियापाशेंअवरि चंचलहें मानसहेरंबा । १ ॥ गोनामइंद्रियेमजला नावळति देवा ॥ गणेशा गोपाळा देईभक्तिरस सेवा ॥ हे ० ॥२॥ गणेशा गोरक्षकापाशहातीत्वा- धरिला ॥ गाईसांभाळिना तरिपाशदे वहीला ॥३॥भक्तासाठि पाश धरिला हस्ताचियेठायीं ॥ धांवता धांवता शिणलो अवरि अपुल्यागायी ॥ ४ ॥ जनीनीरंजन रक्षक व्यापक सकळाचा ॥ गुणवर्णाया न पुरति चत्वारि वाचा ॥४॥

## पद.

आदिपुरुष महागणपति आलातयाशिपाहुंपाहुंचला ॥आ०॥ षड्भुजसायुध ऋषिकुमरासह मयुरावरता आरूढला ॥आ० १ ॥ कमला सुरवळिमर्दुनिया शिरिं कमंडलु तटि विसावला ॥निजभक्तीचि आवडि जाणुनि मयुरपुरासि कौलदिला ॥आ० २॥ जनिनिरंजनि जनततिभावे धुंडितयाब्रह्मणतीभला ॥ आ० ३ ॥

## पद.

तांडवनृत्यकरी गजानन ॥ धृ० ॥ शेंदुर चर्चित शुंडाविराजितविघ्ने सर्व हरी ॥ १ ॥ पायीं घागरिया घुळघुळ वाजति नवरस रंग भरी ॥ २ ॥ गोसाविनंदन तन्मय होउंनि वंदित पाय शिरी ॥३॥ तेहेतिसकोटि सभागन

दारि मध्यें शिवगवरि ॥ ग०॥ धिमिकीट धिमिकीट मृदंग वाजे ब्रह्मातालधरि ॥ २ ॥ पाहेनिरंजन गणपति मूर्ति शोभित चंद्रशिरीं ॥ ३ ॥

## पद.

कोणा शरण जावें मोरोबा कोणाचे ह्मणवावें ॥ ध० ॥ शक्ति सौरगणपत्य विष्णु शिव पंचायतन स्वभावें ॥ कालदेश इतिहास पाहतां देहिविदेहिभावें ॥ मोर० ॥ १ इष्टमित्रसहबंधु गोतगणमायबाप निजभावे । इहपरलोकिं सुखातसखया अंतिकोणिन ठावे ॥ मो० ॥ २ सिद्धिबुद्धिपति मोदक हाति पाशांकुश दशआयुधाया ॥ द्वारि कल्पद्रुमधेनु मुनिचिंतामणि ते त्यजोनिया ॥ ३ ॥ आशापूरक सिध्दि विनायक मोरेश्वर निजनांवें ॥ जनीनिरंजनि सत्तामात्रेंकेशवसुत ह्मणवावें ॥ ४ ॥

## पद.

यामयुरावरि धुंडि विराजे ॥ मूर्ति विराजे भूषणसाजे ॥ धृ० ॥ कोटि रविशशितेज झळाळित पाहुनि रतिपति अंतरिलाजे ॥ १ ॥ सिद्धिबुद्धिपति षडभुज सायुध कटितटि फणिवर सुंदर साजे ॥ २ ॥ निरंजनात्मज सुतसंरक्षण वेदपुराणि महिमा गाजे ॥ ३ ॥

## पद.

मजवरि करी तूं दयारे बापामोरया ॥ धृ० ॥ अंकुशधारी विघ्ननिवारी भक्ताचा साहकारीरे ॥ १ ॥ येथें गंगा येथेंचि काशि प्रयाग माझि गयारे ॥ २ ॥ निरंजन दासालागि करिपूर्ण कृपेची छायारे.

## पद.

भज मन निजहृदयीं सगुण गणेशासी भावे ॥ धृ० ॥ वर्णाश्रम विहित कर्म करणे हाचि मुख्य धर्म भूत मात्र ब्रह्मवर्म ॥ तिला ठसावें ॥ १ ॥ श्रवण स्मरण संकीर्तन पादसेवनार्चनासिवंदन दास्यत्व आत्म निवेदन व्हावें ॥ २ ॥ अनुदिनि मनि हाचिछंद संतसज्जना अभंग होऊनिया क्रोधभंग नमन नित्य व्हावें ॥ ३ ॥ बल्लाल वरद मूर्ति पाहताचि त्रिविधआर्ति हरुनि जायी होयि कीर्ति गायि त्यासि भावे॥४ ॥

## पद.

श्री वक्रतुंडा तुझ्या किर्ति उदंडा ॥ आग्रपुजेचा डंकावाजे त्रिभुवनि नवखंडा ॥ धृ ॥ सरळ तुझि शुंडा करधृत इक्षूकोदंडा ॥ गंडा मृगजळ झुंडकरिती मुनि भृंगाचा झुंडा ॥ १ ॥ सिद्धि उदंडा सहिता बुद्धिचा मुंडा । स्वाधिन तुझ्या तनमन धन हें हा भगवा झेंडा ॥ २ ॥ दंडि-शिपाखंडा रक्षिशि भक्ता ऊदंडा ॥ अभिनव केशवपुंडा त्याचा मोरेश्वर गुंडा ॥ ३ ॥

## पद.

आधिवंदिन मंगलमूर्ति मोरयारे ॥ धृ० ॥ सकळ संकट नाशा करील तो पूर्ण आशा सिद्धि बुद्धि गणाधीशा स्वामीयारे १ वरदायका नंदन पाहता तल्लीन मन काय वर्णु तुझे गुण विघ्नरायारे ॥ २ ॥ गोसाविनंदन भावें विनविप्रसन्न व्हावें निजनामि प्रेमद्यावें गावयारे ॥ ३ ॥

## पद.

दूर्वा महात्म्यहो ऐका तारक भवसागर नौका ॥ धृ ॥ कौंडण्याचि पत्नि-गेलि दूर्वादल घेवुनिया ॥ त्याच्यातुल्यनिं छाया नमिळे सुरेश्वरा ते कन-का ॥ १ ॥वृषभमुखे तृण देवशिरावरीं गेले वायुवेगे ॥ झाला प्रसन्न गणेश त्या ते नेले स्वानंद लोका ॥ २ ॥ काला नल दैत्याते प्राशुनि झाला अति-शय दाहा दुर्वापत्रें अर्पण करिता झाला शीतल लोका ॥ दुर्वा० ॥२॥ दास ह्मणे किर्तिदंडप्रमाणें अर्पा देवा दूर्वा ॥ सफल मनोरथ होतिल तुमचे सत्य वचन हे ऐका ॥ ३ ॥

## पद.

हेरंबा सिद्धिरमणा गणराया लौकर येई ॥ लंबोदरा भालचंद्रा गजव-दना भेट देई ॥ १ ॥ बल्लाल कपिला ढुंढिस्वानंद भुवनानेंई भक्ताभि-मानि तूझी महिमा मी वर्णुकायी ॥ ब्रह्मादिक सुरवरध्याति मानव मग तेथे काई ॥ २ ॥ बल्लालात्मजभावे लागला तुझिये पायी ॥ ३ ॥ संकटि पडलों आतां रक्षावें मयुराचायी ॥ ४ ॥

## पद.

कोणसख्या केवारि मोरोबा धांव धांव झडकरी । तुजविण कोणमजला तारी संकटपडलें भारि ॥ धृ० ॥ स्वानंद पूरीं तुझि सेना भारि ॥ सत्वर देवा नोहेतयारि ॥ सिद्धिबुद्धि सहबसूनमयुरी मारिभरारि॥ १॥ लवकरमजला मोरया तारि ॥ सिंधुरासुरें नेतां गवरि। शंभुयुद्धिजयत्रिपुरारित्यासिसंकटिं तारि॥ मो. ॥२॥ विष्णुमधुकैटभ संहारि आशापूरक सिद्धिविनायक मोरया लौकर येईद्वारि अरोळ्या मारि ॥ तु० ॥ ३ ॥ भवसागर बहुतरंगलहरि। इच्छा शक्ति कुमार कुमरी। रोगभोग वेष्टितसारि ।भवरोगाच्या वैद्या औषध नामतुझे उच्चारि ॥ आतातु॥४॥भूस्वानंद सुखमय नगरि। पूर्णानंदे निश्चय भारि । खोटा फंदि नाहि अधिकारि । स्वारिनिरंजन करिवा रंजन केशव सुतव्यापारि । आतां तुजविण ॥ ४ ॥

## आर्या

ह्मणति रंजन श्रुति ज्या तत्सम समजा सुहा निरंजनहो॥ जो कीं ह्मणे परातें मानुनि निज हानि हा नि रंज न हो ॥ १ ॥

## पद.

कधिरे कधिरे कधिरे डोळांदाविशि मयुरपुरी ॥ ध० ॥ येइ सख्या मोरया तुजविण कोणमला उद्धरि करि दिनावरि दया उतावेळ तेज पाहावया तळमळ तळमळ करिहेमानस कधिदाविशि पायारे ॥ मो० ॥ १ ॥ ऋद्धि-सिद्धिचा पति लक्षलाभ हो सुतहे तुजला शोभति ॥ वेदतुला वर्णिति वर्णि-ति अठरासाहिचारि नित्यकाळ स्तविति ॥ मो० ॥ स्वानंदपुरिरहिवासि-नित्यनिरंजन चिन्मयचिद्धन दासा सगुणहोशी ब्रीदेकधिपाळिशि मोरया ब्रीदेकधिपाळिशि अनाथ बंधु करुणासिंधु दासा संरक्षिशी ॥ ये३ ॥

## अभंग.

शरणशरण गजानना । मजआंगिकारी दीना ॥ १ ॥ माझ्या अपराधाच्या कोटीं कृपासिंधु घाली पोटीं ॥ २ ॥ अहो पतीत पावना । दिनानाथा गजानना ॥ ३ ॥ आहे पतीत अंन्यायि ॥ कृपा करी मयुरात्रायी ॥ ४ ॥ गणेश दासाचे दातारा । आपुले पायीं देइथारा

॥५॥ निरंजन ह्मणे देवा। तुझा विसरन व्हावा। शिरिं घडोदे नमन नेत्रीं घडोदे अवलोकन ॥२॥ श्रवण कीर्तनी भरोदे। घ्राणि निर्माल्य आमुदे॥३॥ नामेंवाच्या आवरावी। करेंपूजा ते करावी ॥४॥चरणींप्रदक्षिणायात्रा। गात्रें होतील पवित्रा ॥ ५ ॥ मनध्यानीं आवरावें दास गणेशी करावें ॥ ६ ॥ हेंचि मागणेंजी आतां। मज देईसिद्धिकांता ॥ ७ ॥ मजदेई बुद्धिकांता मजदेयी एकदंता ॥ ८ ॥ आह्मि जाउ मोरेश्वरा पाहु सिद्धिबुद्धिवरा ॥९॥ मस्तकठेउं चरणावरी। उभाराहुमहाद्वारीं ॥ १० ॥ नामें गांउ गजानन आह्मि नाचुं आनंदानें ॥ ११ ॥ निरंजन ह्मणे देवा। तुझा विसरनव्हावा। ॥१२॥ बोलेचालें मंगळमूर्ति। गाई आपुली आपणकीर्ति। श्रोतावक्तागजानन। करी आपुले कीर्तन ॥२ ॥ जनीनिरंजनीं भाव। दास झाला आवघा देव ॥ ३॥ ह्मणा मोरया मोरया। मायबापाहो सखया ॥४॥ जनीनिरंजनी ऐसा। आठवीता पावेतैसा। जनीनिरंजनी भाव दास झाला आवघादेव॥५॥

## पद.

नागानन नागानन जयहेरंबविभो ॥ ध० ॥ दिव्यांबरधरधीशा। रवि शशिकोटि प्रकाशा ॥ ना० ॥ १ ॥ शुंडादंड विकाशा। कृतांत कानन नाशा ॥ २ ॥ सिंदूरारुण भूषा। प्रिय दूर्वां कुरतोषा॥ ३ ॥ श्रुतिस्मृति पारागम्या। दासानुग्रहरम्या ॥ ना० ॥४॥ विघ्नावलि विध्वंसा योगीमानसहंसा ॥ ना० ॥ ५ ॥ लीलानाटक केशा सुरवरवंद्य परेशा ॥ ६ ॥ हे मयुरेशकृपालय। दीनत्र्यवकपालय ॥ ना० ॥ ७ ॥

## अभंग

शुद्धशुद्ध ध्यानगणेशाचे एक धरीता भाविक कार्यसिद्धि ॥१ ॥ भक्तराजदेव भजावा आवडी करावी तातडी परमार्थाची ॥ २ ॥ अलगंधाक्षता पुष्पधूपदीप नैवेद्य आपूप सिद्धलाडू॥३॥फलतांबूलाचा साक्ष प्रदक्षणा भाविकांचि खुणा देव जाणे ॥ ४ ॥ दूर्वाशमी पत्रें फुलें मांदाराची. हेचिगणेशाचे मंलगुप्प ॥ ५ ॥ निरंजन दीप कथासमर्पण आवडे कीर्तन मोरोबाचें ॥६॥

## श्लोक.

उपास नेत्या धृंदचालवावें। भद्वेसंताशि सदालवावें ॥
सत्कर्म योगें वयघालवावें सर्वांमुखि मंगल बोलवावें ॥ १ ॥

## अभंग प्रार्थनेचा.

चिंतामणि जय सिद्धिपते चिंतामणि जयबुद्धिपते ॥ १ ॥ अतां स्वामी निद्रा करा मोरया करामोरया। आशापूरक सिद्धिविनायक ढुंढिराया ॥ धृ ॥ ब्रह्मानंदे क्षुद्रानंदे निद्रानिद्राहीमाया ॥ सिद्धिबुद्धि सहीत मोरया तन्मयकायां ॥२ ॥ अभंग निद्राकेली गणाधीशें पूर्णब्रह्म निराधीशें ॥ शब्दआकाशीं राहिला वायुनिश्चळ जाहला तेजें टाकिलें दह-कत्व।आपसोडोनिअधोगत्व धरणीचा अहंकार तोहिझाला निराकारहो ।। जन झालें निरंजन। देवेंलाविले लोचन॥ माझ्या मोरया मोरया। मायबापाहे सखया। सिद्धिअमुची माय। आमुचे सुखा उणे कायहो। बुधिआमुचीमाता आह्मा काय उणे आतां हों। मोरया आमचा बाप॥ आह्मा कैचा भवताप हो।लक्षअमुचाबंधु। आह्मा कैचाभवसिंधू हो। लाभ आमचा सखा।सर्व संपत आली हाता । बाप आमुचा सखा। काय अनंद सांगचिताहो ॥ ४ ॥

## निरंजनकृत करुणाष्टकाचे श्लोक प्रारंभ.

माता पिता तू धन धान्य ठेवा।सर्वस्व माझे गणराजदेवा। पादार विंदीं मनगुंतलेंरे॥ गजानना दाखविपाउलेंरे ॥१॥ अनंत जन्मांतरि दोष केले ॥ ते भोगणेंरे सहजचि आले॥ क्षमा करोनि अधमाशिक्षेनेरें ग०॥२ ॥ गोडी बहु लागलि वीषयाची। जशी अमीषा परिमाजिसाची ॥ जाणूनि कैसे मन भूललेरे ॥ ग०॥३॥ सुरासुरालागूनि तूचिदाता॥प्रभूसमर्था प्रभूदेव आतां॥प्रार्थि-तसे अर्भक तूजवारे ग० ॥ ४॥ तुझ्यावियोगें क्षणएक जातो ॥ युगांतसारे मजलागि होतो ॥ मनास तूं ते मुळ धाडिलेरे ॥ गजानना दा० ॥ ५ ॥ नेणेन मी भक्ति कशी करावी॥ वाटे परि कास तुझी धरावी॥यालागि तारी ब्रिद आपुलेरे ॥ गजानना दा० ॥ ६ ॥ क्षणक्षणा काळ दटावितोरे ॥ धाके तयाच्या जिव कांपतोरे ॥ ह्मणोनि आतां तुज लक्षितोरे ॥ गजानना दा० ॥ ७ ॥ चकोर चंद्रापरि लक्षिताहे ॥ तैशी तुझी आस करोनि राहे॥ दयाब्धिसानीगम बोलिलारे ॥ गजानना दा० ॥ ८ ॥ पदीं तुझ्या तोडर गर्जताहे ॥ शरणांगता लागुनि रक्षीताहे ॥ पतीत पूर्वि बहु तारिलेरे ॥ गजानना ग० ॥ ९ ॥ नामा पहाता अचला अवाचा ॥ तो श्रेष्ट झाला

ऋषि माझि साचा ॥ ते श्रीद कोठें प्रभु सांडिलेरे ॥ गजानना दा० १० ॥ शामा ह्मणे अंत्यज पुत्र कामे ॥ झाली तया मुक्ति गणेश नामे ॥ तयाहूनि मी काय आगळारे ॥ गजानना दा० ॥ ११ ॥ जो शंखशर्मा अगणीत पापी ॥ नामा स्मृतें पावन हो तथापी ॥ त्यालागूनी पुष्पक योजिलेरे ॥ गजानना दा० ॥ १२ ॥ तूं केसरी बालक मी तुझारे ॥ माया नवीं स्वाधिन टाकिलेरे । नको मला टाकु भवाटवींरे । गजानना दा० ॥ १३ ॥ पंचाननाच्या लघु बालकाला ॥ मारावयाला धेनु जें आव केला ॥ तैशापरीचि मज जाहलेरे ॥ गजानना दा० ॥ १४ ॥ अद्याप तूंते करुणा नयेरे ॥ कारुण्यसिंधु ह्मणती जगींरे॥ नपाहिजे ढुंढि उपेक्षिलेरे गजान०॥ १५ ॥ मायां समुद्री बुडतों गणेशा ॥ केली असे एक तुझीच आशा ॥ आणीक नेणे तुज वेगळेरे ॥ गजानना दा० ॥ १६ ॥ गणाधिशा आजुनि न पाहिशीरे ॥ निद्रा तुला लागलिहा कशीरे ॥ न पावसी जन तुज हासतीरे ॥ गजानना दा० ॥ १७ ॥ अन्याय माझे जरि पाहशीरे ॥ संख्येन येती तुज लेखितारे ॥ शरीर आतां तुज अर्पिलेरे ॥ गजनना दा० ॥ १८ ॥ माते अधीकार जरी नसेल ॥ तरि विभो सांग तसाचि बोल ॥ तेव्हांचि सर्वस्व मज पावलेरे ॥ गजानना दा० ॥ १९ ॥ उणें तुझ्याचें तुजला नसाहे ॥ ह्मणोन आणीक न बोलवेरे ॥ अक्ता जरी तूं जाहलासि सोह्य ॥ गजानना दा० ॥ २० ॥ निरंजनि दास तुझा ह्मणेरे ॥ कृपाळुवा सत्वर धाव घेरे ॥ नेणोनि कासे जरि लाविलेरे ॥ गजानना दाखवि पाऊलेरे ॥२१॥ इति निरंजनस्वामी कृत करुणाष्टकं समाप्तं ॥

## पद.

सच्चिद्घन मयुरेश्वर जयजय वक्रतुंडमाते ॥ अस्ति भाति प्रियरूप लक्षणे दिससी क्षणमात्रें ॥ ध्रु०॥ गकार ब्रह्मा अकार विष्णु मकार शिवमूर्ते ॥ बिंदु प्रभाकर संधि भगवती रूप शुद्ध कर्ते ॥ १ ॥ भक्तकामकल्पद्रुम हे हेरंब वरद मूर्ते ॥ नित्यानित्य विचारण तत्पर मानसचिच्छफूर्ते ॥ २ ॥ एवं विध गणराजमूर्ति जगिं एकाक्षरमंत्रे ॥ स्वयंज्योति हृदि देखियली ती गणपतिचा पुत्रे ॥ ३ ॥

## चिंतामणी सद्गुरूस प्रार्थना.

जोडला मोक्षदाता भुक्तिमुक्ति त्यासि मागो तारील हा जन्मोजन्मी । त्यांचे चरणीं लक्ष लागो । उद्धरीले अनंत कोटी । आह्मा तारी जगजेठी । माझ्या चिंतामणिचा धर्म जागो ॥ धृ. ॥ १ ॥ चिंचवडी रहीवास नांव मोरया देव पुरवितो मनकामना । ह्मणुनि चिंतामणि नाम । चिंता माझी हरी देवा चुकवी जन्म यातना ॥ मा. ॥ २ ॥ बुद्धिहीन पांगुळ मी आलों तूझिया ठाया नुपेक्षू तूं देवराया ॥ देई भक्ती सोहळा मन माझें गुंतलेंसे कोठें नवजाय देवराया ॥ मा. ॥ ३ ॥ मजवरी कृपा करी सेवा आपुली द्यावी । चिंतामणिगोसाव्यांनीं कृपा मजवर केली । कृपेस्तव जोडलासी । गेल्या पापाच्या राशी ॥ मा. ४ ॥ अणीक एक विनंति ऐक भक्ता करी तूं सनाथ । कृपा मजवरि बहुत केली । विनवि नारायण दीन । चरणापासुनि नकरी री । चरण धरिले दृढभारी ॥ मा. ॥ ५ ॥

## सद्गुरू रघुनाथ भटजी फाटक यांचें पद.

धन्य रघुनाथभट्ट साधुभले हो ॥ धृ० ॥ फाटक उपनाव असे ॥ गणपतिसी भक्तिरसें ॥ अर्चुनिया तारितसे ॥ मूढजनाहो ॥ १ ॥ कृष्णातिरि कुरवपुरी । येउनिया वासकरी । ध्यानधरुनि ताप हरी । वारिभयाहो ॥ २ ॥ रामासम नाम वदनिं । सुमुखाचें नित्यस्मरुनि । शांतपणे सदनिं मनिं । ध्यानकरी हो ॥ ३ ॥ सद्गुरु रघुनाथ पदीं । गणपति सुत नमित अधि ॥ लोळुनिया वदतकधीं ॥ भेटसी मला हो ॥ ४ ॥

## आरती शेवटची चिंतामणि महाराज यांची

चिंतामणि परिपूर्ण देवाधि देवा ॥ ब्रह्मांडि मायाहो रचिली त्वां सर्व॥ प्रपंच सूख दुःख हें तुझें वैभव ॥ अखील जननेणति हा गुह्य भाव ॥ १ ॥ जयदेव जयदेव जयमंगलमूर्ती ॥ पुराणपुरुषा तोडी मायाहि भ्रांती ॥ धृ० ॥ निगमागम वर्णीतां न कळेचि पारू ॥ भक्तजन कृपाळु हा मोरेश्वरु ॥ साधुपारिपालना धरिला अवतारू । निर्वी कल्पासेवा हा कल्पतरू ॥ २ ॥ अगणित सुर ऐसी पूराणें गाती ॥ परिसकळाचा

जनिता हा मंगलमूर्ति ॥ अगाध याचा महिमा नकळे कल्पांतीं ॥ थोर पुण्यप्राप्ति सेवाहि मूर्ति ॥ २ ॥ निजभावें करिती आनंदे आरति । युक्त क्षीरापति नानाफळें आणिती॥ अनेक भक्त आरती पूजन पाहति॥ नित्य-मुक्त कपट बुद्धि टकले बहुति ॥ ३ ॥ मोरयागोसाविसुत चिंतामणि थोर ॥ पहा भाग्य माझें हा मोरेश्वर ॥ निंदक कपट बुद्धि नेणति आपार ॥ गोसावि न ह्मणावा हा मोरेश्वर ॥ ४ ॥ विरक्त साधूशीला नेणति कूसरी । महानुभावामध्यें अगाध हो थोरी ॥ सर्वांभूति ज्याचि समानवैखरी ॥ पाहति हे पाऊलें धन्य ते संसारी ॥ ५ ॥ भक्तराम ह्मणें मोरेश्वरमूर्ति । नित्यानंद शरण कल्याणकीर्ति ॥ तोडिसि माया जाळ संसार भ्रांति ॥ अंत किति पाहसी मल्हारि प्रार्थी ॥ ज० ॥ ६ ॥

## सद्गुरु रघुनाथ गुरु यांची आर्ति. ( पदाचे चा. )

आरति गणनाथा ॥ सद्गुरु वेषें रघुनाथा सद्भक्ता तारिताता कृपाकरी दिननाथा ॥ अ० ॥ कुरवपूरी वास केला ॥ शिष्यगण मेळवीला ग-जानना आळवीले भक्तजन तारियले ॥ काय मीं वर्णुथोरी । महिमा आगाध भारी ॥ दर्शनें हरवि चिंता ॥ प्रचीत आलि मज आतां ॥ अ० ॥ १ ॥ लोपलें भक्तिभाव जाणोनीया भूमिटाव । करूनीया सद्गुरु-नाथें जन तारिले अगणीत ॥२॥ निर्लोभि निराभिमानी ॥ शुक्ल वृत्तीहि करोनि। आनंदे रहीवास । करिति कूरवपूरास ॥ सखा गमदास बोले ॥ कधिं दावीसि पाऊलें । जयदेवा गणनाथा ॥ सद्गु० ॥ ३ ॥

## मोरयागोसावि यांच्या चरित्राच्या आर्या.

ॐकार आस्यगजमुख पदकमलीं मोरयाख्य गोसावी ॥
गोसावी न ह्मणवा वाण्यांमृत कामधेनु गोसावी ॥ १ ॥
नगजासुत पदसेवी नगसत्वाचा मयूर ज्या नांव ॥
आला मुमुक्षुला भवसिंधुतराया तुजी हटानांव ॥ २ ॥
मोठें दारिद्र वरीवंधुत्वाचि ज्यां सुदामदेवाचें ॥
वातें मुमुखें दिधलें स्मरल न मंजसी सुदामदेवाचें ॥ ३ ॥
भणगपरि प्रेमभरें भव्य श्री इभ मुखाम भवनाशा ॥

भाणित भक्तिभरानें भग्नकरुनि भग शरीर भवनाशा ॥ ४ ॥
गत अग्नि तिथि होतां वेदाख्या गाणपत्य तिथि आली ॥
झाली प्रियति उदरा सुचिर क्षुधिता द्विजातिथी आली ॥ ५ ॥
वमनासम अन्नादिक तस्थाप्रिय एक तीर्थ कपिलाचे ॥
वर्णूकाय तुला मी सेवितस्तन पोतनाचि कपिलाचे ॥ ६ ॥
ते दिवशीं पुत्र कुटुंबिनिसह उपवास ज्याम नेमानें ॥
परिरुक्पीडित नंदन प्राणोत्क्रमणेच्छिती विनांनानें ॥ ७ ॥
गतपलद्विजवर पत्नी कुरवाळुनि अंकि घेत पुत्रास ॥
बोले तुला कपिल विभु देईल अन्ना नको करूं त्रास ॥ ८ ॥
जाना म्यहं प्रतिज्ञांयोग क्षेमंवहांमिस्वजनांचा ॥
ती काय मोघ होइल तन्नामें द्विजवदे सुखेंनाचा ॥ ९ ॥
नगधर नंदन द्रवुनि स्वीकारुनि योगि वेपतत्सदन ॥
पाहे भिक्षा याची अलख शब्दें करी गुरुनदन ॥ १० ॥
नारद नुत योग्याते पूजुनि भिक्षेस पोंत तो घाली ॥
दूर्वा तसेच शमिदल ते द्रव अणवी जसीनिदाघाली ॥ ११ ॥
यमनुत मुर्ती प्रभुचि न्याळधरुनि हृदि मनांत गहिवरली ॥
देउनि अन्ना बोलेयें मोरेश्वरि तुझी विपत्सरली ॥ १२ ॥
नकरी विचार भक्षी वेद तिथी फलतुला मुला देतों ॥
ऐसे बोलुनिशंवर शयिमग घाली दुजावरा देतों ॥ १३ ॥
मोघन होति असेवर मोठे देवोनि मोरपुरि सुमुख ॥
जातां अवलोकीं तन्माता अरुदित प्रफुल्ल पुत्रमुख ॥ १४ ॥
भगदेभमुखवरोदित अन्नादिसे नंदनाग्रि रसभरित ॥
सितभात लड्डू घेवर जिलब्या तिखटें तसेंच पयभरित ॥ १५ ॥
गणनाथ कृत्यभावुनि तन्माता निजसुता सिनवलाव ॥
बोलेपुनरपि वत्सापुत्रा मत्कर्णावृत्त नवलाव ॥ १६ ॥
वर्णन केलें त्याणे जेणें निजतात माततापसरे ॥
तापसरें तो धीवर ऐसी तुम्राभिवृत्तापसरे ॥ १७ ॥

नेथुनि रडत निघाला देवा आलास काय धांऊन ॥
मानि मानि गणपतींचे समचित्तुर्धी प्रेममा बुधावून ॥ १८ ॥
गजमुखनाम मुखानें गर्जत मार्गी द्विजाग्रणीजात ॥
तो पथिवनात चूतस्थित कोकिल पाहिलाद्भुत विजात ॥ १९ ॥
जावुनि चूताधःस्थित होवुनि ऐके सुशब्द तो मुदित ॥
होईल काय विन्मुख पाहुनि चातक वनावली उदित ॥ २० ॥
नयनमिटुनि नय कोविदरव कर्णी घालितो शर्यी पडला ॥
तन्मुख निर्गत परिसोपलमौक्तिक हार कंठि मग जडला ॥ २१ ॥
नागानन प्रसादाचि मानुनि तो दगड मानिला परिस ॥
मोरपुरिथे मग तो स्वप्नि प्रभुवर ह्मणे खरा परिस ॥ २२ ॥
यश गात सुमुख घेवुनि स्वग्रामी येत वृत्त निजसर्मतिला ॥
कथिते ऐकुनि वाडव पत्नि वदे ती नमोस्तु गणपतिला ॥ २३ ॥
यन्नमामृत कर्णी पडतां बुधजन भवार्णवी तरले ॥
वाटे गणपतिसम हे मोरेश्वर योगिराज अवतरले ॥ २४ ॥
वर्णन केलें ऐसे चिंतामणि शिष्यवंशजानें तें ॥
मोरेश्वर चरित मुदें अर्पियले सुमुख पाद पद्मी तें ॥ २५ ॥

इति गणेशनंदन कृत मोरेश्वर गोसावी चरित्र आर्या समाप्ता ॥ गणेशार्पणमस्तू ॥

## आर्या.

मल्हार भक्त रामांतमज सुत तत्पौत्र पुत्र तनयानें ॥ पुनरपि स्वगृहि अणिला वंशज पुण्यें गणेश सुनयाने ॥

## नरहरि महिपतीचे पद.

मोरेश्वर वरासि आला प्रसन्न झाला मलाहो धृ०॥विशाळ दोंदभाळहनुवटी। अंगी शेंदुराची उटी। मुक्तमाळा रुळीकंठी हिरा नाभिला ॥१॥ मस्तकिं मुगुट कर्णिकुंडलें विशाळ जाची गंडस्थळें केशर गंधभाळिचर्चिलें मृग मद-लयाला ॥२॥ दूर्वांशमी प्रियकर फार।धूपजळे सुवासी अनिवार।दीप प्रदीप च्होकडे चार।पाहूनि लुप्त झाला मो०॥३॥ वरणभात तिखट मिष्टान्नें। लाडु

मोदकषड्रस पक्वान्नें । तऱ्हेतऱ्हेची पायस अन्नें तांबुल खाल्ला॥ मो.॥४॥ सुंदर उंदिर जैसा करी । त्यावरि रत्नखचित अंबारी। तयामध्येंगजाननाची स्वारी धाक असुराला ॥ मो. ॥ ४ ॥ प्रसन्नवदन बहू दिलदार । स्वारी चाले अनिवार। मूषक पुढें देति ललकार । हर्ष अमराला ॥ मो. ॥ ५ ॥ लोक पुसति देवा कारणें । ऐशा त्वरेने किमर्थ जाणे । नरहरमहिपति भेटि कारणें। भेटले त्याला ॥ मोरेश्वर॥६॥

## पद.

नवविधाभक्ति योगानें ॥ अर्चिता गजानन पावे ॥ धृ० ॥ करि कुमार स्वामी श्रवण ॥ आवडिनें दिनरजनीं तो ॥ कीर्तनीं सूर्य रत होई ॥ महतीस पावला जनितो ॥ चिंतनें राम सद्भावें ॥ विजयध्वज जगतीं होतो ॥ ॥चाल॥ पद सेवित गिरजाअंबा ॥ प्रियकर जी साध्वी सांबा ॥ आदिमाया विश्वकदंबा ॥ चा० प० हेरंबाधर सुख पावे ॥ १ ॥ करि अर्चन विष्णु तैसा ॥ दृढ निश्चय धरुनि प्रीती ॥ तद्योगें निजसुख पावे दशजन्मि पावला महती ॥ शंकरही नमन करोनि ॥ आत्मत्वें पावे शांती ॥ चाल ॥ सुत झाला श्रीगणराज ॥ दनुजाचा हरवी माज ॥ तो करी जनाचे काज॥ ॥ चा०प० ॥ वंदने शांति सुख पावे ॥ २ ॥ दास्यत्वें भार्गवराम ॥ करि क्षत्रिय संवविराम ॥ करि सख्य कमलभू तेणें ॥ निर्विघ्न सृष्टिचें काम॥ जाहले वर्णु मी काय ॥ शुकयोगि पूर्ण निष्काम ॥ चा० ॥ करि आत्मनिवेदन भक्ती ॥ तद्योगें पावला शांति ॥ ऐसी ही नवविध भक्ती ॥ ॥ चा०प०॥ ढुंढिदास वर्णित भावें ॥ ३॥

## पद.

विनायकासि देव त्वरित वाहती ॥ धृ० ॥पळे तुला शत्रु आला ॥चलचल न भयाचि तुला ॥ ज्वालासुर नव्हे भला ॥ परम दुर्मती॥१॥ नूपुरचरणार विंद ॥ हससि कसा मंदमंद ॥ सुंदर वदनारविंद ॥ नेत्र भ्रूलती ॥२॥

## पद. आमृतरायाचें.

तो कृपा कटाक्षें लक्षो ॥ नागानन तुम्हासि रक्षो ॥ धृ० ॥ त्रिपुरासुरासि जिंकू जाता ॥ शंकर वंदी एकदंता ॥ पाहुनि सुमुख प्रसादता ॥ सांब

झाला जयवंत ॥ १ ॥ बलिप्रती याचकतेचें नातें ॥ धरूं जातां वामनातें ॥ प्रेमें चिंतुनि गजाननातें ॥ झाला नारायण विजयी ॥ २ ॥ रचिता विधि चौदा मंदिरा ॥ आदौ स्मरोनि लंबोदरा ॥ तेव्हां सृष्टीपरंपरा ॥ वरप्रसादें उद्भवली ॥ ३ ॥ शेषें मुगुटीं धरिता धरा ॥ ध्यानीं आणोनि विघ्नेश्वरा ॥ पुष्पप्राय वसुंधरा ॥ मानुनि सुखें बैसला ॥ महिषासुर मथनाचा उपाय ॥ सुचेना तेव्हां अंबामाय ॥ चिंतुनि गजाननाचे पाय ॥ जगांत झाली जयवंती ॥ ५ ॥ सांडुनि संसारा प्रति त्यागी ॥ सिद्ध साधक मुनींद्र योगी ॥ जाणुनि मुक्तीला उपयोगी ॥ ध्याती शूर्पकर्णाते ॥ ६ ॥ पंचशरें विश्वाते जिंकाया ॥ आदौ चिंतुनि श्रीगणराया ॥ मग विश्वीं आपुली माया ॥ घालुनि विश्व मोहिलें ॥ ७ ॥ स्वस्ति श्रीविद्यागणपती ॥ ब्राह्मेमुर्ति ब्राह्मण जपती ॥ त्याते दे संतति संपति ॥ अमृत सफलित कल्पलता ॥ ८ ॥

## भाग समाप्त.



ठाणें—येथें जगत्समाचार छापखान्यांत छापिलें.